IRBK-0100560

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ५६०

IRBK-0100560

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
क्र. १५५३

अहिल्या.



ल्या—राधे कृष्ण बोल सखया. (अं. १ पृ. २२.)

9443
ना-9453

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

संगीत

# देवी अहिल्या.

## अंक १–३.

"अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।"

—ईशावास्योपनिषत् ।

IRBK-0100560

लेखक—

दिनकर चिमणाजी देशपांडे ( काशीकर ) बी. ए.

प्रकाशक—

के. पी. पंडित

प्रथमावृत्ति, प्रती ३०००

जानेवारी सन १९२४.

किंमत १। रुपया.

# प्रस्तावना.

मराठीशाहीच्या इतिहास भांडारखान्यांत जी कांहीं उज्वल रमणीरत्नें आहेत त्यापैकीं अहिल्याबाई होळकर हें एक अत्यंत तेजस्वी रत्न होय. ह्या तपस्विनी आणि राजकारणी स्त्रीच्या लौकिकाचा डंका विलायतेलाही जाऊन पोचला होता. अशा या प्रसिद्ध स्त्रीच्या चरित्रांतील एक प्रसंग घेऊन प्रस्तुत नाटक लिहिले आहे. हा प्रसंग म्हणजे श्रीमंत राघोबादादा पेशवे यांची इंदूरवर स्वारी हा होय. अधिकारासाठीं हापापलेल्या कार-स्थानी चंद्रचूडाच्या हातांतील खेळणें झालेल्या दादासाहेबांचें लष्करी सामर्थ्य अहिल्याबाईच्या तपःसामर्थ्यापुढें कसें फिकें पडलें हें या नाटकांत दाखविलें आहे. हा प्रयत्न कितपत साधला आहे हें ठरविण्याचें काम वाचकांचें व प्रेक्षकांचें आहे.

नवीन नाटककाराला प्रथम किती त्रास पडतो याची कल्पना दुसऱ्या कोणालाही यावयाची नाहीं. नाटक कंपन्यांचे मालक व म्यानेजर नवीन नाटकांसाठीं प्रस्थापित कवींच्या मागें लागतात तर नवीन कवींनां आपलीं बाडें काखेंत मारून मालकांच्या मॅनेजरांच्या मागें लागावें लागतें परंतु असा शोचनीय प्रसंग प्रस्तुत लेखकाच्या सुदैवानें व यशवंत संगीत मंडळीचे डायरेक्टर श्री. शंकरराव सरनाईक व मॅनेजर श्री. नानासाहेब हर्डीकर यांच्या दाक्षिण्यानें टळला. श्री. सरनाईक व श्री. हर्डीकर यांनीं देवी अहिल्या हें नाटक माझ्याकडून मुद्दाम लिहून घेऊन मला पुढें येण्याची जी संधी दिली या बद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच. नवीन लेखका विषयींची त्यांची सहानुभूती प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं.

सदरहू पुस्तक श्रीमन्महाराज सवाई तुकोजीराव होळकर सरकार बहादुर इंदोर यांच्या चरणीं अर्पण करण्याची माझी उत्कट इच्छा असतां वेळेच्या अभावीं व इतर कामांच्या नडीनें इंदुरास प्रत्यक्ष जाऊन सरकारांची परवानगी मिळवितां आली नाहीं व त्यामुळें येथें इच्छा नुसती प्रदर्शित करण्या पलीकडे कांहीं करतां येत नाहीं याबद्दल फार दुःख वाटतें.

पुस्तक प्रकाशकाचें काम श्री. बाळासाहेब पंडित यांनीं आपल्या अंगावर घेऊन मला त्या जबाबदारींतून मुक्त केलें याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

श्री. सरनाईक, कृष्णराव गोरे, बापूराव पवार, इंदूरकर वगैरे मंडळींनीं आपापल्या भूमिका उत्तम वठवून प्रयोग यशस्वी केला त्याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी आहे. तसेंच गणपतराव बोडस यानीं आपला अमूल्य वेळ खर्च करून नाटक बसविण्याचे कामीं जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक जितके आभार मानावेत तेवढे थोडेच.

सदरहू नाटकाचा प्रयोग पुणें येथें किर्लोस्कर थिएटरांत शनिवार ता. १ सप्टेंबर सन १९२३ रोजीं झाला.

कोल्हापूर
१८।१।१९२४

दिनकर चिंतामणाजी देशपांडे
काशीकर.

# विक्रीस तयार पुस्तकें.

| | | | | किंमत |
|---|---|---|---|---|
| सं. | भवानी तरवार | ... ... | रु. | १–०–० |
| ,, | भावबंधन | ... ... | ,, | १–४–० |
| ,, | वीरविडंबन | ... ... | ,, | १–०–० |
| ,, | देवी अहिल्या | ... ... | ,, | १–४–० |
| ,, | ,, | ( पद्यावली ) | ,, | ०–४–० |
| ,, | चलती दुनिया उर्दू | ,, ... | ,, | ०–४–० |
| ,, | माझा देश | ( पद्यावली ) | ,, | ०–३–० |
| ,, | भवानी तरवार | ,, ... | ,, | ०–३–० |

मिळण्याचीं ठिकाणें—
१ कृ. स. हर्डीकर, जनरल मॅनेजर— यशवंत संगीत मंडळी.
२ चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

---

# रोल्ड गोल्डचे काळे न होणारे
# दागिने.

शर्टचीं बटनें रु. ३, चंद्रहार रु. ४, गोटजोडी रु. २॥, पाटल्या जोडी रु. २॥, वज्रटीक रु. ४, ठुशी रु. ७, सरी रु. ४, नथ मोत्याची रु. ५, आंगठी रु. १, सल्ले अष्टपैलू जोडी रु. १॥ बांगड्या जोडी रु. २॥ घड्याळाचा छेडा रु. ३, कुडीं मो. रु. ३

## केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम राहतात. तीन डब्यांच्या बॉक्सला रु. १॥.

पत्ताः—मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव, मुंबई नं. ४.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. १४८...
ता. ७६९६३
ठाणे.
०७१३...

॥ श्री ॥

संगीत

# देवी अहिल्या.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

( स्थळ महेश्वर महेश्वराचें मंदीर. अहिल्या व सरदार प्र. )

( हमीर रुपक ) नान्दी.

हे प्रभुवर स्मर हरा । नव सुमन सुरवरा पदनत तुज वाही । धन विजयासह सदया करि चिरायु यशवंता शरण तुजसि करुण विनवि हे वरद दे मजसि या वरा ॥ धृ० ॥ महाराष्ट्र कोकिळ हा रिझवित सकलां लोकमान धन यश तया। मधुर कंठ मधुर काव्य उभय मिळुनि तोषवोत । रसिक हृदय करुनि ताप संहारा ॥ १ ॥

अहिल्या—

१ पद—( भूप त्रिवट. )

नटेश महेश्वर वंदन करि ही भार तुजवरि सारा ॥ धृ० ॥ विमल यशोरवि होळकरांचा तळपो जगिं या सदैव साचा उमावरा या देइं वरा ॥ १ ॥

पुढा, सकवार या उमामहेश्वराच्या तृतीय नेत्राप्रमाणें तेजस्वी असलेला भगवान अंशुमाली क्षितिजाचें सीमोल्लंघन करून या पृथ्वीग्रहाला पावन करण्याकरितांच कीं काय क्षितितलावर भासमान होऊं लागला आहे. पहा. पहा तर खरें, या नुकत्याच उगविणाऱ्या बालार्कांच्या किरणांनीं सुवर्णवर्ण झालेली ही मेदिनी एकाद्या तपस्विनी हिंदू रमणीप्रमाणें कशी तेजस्वी दिसत आहे. स्वातंत्र्याचें दान करणाऱ्या या विजयी वीराचें स्वागत करण्याकरतां आपल्या मंजूळ रवानें गात असलेल्या विहंगवृंदाचें मधुर गान तुला ऐकूं येत नाहीं काय ? या लोकांच्या आत्म्याचें परमेश्वराच्या सर्वसाक्षी नेत्रांचें चैतन्याचें दान करणाऱ्या या सहस्ररश्मीचें स्वागत करण्याकरितां या चैतन्यरहित जड सृष्टीची चाललेली धडपड पाहून आश्चर्यानें व आनंदानें अंतःकरण कसें भरून येतें. हा सर्व देखावा पाहून माझें मन आजपर्यंत कधींही न अनुभवलेल्या अशा प्रकारच्या सात्त्विक आनंदाचा अनुभव घेत आहे, धन्य. धन्य. परमेश्वरा, अशाप्रकारची सात्त्विक आनंदानें भरून गेलेली ही सृष्टिदेवता पाहून नास्तिकाचें अंतःकरण भक्तिभावानें भरून आल्याखेरीज रहाणार नाहीं. हे अखिल जनतेला नवजीवन देणाऱ्या सूर्यनारायणा ही अहिल्या प्रतापी मल्हारराव होळकरांची सून माळव्याच्या सुभेदारांची सून तुला त्रिवार वंदन करीत आहे.

२ पद.

नति पायिं करित ही । दयाघना ठेवि शिरीं देवा या तव छत्र ठेवीं । ठेविं रे ॥ धृ ॥ नच इंदुरा संपदा कदा त्यजो । पदिं अचलता राहुं दे ॥ १ ॥

सकवार—सरकार आपला नित्यक्रम जर माझ्या परिचयाचा नसता तर आपल्याला यावेळीं पाहून स्वर्गांतील देवांगना किंवा पुराणांतील ब्रह्मनिष्ठ तपस्विनी अत्रेयी अगर मैत्रेयी, भगवान सूर्यनारायणाची उपासना करीत आहे असेंच मला वाटलें असतें. आपल्या तपश्चर्येचें हें दिव्य तेज पाहून प्रत्येकाला, प्रत्यक्ष आपल्या या दिव्य तेजाचा हेवा वाटणाऱ्या दुष्टवृत्तीच्या मनुष्याला देखील असेंच वाटेल कीं, सत्त्वगुणाची अधिष्ठात्री देवता श्रीसती पार्वती या स्वयंभू महेश्वराच्या दर्शनाला या वेळीं येथें आली आहे.

अहिल्या—हं थांब सकवार, या पापी अहिल्येची श्रीसती पार्वतीबरोबर तुलना करून आपली जीभ विटाळूं नकोस. अग बोलण्यापूर्वी चांगला विचार केला पाहिजे. परमेश्वरानें दिलेल्या बुद्धीचा दुरुपयोग करून अर्धवट ज्ञानानें हुरळून जाऊन इतर सर्व प्राणिमात्रांपेक्षां आपण श्रेष्ठ असा वृथाभिमान धारण करणाऱ्या आप्पलपोटी मनुष्यांना देवतांची उपमा देण्यांत मनुष्यांचा गौरव न होतां त्या देवतांची मात्र निंदा होते. म्हणून म्हणतें बोलण्यापूर्वी नीट विचार केला पाहिजे.

सकवार—सरकार मी पूर्ण विचार केला आहे म्हणूनच नीट बोलतें. आपणाला उपमा देवतांची नाहीं द्यायची तर कुणाची द्यायची ? गुलाब पुष्पाला आपल्या अंगच्या सुगंधाची कल्पना नसते. सूर्यचंद्रांना आपण आपल्या प्रकाशदानानें या जगावर केवढा उपकार करतों याची जाणीवही नसेल; त्याचप्रमाणें केवळ जगावर उपकार करण्याकरितांच जन्माला आलेल्या दैवी विभूतींच्या अंगीं असलेलें दैवी तेज अज्ञात ठेवण्याची त्यांची इच्छा असते. किंवा त्याचें त्यांनां इतकें महत्वहि वाटत नाहीं. परोपकार हें त्यांच्या नित्यकर्मांपैकींच एक काम होऊन बसतें. अशा लोकांना मनुष्यप्राणी कोण म्हणेल ? ते दैवी प्राणी होत. आणि म्हणूनच सरकार, लोकांवर परोपकार करण्याकरतां चंदनाप्रमाणें देह झिजविणाऱ्या प्रजावत्सल मातेला आपल्याला सती पार्वतीप्रमाणें महासती देवी अहिल्या म्हणून स्वतःला पुनीत मानून घेतलें, तर त्यांत गैर काय केलें ?

अहिल्या—काय नाहीं गैर केलें ? सकवार मीं असें काय केलें आहे म्हणून तूं माझ्या नांवाच्या पुण्यस्मरणानें स्वतःला पुनीत मानून घ्यावेंस ? असा कोणता गुण तूं माझ्यांत पाहिलास कीं त्यामुळें लुब्ध होऊन माझी अवास्तव स्तुती करीत असें भाटासारखें तूं बडबडावेंस ?

सकवार—आपणांला आपली स्तुती केलेली आवडत नाहीं हें मला माहीत आहे. पण आपण रागावूं नका. आपण काय केलें आहे हें जरी मीं सांगितलें नाहीं तरी प्रत्येक क्षेत्रीं असलेले मुके साक्षीदार—आपण बांधलेलीं देवळें व घाट—आपल्या आवडी नावडीची पर्वा न करतां सर्व

जगाला आपल्या सत्कृत्यांची साक्ष देत आहेत. सर्व हिंदुस्थानांत अस्वस्थता माजून राहिली असतां या इंदर संस्थानांत नांदत असलेलें हें रामराज्य आपल्या प्रजावात्सल्याची ग्वाही देतें. पेंढारी, जाट, रोहिले, नबाब प्रत्यक्ष श्रीमंत दादासाहेब पेशवे दुसऱ्याच्या मुलखावर स्वारी करून गरिबांनां पिळून काढीत आहेत. तोंडचा घांस काढीत आहेत, तर आपण भुकेनें कंठीं प्राण आलेल्या हजारों लोकांसाठीं अन्नछत्राचे दरवाजे खुले करून ठेविले आहेत. पण सरकार आपल्यासारख्यावर देखील या दुष्ट जगांत संकटें आणि दुःखाचे डोंगर कोसळतात. आपल्या सारख्यावर संकटें आणणाऱ्या त्या पक्षपाती महेश्वराला दयाघन म्हणण्यापेक्षां दयाहीन म्हणणें अधिक शोभेल.

अहिल्या—अग हे दैवाचे खेळ. आपलें दैव शिकंदर, त्यांत देवाला कां दोष लावावा.

सकवार—म्हणून काय झालें दैव तरी देवानेंच निर्माण केलें ना ? आपल्या सारख्याचें दैव निर्माण करण्यापूर्वी देवानें चांगला विचार केला पाहिजे होता. नुकता कुठें संसाराला आरंभ होतो न होता तोंच खंडेरावसाहेब वारले. ज्यांच्याकरितां स्वर्गसुखाचा त्याग केला त्या थोरल्या सुभेदारांनींही देह ठेवला. मुलाकडे पाहून दुःख गिळीन म्हणावें तर मालेराव बाबांनाही त्या देवानें ठेवलें नाहीं. खरोखर सरकार, आपण येतां म्हणूनच मला रोज या महेश्वरला यावें लागतें. नाहीतर आपल्यासारख्यांवर संकटें आणणाऱ्या त्या देवाचें त्या पक्षपाती महेश्वराचें मीं तोंडही पाहिलें नसतें.

अहिल्या—हं असें बोलूं नये. अग, हें दैवाचें बंधन प्रत्यक्ष महेश्वरालाहि तोडतां येणें शक्य नाहीं.

३ पद—( चंद्रकांत. त्रिवट. )

विषमता । विधिकृता । कधिं नच जाई । दैव न पाही जरठ
युवाही । म्हणत नाहीं । अमर तो वा देही ॥ धृ० ॥
करित हा जरी हर संहार । चुकत न विष अशन परी नियत
नियत । बाई ॥ १ ॥

शिवाय, आपण आपलाच स्वतः पुरता विचार करूं लागलें म्हणजे आयुष्य कष्टमय वाटूं लागतें; संकटें हात धुवून मागें लागल्यासारखीं वाटतात. जीवन असह्य होतें. मी स्वतःचा विचारच करावयाचा सोडला आहे. हल्लीं इंदूर संस्थान हाच माझा संसार. इंदूरची प्रजा हीच माझी प्रजा. इंदूरकरतां सर्वस्वार्पण हेंच माझें व्रत.

**सकवार**—आणि यामुळेंच आपली कीर्ति हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत, ब्रह्मावर्तापासून पेशावरापर्यंत, सर्व हिंदुस्थानभर भरून राहिली आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या कीर्तीचा डंका सातासमुद्रांपलीकडे राहाणाऱ्या फिरंग्याच्या आणि टोपीवाल्यांच्या देशाला देखील जाऊन पोंचला आहे.

**अहिल्या**—शिवाय इंदूरविषयीं मला प्रेम कां वाटूं नये. श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं दिल्लीवर हल्ला करून मोंगलांचा नकशा उतरविला. बादशाही बागुलबुवाची भीति झुगारून देऊन माळव्याची सुभेदारी होळकरांना दिली. स्वराज्य संपादनाच्या व संरक्षणाच्या पवित्र कामांत जातिभेद, जातिद्वेष, जातीचें उच्चनीचत्व आड न येतां खऱ्या वीराला त्याच्या गुणांचें योग्य बक्षीस कसें मिळतें हें कुणी दर्शविलें ? तर सुभेदारांच्या इंदूरनें. आपला सामाजिक दर्जा कितीहि कमी असला तरी आपली उन्नती जगांत आपल्यालाच करून घेतां येते हें त्रिकालाबाधित सत्य जगाला कोण जाहीर करीत आहे ? तर होळकरांचें इंदूर. या इंदूरनेंच हिंदुस्थानाला मराठ्यांच्या तरवारीचें पाणी दाखविलें आहे ? या इंदूरच्या भरंवशावरच श्रीमंत पेशव्यांना शनवार वाड्यांत सुखानें झोंप घेतां येते. या इंदूरनेंच समाजांतील अगदीं हलक्या दर्जाच्या मानलेल्या लोकांना अत्युच्च वैभवाचा रस्ता दाखवून दिला. तेव्हां अशाप्रकारच्या केवळ मराठेशाहीच्याच नव्हे तर सर्व हिंदुस्थानच्या इतिहासाला ललामभूत होऊन राहिलेल्या या इंदूर संस्थानचा अभिमान, इंदूर संस्थानांविषयीं प्रेम, मला, या अहिल्येला कां वाटूं नये.

**सकवार**—सरकार, आपल्या मनांत इंदूरविषयीं असलेल्या प्रेमाची मला पूर्ण जाणीव आहे. महेश्वराच्या भक्तीपेक्षां देखील कदाचित तें

अधिक असूं शकेल. आपलें हें प्रजाप्रेम पाहून राजमाता जिजाबाई-साहेबांची आठवण होते. जिजाबाईसाहेबच आपल्या रूपानें माळव्यांत अवतरल्या असाव्यात असें वाटतें. दोघीहि सारख्याच योग्यतेच्या. दोघींचेंही प्रजावात्सल्य वाखाणण्याजोगें. फरक इतकाच कीं, एक महाराष्ट्रांत व दुसरी माळव्यांत.

अहिल्या—जिजाबाईसाहेबांचें कशाला पाहिजे ? त्यांची योग्यता मला कशी येईल ? प्रत्यक्ष महेश्वरानें त्यांच्या पोटीं जन्म घेऊन स्वराज्य-स्थापना केली. मराठेशाहीचा भगवा झेंडा महाराष्ट्रावर फडकविला. याच वीरानें श्रीछत्रपतीनें दिल्लीच्या बादशहापासून तों यःकश्चित फिरंग्यापर्यंत आपला दरारा बसविला. राज्यकर्त्यांनीं कसें वागलें पाहिजे याचा धडा आपल्या निःस्वार्थी वर्तनानें सर्व जगाला घालून दिला. त्या पुण्यपुरुषानें घालून दिलेल्या मार्गानेंच आम्हीं वागलें पाहिजे. लोकांचा आनंद तोच राज्यकर्त्यांचा आनंद, लोकांचें सुख तेंच राज्यकर्त्यांचें सुख अशीच भावना मनांत ठेवून राज्यकर्त्यांनीं आपला राज्यशकट हांकला पाहिजे. प्रजेच्या संतोषापेक्षां आणि उच्च मोबदला कोणता पाहिजे ? लोकांनीं संतुष्ट चित्तानें दिलेल्या आशिर्वादापेक्षां राजकर्त्यांना आणि काय पाहिजे ? आणि लोकांनाही प्रजावत्सल राजाखेरीज आणखी काय पाहिजे ?

( पडद्यांत—न्याय पाहिजे ! सरकारची भेट मला आतां झालीच पाहिजे )

विसाजी—बाई, सक्तीचे हुकूम सुटले आहेत; त्यामुळें मला तुम्हांला तशी परवानगी देतां येत नाहीं.

अहिल्या—सकवार काय भानगड आहे ?

सकवार—विसाजीपंत.........

( विसाजी येतो. )

अहिल्या—काय गडबड आहे ?

विसाजी—इंदूरचे प्रसिद्ध सावकार धनशेट देवीचंद.........

अहिल्या—हो ते नुकतेच वारले असें आम्हांला समजलें आहे.

विसाजी—त्यांची पत्नी प्रेमकुवरबाई सरकारची भेट घेण्याकरितां इंदूरहून आली आहे तिचें.........

अहिल्या—काय काम आहे ?

विसाजी—तिला न्याय पाहिजे.

अहिल्या—मग तिला आंत कां सोडली नाहींत ? महेश्वराचें न्याय-मंदीर सर्वांना खुलें असतां या बाईला आंत कां सोडलें नाहीं.

विसाजी—दिवाण बहादूर चंद्रचूड यांचे इंदूराहून सक्त हुकूम आले आहेत कीं, आपण स्वतः येईपर्यंत सरकारांना कुणालाहि भेटूं देऊं नये.

अहिल्या—कुणालाहि भेटूं देऊं नये ! आणि दिवाण बहादुरांनीं सक्तीचे हुकूम सोडले आहेत ! याचा अर्थ काय ? एक अनाथ विधवा अधिकाऱ्यांच्या विरुद्ध दाद मागण्याकरितां महेश्वरच्या न्यायमंदिराकडे धांव घेत असतां तिचा सुलभ रीतिनें प्रवेशहि होऊं नये ? आपलीं दुःखें राजाला सांगावयाला प्रजेला आधीं अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागावी ! कुणालाहि न भेटण्याविषयीं अप्रत्यक्ष रीतीनें आम्हांला सक्तीचे हुकूम. हा आमचा संस्थानच्या मालकिणीचा उपमर्द कीं अधिकाऱ्यांच्या सत्तेची धुंदी ! हे संस्थानचे अधिकारी असे बेजबाबदार रीतीनें वागतात. आणि त्यांच्या वर्तनाचें खापर राजाच्या डोक्यावर फुटतें. अधिकाराच्या धुंदीनें यांना आपल्या वर्तनाचें भान रहात नाहीं आणि आपल्यावर केलेली टीका बंद करण्याकरितां हे लोकांची मुस्कटदाबी करतात. आणि अशा-मुळें राज्याच्या बळकटीला धोका पोंचतो याची या घमेंडखोर अधिका-ऱ्यांना कल्पनाहि नसते. विसाजीपंत, असे अन्यायी हुकूम सोडण्याचा अर्थ तरी काय ? असे जुलमी हुकूम सोडण्याचें दिवाण बहादुरांना एवढें महत्त्वाचें कारण तरी काय घडलें ?

( चंद्रचूड व तुकोजीराव प्रवेश करतात. )

चंद्रचूड—कारण एवढेंच कीं, हा संस्थानच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. संस्थानचे अधिकारी जो हुकूम सोडतात किंवा जो निकाल देतात त्याच्या-बरोबर विरुद्ध हुकूम व निकाल महेश्वराच्या दरबाराकडून होतात. संस्था-नच्या धोरणाला अनुसरून, हिंदुस्थानाच्या राजकारणाचें परिशीलन करून

इंदूरच्या मुत्सद्यांनीं सोडलेले हुकूम महेश्वराच्या दरबारला पटत नाहींत. सरकार कसुरीची माफी असावी. संस्थानच्या हिताकरितां व इंदूरच्या अधिकाऱ्यांचा बोज राखण्याकरतां मला असे हुकूम सोडावे लागले. आणि आपल्या चरणीं निवेदन करण्याकरितांच इतक्या तांतडीनें इंदूरहून इकडे आलों.

अहिल्या—पण इंदूरच्या दिवाण बहादुरांनीं असा कोणता निकाल केला आहे कीं, जो आम्हांला कळला असतां–महेश्वरच्या दरबारला समजला असतां-उलट निकाल होण्याची भीती आहे ? अधिकाऱ्यांची इज्जत जाण्याचा संभव आहे !

चंद्रचूड—नगरशेट देवीचंद याला एक महिन्यापूर्वी देवाज्ञा झाली. त्यांच्या प्रेमकुवर नांवाच्या बायकोनें आपल्याला—

प्रेमकुवर—( प्र. करून ) दत्तकाची परवानगी मिळावी एवढीच विनंति केली होती. सरकार माझा योग्य तो इनसाफ व्हावा एवढीच हात जोडून प्रार्थना आहे. न्यायाची भिक्षा मागण्याकरितां इंदूरहून महेश्वराला धांवत आलेल्या या भिकारणीला एवढी आपण भिक्षा घालाच.

अहिल्या—बाई शांत व्हा. महेश्वरच्या न्यायमंदिरांतून कोणीहि विन्मुख जात नाहीं. तुम्ही नगरशेट देवीचंद यांच्या पत्नी प्रेमकुवर बाईच ना !

प्रेमकुवर—होय सरकार. सुभेदारांची सेवा आमरण ज्यांनीं केली त्यांचीच मी धर्मपत्नी.

अहिल्या—होय. देवीचंदांनीं होळकरांना कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. त्यांचे आमच्यावर कधीं न फिटण्यासारखे उपकार झाले आहेत. इतकेंच नव्हे तर अडचणीचे प्रसंगीं सुभेदारांच्या विनंतीवरून रावसाहेब पेशव्यांना मदत करून त्यांनाहि त्यांनीं कायमचें उपकृत करून ठेविलें आहे.

प्रेमकुवर—त्या माझ्या पूज्य पतिदेवांचा अंत सरकारांच्या व्यवहारासंबंधींच उदेपुराहून परत येत असतां घोड्यावरून पडून झाला.

अहिल्या—बाई झाल्या गोष्टी कां कुणाच्या हातांत आहेत. जगाच्या रहाटीकडे पाहून शोक गिळला पाहिजे.

प्रेमकुवर—सरकार; दौलत कुणाला बघवत नाहीं. त्यांचा अंत झाला असें पाहून भाऊबंदांनीं दौलत घशाखालीं घालण्याचा विचार केला. दौलतीच्या रक्षणासाठीं; परलोकांत आम्हांला एवढें पाणी मिळावें म्हणून होळकरांशीं निष्ठेनें- राजनिष्ठेनें वागत आलेल्या घराण्याचा वंश जगांत-चालू रहावा या सद्हेतूनें दत्तकाची परवानगी मिळावी म्हणून मी अर्ज केला होता.

अहिल्या—होळकरांचा व देवीचंदांचा फारच निकट संबंध होता. बाई; तुमच्या अर्जाचा योग्य तो निकाल झालाच आहे.

प्रेमकुवर—निकाल झाला. पण मला दत्तकाची परवानगी न मिळतां सालिना पांचशें रुपये पोटगीची मिळाली ! दौलत भाईबंद गिळंकृत करतील म्हणून सरकारजमा करण्याचा हुकूम झाला आहे !

अहिल्या—चंद्रचूड ही गोष्ट खरी आहे काय ?

चंद्रचूड—होय.

अहिल्या—हुकूम कोणी दिला ! बाईच्या अर्जाचा निकाल कुणी केला ?

चंद्रचूड—मी.

अहिल्या—हं ! अशाप्रकारचा अन्यायी निकाल इंदूरचे दिवाणबहादूर चंद्रचूड यांनींच दिला तर ! अशा प्रकारचा जुलमी हुकूम होळकरांच्या सेवेंत काळ्याचे पांढरे केस झालेल्या मुत्सद्दी चंद्रचूडानींच सोडला म्हणायचा ! होळकरांच्या तोंडाला कायमचा कलंक फांसणारा हा जुलूम संस्थानचे राजनिष्ठ सेवक चंद्रचूडच करायला तयार झाले तर ! दिवाण बहादूर; दिवसेंदिवस आपल्याला बुद्धिभ्रंश होत चालला आहे. हा अन्यायी निकाल देण्यापूर्वी आपण नीट विचार केला होता काय ! अशा जुलमानेंच आपण संस्थानचें हित साधणार आहांत काय ! आणि आपल्या सारख्याच जुलमी सत्ताधाऱ्यांच्या बेजबाबदार वर्तनाचें समर्थन करण्याकरितां इंदूरहून इकडे धडपडत आलांत काय !

चंद्रचूड—सरकार जरा शांत व्हा. आपला जरा गैरसमज झाल्यासारखा दिसतो. मन स्थीर नाहीं. शांतपणानें जर आपण विचार कराल तर या निकालानें संस्थानचें केवढें हित होणार आहे हें आपल्या ध्यानांत येईल.

अहिल्या—आग लागो त्या तुमच्या संस्थानच्या हिताला. दिवाण बहादूर; प्रजेचें अनहित करून संस्थानचें हीत साधण्याची माझी इच्छा नाहीं. प्रजेला कंगाल करून संस्थानचा खजिना मला भरावयाचा नाहीं. प्रजेच्या घरावर नांगर फिरवून संस्थानचे इमले मला चढवावयाचे नाहींत. चंद्रचूड तुम्ही अधिकारी लोक लोकांचें अस्तित्व विसरतां. तुम्ही कोणत्या भ्रमांत आहां ? प्रजा आहे म्हणून इंदूर आहे. प्रजा आहे म्हणून तुम्ही आहांत. प्रजा आहे म्हणून मी आहें. लोकांच्या जिवावर चैन भोगून त्यांनाच धुळीला मिळविणारे हुकूम सोडणाऱ्या तुम्हां जुलमी अधिकाऱ्यांच्या निर्लज्जपणाची कमाल आहे, नीचपणाची शिकस्त आहे.

चंद्रचूड—सरकार आपणाला राग आला आहे त्यामुळें आमची प्रत्येक कृती आपल्याला सदोष वाटत आहे. पण या कामांत जर दोष असलाच तर तो माझा एकट्याचा नाहीं. इंदूरांतील सर्व मुत्सद्यांनीं असाच निकाल दिला आहे. इंदूरांतील अधिकाऱ्यांची या ठरावाला संमती आहे. प्रत्यक्ष सेनापति साहेबांचें मत या ठरावाला अनुकूल असेंच आहे.

तुकोजी—संस्थानचा वाढता लष्करी खर्च ध्यानांत घेतला असतां कुणाहि मुत्सद्याचें मत या ठरावाला अनुकूल असेंच पडेल.

अहिल्या—लष्करी खर्च ? तुकोजीराव, संस्थानच्या लोकांना पिळून काढून लष्करचा खर्च भागवावा असें कोणत्या कायद्यांत सांगितलें आहे ? लोकांना भिकेला लावून लष्करची भूक भागवावी असें कोणत्या शास्त्रांत सांगितलें आहे ? लोकांच्या मुंड्या मुरगळून लष्करचें शीर सलामत ठेवावें अशी सल्ला आपल्याला कोणच्या मुत्सद्यानें दिली ? तुकोजीराव, आपला जन्म होळकरांच्या कुळांत झाला आहे. थोरल्या सुभेदारांचे आपण मानसपुत्र. संस्थानची मालकी आपल्याकडे येण्याचा संभव. थोरल्या सुभेदारांनी मालेराव बाबांचा हात तुमच्या हातांत दिला तो संस्थानच्या प्रजेचा

हात असा झिडकारण्यासाठीं नव्हे. होळकरांच्या सैन्याचें अधिपत्य जें आपणाला दिलें तें आपल्याच प्रजेला भिकेला लावण्यासाठीं नव्हे. अशा वागण्यानें होळकरांची किंमत जाते. अशा वागण्यानें संस्थानची बदनामी होते.

चंद्रचूड—दत्तकाला परवानगी देण्याची आपली इच्छाच असेल तर आमची कांहीं ना नाहीं; पण दौलतीला साजेलसा नजराणा सरकारांत भरल्याखेरीज परवानगी देतां येत नाहीं !

प्रेमकुवर—मी नजराणा भरण्याला तयार आहें.

अहिल्या—नजराणा कशाबद्दल ?

चंद्रचूड—दरबारकडून दत्तकाची परवानगी मिळण्याबद्दल सरकारांत नजराणा भरावा लागतो. बाईच्या संपत्तीची गणना केली असतां निदान तीन लक्ष रुपये तरी त्यांनीं सरकारांत भरले पाहिजेत. म्हणजे......

तुकोजी—तेवढीच उदेपूरच्या राजकारणासाठीं न्याव्या लागणाऱ्या लष्करच्या खर्चाची तजवीज होईल.

अहिल्या—तुकोजीराव, थोरल्या सुभेदारांनीं इतक्या लढाया जिंकल्या पण एकाही लढाईत त्यांनीं संस्थानच्या तिजोरीला तोशीस दिली नाहीं. आपल्या लष्करचा खर्च भागविण्यासाठीं संस्थानच्या प्रजेपैकीं एकाचेंहि घरदार लुटलें नाहीं. तुमच्या हातून उदेपूरचें राजकारण स्वतःच्या हिंमतीवर होत नसलें तर नोकरी सोडून स्वस्थ बसा. संस्थानची कामगिरी अडून रहाणार नाहीं. आणि चंद्रचूड, आपल्या नवऱ्याला स्वर्गांत पाणी मिळावें, आपल्यामागें स्वतःला पाणी मिळावें या सद्हेतूनें बाई दत्तक घेत आहे. हा दत्तक शास्त्रसंमत आहे. तो न्यायसंमत करण्यासाठीं या बाईकडून तीन लक्षांचा नजराणा—तीन लक्ष रुपयांची लांच—घेणें इंदूरच्या दरबाराला-दिवाणबहादूर चंद्रचूडांना-कितीही न्याय्य वाटत असलें तरी महेश्वरच्या दरबाराला-या इंदूरच्या राणीला-तसें वाटत नाहीं. अशी न्यायाची विक्री करण्याची सुभेदारांच्या या सुनेची इच्छा नाहीं.

चंद्रचूड—सरकार हें प्रकरण जरा भानगडीचें झालें आहे. इंदूरच्या दरबाराचा निकाल महेश्वरच्या दरबारला पसंत नाहीं. इंदूरच्या दिवा-

णांनीं दिलेला निकाल इंदूरच्या राणीसाहेबांना न्याय्य वाटत नाहीं. दत्तकाची परवानगी मिळण्यासाठीं सरकारांत भरण्याचा कायदेशीर असलेला नजराणा ही बाई स्वखुषीनें द्यायला तयार असतांही इंदूरच्या राणीसाहेबांनां बेकायदेशीर वाटतो. तेव्हां हें सर्व प्रकरण पुण्यास श्रीमंतांच्याकडे पाठवून द्यावें. किंवा श्रीमंत दादासाहेबांची स्वारी माळव्यांतच आहे; त्यांच्याकडे पाठवून द्यावें, आणि काय निकाल होतो तो पहावा. आणि शिवाय; मला असेंहि वाटतें कीं, नजराणा न घेतां या प्रश्नाचा निकाल श्रीमंतांच्या खास हुकमाखेरीज करायला सरकार मुखत्यारही नाहीं.

अहिल्या—बस्स. तोंड आटपा. पुरे झाला हा मर्यादेचा अतिक्रम. चंद्रचूड; तुम्ही कुणासमोर काय बोलत आहां याची आठवण तरी तुम्हांला आहे का ? असे उद्दामपणाचे उद्गार होळकरांच्या सेवेंत आयुष्य खर्च केलेल्या चंद्रचूडानेंच काढले म्हणूनच आम्हीं तें सहन केलें. नाहीं तर आम्ही तें केव्हांहि सहन केलें नसतें. इतकेंच नव्हे तर अशा प्रकारचे अपमानकारक उद्गार जर प्रत्यक्ष चंद्रचूड यांच्या मुखांतून पुन्हा बाहेर पडतील तर पाणी पिण्याचाहि अवसर न देतां त्यांना माळव्यांतून हद्दपार करण्यांत येईल. ही संस्थानची राणी जिवंत असतां संस्थानच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा श्रीमंतांना काय हक्क ! आमच्या मुखत्यारीचा प्रश्न करणारे तुम्ही कोण ! नादानपणानें तोंडांतून काढलेले उद्गार चंद्रचूड, मातीमोल असतात ! कवडी किंमतीचे असतात. पुरे झाला हा काथ्याकूट. प्रेमकुवर बाई तुमच्या अर्जाचा निकाल या महेश्वरासमोर मी आतांच्या आतां देतें. या महेश्वराच्या पायरीवर बसून या सूर्यनारायणाला साक्षी ठेवून मी ही इंदुरची राणी तुम्हांला दत्तकाची परवानगी देत आहें. जा. शास्त्रसंमत असलेला तुम्हांला वाटेल तो दत्तक घ्या; आणि त्या बाळाला मला पहायला घेऊन या. म्हणजे मी स्वतः त्याला मांडीवर घेऊन त्याच्या तोंडांत साखर घालीन. तुम्हांला नजराणा माफ करण्यांत आलेला आहे. पण पैसे खर्च करण्याची तुमची इच्छा असल्यास कृष्णाकांठीं श्री औदुंबर क्षेत्रीं गरिबांनां अन्नदान करण्यासाठीं एक अन्नछत्र उघडा. जा बाई; आनंदानें



अहिल्याः—मी तुम्हांला दत्तकाची परवानगी देत आहे. जा. बाई.                (अं. १ पृ. १२)

परत जा. तुकोजीराव ! थोरल्या सुभेदारांचें उदाहरण डोळ्यासमोर ठेऊन स्वतःच्या हिंमतीवर उदेपूरचें राजकारण पार पाडण्याकरितां इंदूरचा तळ हलवून एकदम तिकडे कूच करा. माझ्या इंदुरच्या प्रजेला त्रास देण्याचें तुम्हांला कांहीं कारण नाहीं. आणि चंद्रचूड ! मी तुम्हांला फिरून बजाऊन सांगतें तें नीट लक्षांत ठेवा कीं, लोकांना असंतुष्ट ठेऊन अधिकाऱ्यांचें केव्हांहि कल्याण होणार नाहीं. लोकांत असंतोष राखून संस्थान केव्हांहि चिरस्थायी होणार नाहीं. लोकांच्या कल्याणाकरितां झटणें; लोकांच्या संतोषाकरतां प्रयत्न करणें यांतच तुमचें कल्याण आहे; यांतच अधिकाऱ्यांचें यश आहे; यांतच संस्थानचें हित आहे.

४ पद.—( कानडी. )

धरा या बोला माझ्या मना । नृप दास नोहे तरि ना राजा
माना जना ॥ धृ० ॥ हित न घेत ध्यानीं । जनता न मानी ।
तरि कीर्ति हानि ॥ अधिकारा हा ये कालिमा ॥ १ ॥

( जातात )

---

## प्रवेश दुसरा.

( बाळाजीपंत प्रवेश करतो. )

बाळाजी—मनुष्याला जर आपल्या परिस्थितींत फेरफार व्हावा अशी इच्छा असेल तर त्यानें आपल्या वर्तनांत फेरफार केला पाहिजे. उन्नतीच्या मार्गांतील या फेरफाराच्या पायऱ्या जर भराभर चढल्या नाहींत तर वैभवाचें शिखर हातीं न येतां आमच्यासारखी स्थिती होते. आमच्या आजोबाचें नांव बाळाजी विश्वनाथ. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याही आजोबाचें नांव बाळाजी विश्वनाथ. आमच्या वडलांचें नांव बाजीराव श्रीमंतांच्या वडिलांचें नांव बाजीराव. माझें नांव बाळाजी बाजीराव. श्रीमंतांचें नांवही बाळाजी बाजीराव. बाळाजी विश्वनाथाप्रमाणें कोकणाशीं असहकारिता करून आमचे आजोबाही देशावर आले. सर्व गोष्टींत अनुकरण केलें. पण आपल्या

वृत्तींत फेरफार न केल्यामुळें आमच्या आजोबांचा डाव्या हाताचा घंटानाद आणि उजव्या हाताचा शंख कांहीं सुटला नाहीं. चंदनाच्या खोडाऐवजीं शिलेदारीचा घोडा जर हातीं धरला असता तर हा दारिद्याचा खोडा जन्मभर आमच्या हातांत कां पडला असता ! तरवार हातीं धरून जर शंखाला रजा दिली असती तर आज आम्हीं त्यांच्या नांवानें असे शंख करीत कां बसलों असतों. कोंकणच्या असहकारितेबरोबर जर त्यांनीं आपल्या भिक्षुक वृत्तीशीं असहकारिता केली असती तर आज लक्ष्मीनें आमच्याशीं सहकारिता केली असती का. अहो, कदाचित आम्हीं पेशव्यांच्या गादीवर लोळत पडलों असतों. पण हें त्या बुढ्याच्या कुठलें लक्षांत यायला. असहकारितेचा अंगिकार केला असतांही त्यामध्यें किती फेरफार करावा लागतो हें कळायला माझ्यासारखें मुत्सद्दी डोकेंच पाहिजे. भिक्षुकवृत्तीशीं असहकारिता करून कारकुनीशीं सहकारिता केली. पेशवे जरासे गुणग्राही आहेत असें समजल्यावरून साताऱ्यास छत्रपतींना सोडून पुण्यास आलों. त्या वेळीं पानपतची धांदल चाललेली; म्हटलें सुसंधी आहे, मिळेल हजार पांचशांची मनसबदारी. निदान अक्षर चांगलें आहे मिळेल जागा फडणीशीची. पण साले सगळे एकजात गद्धे. एकाला तरी पारख असेल तर शपथ. पुण्यास आपल्या गुणाचें योग्य चीज होत नाहीं असें पाहून स्थलांत फेरफार करण्याचा विचार केला. पुण्यांत मिळालेल्या वाटाण्याच्या अक्षता घेऊन पानपतच्या अक्षतीबरोबर सोनपतला गेलों. तिथल्या लढाईची लग्नघाई आटोपल्यावर पळपुट्या मराठ्यांच्या दक्षिणेकडील निघालेल्या वराती मागून आमचें तट्टू दामटीत दामटीत आम्हीं इंदूरलायेऊन थडकलों. या इंदुरांत मात्र कोळशाच्या खाणींतून बरोबर हिराच तेवढा शोधून काढणारा रत्नपारखी सांपडला. दिवाणबहादुर चंद्रचूडांनीं नगरशेट देवीचंदाच्या पेढीवरून बोलावून मला आपला खासगी चिटणीस केलें. योग्यच केलें. अहो गुणी मनुष्याच्या गुणाचें चीज व्हायला सुरवात झाली. आणि सरदार चंद्रचूडांना माझ्या सल्ल्याप्रमाणें वारंवार आपल्या मसलतींत फेरफार करून इंदूर संस्थान बळकावण्याच्या त्यांच्या कारस्थानाला जय मिळ-

त्याची आशा वाटूं लागली. होईल, त्यांच्या इच्छेप्रमाणेंच होईल. कारण त्यांत मी आतां लक्ष घालून पाहिजे तो फेरफार करण्यास सुरवात केली आहे. इंदरच्या दरबारचा महेश्वरच्या दरबारशीं पक्का विरोध. इंदूरच्या दरबारशीं जर सहकारिता करायची तर महेश्वरच्या दरबारशीं असहकारिता केली पाहिजेच; ह्या चंद्रचूडांच्या धोरणांत फेर फार करून महेश्वरच्या दरबारशीं केलेल्या असहकारितेंत फेर फार करून मोठ्या मुत्सद्दिपणानें आपला हेतु साधण्याचा माझा विचार आहे. आणि म्हणूनच सरकारशीं सख्य करून महेश्वर दरबारांत प्रवेश करण्याचा हक्क असहकारिता किती जरी आडवी आली तरी तींत फेरफार करून. संपादन करणार आतां सकवार............

सकवार—( प्रवेश करून ) आपल्या समोरच उभी आहे. तुमचा निरोप आला म्हणून आलें काय काम आहे ?

बाळाजीपंत—मला तुमच्याशीं तहनामा करायचा आहे. इंदूरच्या दरबारांतील व महेश्वराच्या दरबारांतील परस्पर विरोध काढून टाकून त्यांची दिलजमाई करायची आहे. तुमच्याशीं केलेल्या असहकारितेच्या तपशिलांत फेरफार करायचा आहे. या. सकवारबाई, बसा. तुमच्या येण्यानें मला फार आनंद झाला. याचें नांव धोरण. याचें नांव राजकारण. तुमच्यासारख्या स्त्रिया या महेश्वरच्या स्त्री दरबारांत आहेत म्हणूनच या दरबारचा डंका टोपीवाल्यांच्या विलायतेला जाऊन पोंचला आहे. खरोखर, सकवारबाई, तुमच्या येण्यानें इंदूरच्या राणीसाहेब अहिल्यादेवीच येथें आल्याप्रमाणें मला वाटत आहे.

सकवार—बाळाजीपंत, तुम्ही काय म्हणतां याचा मला अर्थ कळत नाहीं. तुमच्या वर्तनाचा मला बोधच होत नाहीं.

बाळाजीपंत—ठीकच आहे. कवींच्या कवितांचाअर्थ कळला आणि मुत्सद्यांच्या वर्तनाचा बोध झाला तर आणखी काय पाहिजे ! सकवारबाई, हें मौत्सद्य फार गहन ! प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला देखील हे मुत्सद्दी डावपेंच समजणार नाहीत. बरें. तें असूं दे. पण सकवारबाई, इंदूरच्या अधिकाऱ्यांविषयीं तुमचें काय मत आहे !

**सकवार**—आपल्या बेजबाबदार वर्तनानें प्रजेवर जुलुम करणारे नालायक सत्ताधारी आहेत असें माझें स्पष्ट मत आहे.

**बाळाजीपंत**—राजद्रोह ! राजद्रोह. इंदूरच्या सत्ताधारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर टीका ! सकवारबाई, आपण महेश्वरांत आहांत म्हणूनच वांचलांत. नाहींतर............

**सकवार**—काय झालें असतें ?

**बाळाजीपंत**—अधिकाऱ्यांचा द्रोह म्हणजे राजद्रोह कसा हें तुम्हांला समजलें असतें.

**सकवार**—बाळाजीपंत, अधिकाऱ्यांचा द्रोह म्हणजे राजद्रोह नव्हे. अधिकारी म्हणजे राजा नव्हे. इंदूरचा दरबार म्हणजे महेश्वरचा दरबार नव्हे.

**बाळाजीपंत**—पण तो तसा व्हावा अशी मुत्सदी अधिकाऱ्यांची इच्छा आहे. इंदूरच्या अधिकाऱ्यांचा बोज राखण्याकरितां महेश्वरच्या दरबारनें आपल्या धोरणांत फेरफार करावा अशी आमची इच्छा आहे. आणि म्हणूनच मीं तुम्हाला बोलावणें पाठविलें.

**सकवार**—इंदूरच्या अधिकाऱ्यांच्या तामसी वृत्तीचें भूत महेश्वरच्या सात्विक वृत्तीच्या दरबारला पछाडेल अशी जर तुमची कल्पना असेल तर तो निव्वळ भ्रम आहे. सत्ता पिशाचिकेच्या जोरावर वाटेल तसा थैमान घालणारा अधिकारी वर्ग इंदूरच्या राणीसमोर, महेश्वरच्या अहिल्या देवी समोर कसा हतबल होऊन जातो, याचा प्रत्यय तुमच्या चंद्रचूडांना आज चांगलाच आला असेल. देवीचंदाच्या प्रेमकुंवर बाईचा दत्तकाच्या परवानगीचा अर्ज...............

**बाळाजीपंत**—मींच देवीचंदाच्या पेढीवर असतांना लिहिला होता.

**सकवार**—पण तो फेटाळून लाऊन............

**बाळाजीपंत**—त्याचा कायमचा निकाल दिवाण बहादूर चंद्रचूडांचा चिटणीस झाल्यावर मींच लावला.

**सकवार**—पण इंदूरच्या राणींनें तुमचा निकाल निकालांत काढून चंद्रचूडांचा सत्तेची धुंदी उतरविली आणि तरफदारी करायला आलेल्या सेनापतींची वकिली निष्फळ केली.



बाळाजी०—राजद्रोह ! राजद्रोह !

( अं. १ पृ. १६ )

बाळाजीपंत—योग्यच केलें. खरा न्याय झाला. सत्पक्षाचा जय झाला असा निकाल होणार हें ज्या वेळीं आम्हीं बाईचा अर्ज निकालांत काढला त्याच वेळेला आम्हांला वाटलें होतें. माझ्या तर्कांत तिळाएवढाही फरक पडला नाहीं. असाच निकाल व्हायचा. पण सकवारबाई कज्जा रंगला. छान रंगला. इंदूरच्या अधिकाऱ्यांची खोड मोडली. पण सकवारबाई, इंदूरच्या व महेश्वरच्या बेदिलीचा फायदा घेऊन स्वतःच्या स्थितींत फेरफार घडवून आणण्याची सुसंधी आपण कां दवडावी ?

सकवार—तुमच्या बोलण्याचा अर्थ मला समजला नाहीं.

बाळाजीपंत—अथ कांहीं इतका गूढ नाहीं. तुम्हीं इंदूरच्या राणीसाहेबांच्या अगदीं अंतरंगांतल्या. राज्याचीं सूत्रें राजापेक्षां राजाच्या अंतरंगांतील लोकांवरच अधिक अवलंबून असतात. तेव्हां मनांत आणलें तर तुम्हांला सांप्रतच्या स्थितींत फेरफार करून उच्च स्थिती प्राप्त करून घेतां येईल. इतकेंच नव्हे तर तुमचें नांव हिंदुस्थानांतील राजकारणी स्त्रियांच्या पंक्तीला जाऊन बसेल. सांप्रतच्या संस्थानच्या बेदिलीचा फायदा घेऊन कांहीं मुत्सद्यांनीं श्रीमंत दादासाहेब पेशव्यांशीं कारस्थान सुरू केलें तर—

सकवार—घरांत दुही झाली म्हणजे तिसऱ्याचा हात कसा शिरतो हें सगळ्या जगाला दिसेल. पंत, तुमचा काय विचार आहे ? तुम्हीं मला हेराचें काम सांगणार आहांत कीं स्वतः तें करणार आहांत ? संस्थानमंदिरावर निखारे ठेवण्याचें काम माझ्याकडून करविणार कीं हातांत पेटलेला चुडा घेऊन तें करण्याचा मान स्वतः पटकावणार ? पंत तुमच्या निर्लज्जपणाची शिकस्त आहे. बेमान धन्याचा बेमान चाकर. तुमच्या निरोपाप्रमाणें आलें हीच चूक. पण मला तरी काय माहीत कीं हे शहाणे मुत्सद्दी आपल्या राजनीतीचा प्रयोग माझ्यावर करतात म्हणून !

बाळाजीपंत—( स्वगत ) यापुढें प्रयोगांत सोईप्रमाणें फेरफार केला पाहिजे.

सकवार—पंत, स्त्रियांच्याविषयीं तुमची कल्पना तरी काय आहे ?

**बाळाजीपंत**—न स्त्री स्वातंत्र्यमर्हती !

**सकवार**—स्त्रिया म्हणजे सहज फसल्या जाणाऱ्या असें कां तुम्हांला वाटतें ? स्त्रीजात बेहराम अशी कां तुमची समजूत आहे ? ज्यांचें अन्न खावें त्यांच्या जिवावर उठावें हा बेमानपणा, पंत पुरुषांनीं फक्त आपल्याचसाठीं राखून ठेवला आहे. स्वराज्यनिष्ठ, स्वामिनिष्ठ, राजनिष्ठ हिंदू रमणींना बेमानपणा । शब्दच माहीत नाहीं. संस्थानशीं द्रोह करणारी, स्वराज्याचा द्वेष करणारी, देवी अहिल्येशीं बेमानपणा करणारी स्त्री इंदुरांत, माळव्यांत नव्हे सर्व हिंदुस्थानांत आपणाला सांपडणार नाहीं. पंत, स्त्रियांच्या विषयीं आपला कयास चुकला. आपल्या शहाण्या अकलेनें आपल्याला फसविलें. मुत्सद्दीपणा चुलींत गेला. आपल्याशीं अधिक बोलण्याचें मला कारण नाहीं. ज्या कामासाठीं आपण मला बोलाविलें तें काम झालें असें मला वाटतें. मी आतां जातें पण जातांना, पंत, मी आपणांला इतकेंच सांगतें कीं होळकरांची अहिल्या देवी श्री भवानी मातेचा अवतार आहे. होळकरांचे इंदूर श्री सतीपार्वतीचें निवासस्थान. तेव्हां श्री अहिल्या देवीचा द्रोह करून नरकाचे वाटेकरी होऊं नका. संस्थानचा नाश करून स्वराज्य द्वेशी बनूं नका. ( जाते. )

**बाळाजीपंत**—मसलत फसली ! महेश्वर दरबारावरील आम्हीं बहिस्कार काढला तर दरबारनें आमच्यावर घातला. दरबारशीं सहकारिता करण्याकरितां हात पुढें केला तर दरबारनें असहकारिता पुकारून आपला हात मागें खेंचला. दरबारांत प्रवेश करण्याकरतां वर्तनांत फेरफार केला पण दरबार नाफेरवाला बनला. कांहीं हरकत नाहीं. जोंपर्यंत हें मुत्सद्दी डोकें शाबूत आहे, तोंपर्यंत मी कुणाचीहि पर्वा करीत नाहीं. वाटेल तो फेरफार करीन, वाटेल त्याला हाताशीं धरीन, वाटेल तें कुलंगडें उपस्थित करीन, पण सगळ्या जगाकडून असें म्हणून घेईन कीं बाळाजीपंत......

( चंद्रचूड व तुकोजीराव प्रवेश करतात. )

**चंद्रचूड**—लवकर रथ तयार करावयाला सांगा. राजवाड्याकडे आतांच जावयाचें आहे. ( बाळाजीपंत जातो. ) सेनापती साहेब, तुमचा बेत कायम झाला म्हणायचा ?

तुकोजीराव—होय. आज इंदूरला पोंचल्याबरोबर लष्कराला तयार होण्याचा हुकूम देणार आणि उद्यां पहांटेस उदेपुराकडे कूच करणार.

चंद्रचूड—सेनापती, मला राहून राहून फार आश्चर्य वाटतें तें हें कीं, या अहिल्याबाईसाहेबांचा हुकूम इतक्या सक्त रीतीनें तुम्ही कां पाळावा ?

तुकोजीराव—तो झुगारून देण्याची माझी छाती नाहीं म्हणून. बाई-साहेबांना मी जितका भितों तितका प्रत्यक्ष थोरल्या सुभेदारांनाही भीत नव्हतों. त्यांच्याकडे वर दृष्टी करण्याची आपली तर कांहीं छाती नाहीं. सकाळींच नाहीं पाहिलेंत ? मोठ्या मुष्कीलीनें दोन वाक्यें बोललों. माझी तर अशी ठाम समजूत आहे कीं, त्यांच्या तेजस्वी नेत्रांकडे पाहा-ण्याची प्रत्यक्ष चंद्रचूडांचीही किंमत नाहीं. त्यांच्या हुकमी आवाजांतून निघालेली आज्ञा प्रत्यक्ष त्यांच्या कट्टया दुष्मानालाही मोडतां येणार नाहीं.

चंद्रचूड—आपला निश्चय ठरलाच असेल तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. मग आतां तुम्ही निघायला विलंब लावूं नये हें बरें.

तुकोजीराव—मी कुठें विलंब लावतों ? मघांपासून मीच आपला निरोप सारखा मागत आहें, पण आपलें बोलणेंच संपेना. आतां मात्र मी थांबणार नाहीं. उगीच उशीर होतो.

चंद्रचूड—छे, छे, तुम्हीं उशीर करूंच नका. हा आम्हीं तुम्हांला निरोप देतों. या. उदेपूरचें राजकारण यशस्वी करून लौकर परत या.

तुकोजीराव—मी जातों तर आतां.

चंद्रचूड—या. ( तुकोजीराव जातो ) माझ्या या कारस्थानीं नाट-कांत मनानें खंबीर पण वाचेनें दुबळ्या असलेल्या या तुकोजीराव पात्राचा कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. काय मौज आहे ! लढाईत शत्रूंच्या माना सपासप सफाई करणारा हा मर्द वीर या अहिल्याबाईपुढें कसा गोगलगाय बनून जातो ! लोक म्हणतात त्याप्रमाणें तिच्यांत खरेंच ईश्वरी अंश असेल काय ? दुबळ्या अंतःकरणाच्या लोकांना वाटतें त्या

प्रमाणें ही इंदूरची राणी, होळकरांची अहिल्यादेवी महादेवाच्या भवानी देवीचा अवतार असणें शक्य आहे काय ? कांहीं असलें तरी तिच्यांत कांहीं तरी विशेष आहे यांत शंका नाहीं. पावित्र्याचें तेजोवलय तिच्या भोंवती आहे. होळकरांची अहिल्यादेवी तेजस्वी नाहीं असें म्हणण्याचें धाडस, तिच्या दुष्मानाला, प्रत्यक्ष या चंद्रचूडाला सुद्धां होणार नाहीं.

बाळाजीपंत—( प्रवेश करून ) रथ जोडून तयार आहे.

चंद्रचूड—ठीक आहे. आलोंच. ( बाळाजीपंत जातो. ) अधिकार ही एक अजब चीज आहे. अधिकाराच्या या जालीम जहराच्या एकाच घोटानें दारूच्या शेंकडो प्याल्यांचा कैफ चढतो. यौवन दशेंत सदा संचार करणाऱ्या या सत्ता–सुंदरीची सत्ता एकदां हातीं आल्यावर ती दवडण्याची इच्छा मद्यपी माथेफिरूलाही होत नाहीं. सृष्टिकर्त्या परमेश्वराला निर्विकार असे विशेषण देतात; पण आपण उत्पन्न केलेल्या सृष्टींत आपल्या सत्ते-खेरीज एक पानही हालूं नये अशी इच्छा या निर्विकार परमेश्वराची पाव-लोपावलीं दिसून येतें. या जड व अजड पदार्थांची अधिकारासाठीं चाललेली ही धडपड पाहून हें सर्व जग सत्तेच्या आशेवर चाललें आहे असें वाटतें. हिंदुस्थानाच्या किंबहुना सर्व राष्ट्रांच्या इतिहासाकडे जर आपण नजर फेंकली तर असें दिसून येईल कीं, इतिहास म्हणजे सत्ता–सुंदरीच्या स्वयं-वरासाठीं झालेल्या युद्धाची जंत्री. कौरवपांडवांचे महायुद्ध सत्तेसाठींच झालें. सत्तेच्या लालसेनेंच बाबरशहानें हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्लीचें तक्त मिळविलें. या सत्तेच्या इच्छेनेंच टोपावाल्याच्या क्लाईव्हनें आपलें दैव फ्रासीला पणाला लावून डाव जिंकला. इतकेंच नव्हे तर स्वराज्यस्थापना या गोड नांवाखालीं छत्रपती शिवाजी महाराजांची अधिकारलालसाच मला दिसून येते. तेव्हां सर्व ब्रह्मांडाची जिच्याकरतां धडपड चालली आहे अशी ही सत्ता–सुंदरी अनायासें हातीं सांपडली असतां तिला मीं हातची कां दवडावी ? या अधिकार देवतेला प्रसन्न करण्याकारितां इंदूरच्या राणीचा मला बळी द्यावा लागला तर त्यांत गैर काय झालें ? राणीच्या मांडीवर एकादें शेंबडें पोर बसवून त्या दत्तकाच्या नांवाखालीं या होळ-करांच्या अहिल्या देवीला संस्थान वेगळी करण्याचें माझें कारस्थान साध-



चंद्रचूडः—मराठेशाहीची आहुती पडली तरी बेहत्तर.

(अं. १ पृ

त्यास माझ्या अप्रतिहत सत्तेच्या मार्गांत मग कोण आडवें येणार ? दत्त-कालला नाखुषी जर राणीनें दाखविली तर श्रीमंत दादासाहेबांचा तिला शह देतां येईल. श्रीमंत दादासाहेबांनीं कां कूं केलें तर श्रीमंत पेशव्यांचा संस्थान खालसा करण्याचा हुकूम मिळविण्याचा प्रयत्न करून तो त्यांना लावला पाहिजे. तसा हुकूम देण्याचें जर श्रीमंत पेशव्यांनीं नाकारलें तर निजाम, नबाब, रोहिले, मुंबईकर, फिरंगी या सर्वांचें काहूर त्यांच्यावर उठविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अप्रतिहत सत्तेसाठीं फेंकलेल्या या जाळ्यांत सर्वच जर अडकले तर त्याला मी काय करणार ? या चंद्रचूडाचा अधिकार असाच अबाधित राहिला पाहिजे. आणि एवढ्याचकरतां या आरंभिलेल्या यज्ञांत इंदूरची, पेशव्यांची प्रत्यक्ष मराठेशाहीची आहुति पडली तरी बेहेत्तर ! ( जातो. )

---

## प्रवेश तिसरा.

( स्थळ—महेश्वरांतील राजवाडा. अहिल्या प्रविष्ट. )

**अहिल्या**—वृन्दावनांत गोपींच्या घरीं खोड्या करून लोणी खाणारा हा चोर पंढरपुरांत कमरेवर हात ठेवून साळसुदासारखा कसा उभा राहिला आहे पहा ! कान्ह्या, अर्जुनाचे घोडे खाजवून भागलास कीं द्रौपदीचे जोडे उचलून दमलास ? जनाबाईचे जोंधळे दळून थकलास कीं पुंडलिकाची वाट पाहून कंटाळलास ? वृंदावनांत बांसरीवर नाचणारीं हीं बोटें कमरेवर खिळल्यामुळें आपल्या मंजुळ वेणुरवानें गोपींना मोहित करणारा हा शाम एकाद्या अकालीं पोक्तपणा आलेल्या मनुष्याप्रमाणें दिसत आहे ! शाम, पुन्हा हात वर उचलून त्या बांसरीच्या मधुर आवाजानें हें जग भरून टाकणार नाहींस का ? त्या बन्सीच्या गोड आलापांनीं वृंदावनांतील भाग्यशाली गोपींप्रमाणें आम्हां अभागी जनांचीं अंतःकरणें थरारून सोडणार नाहींस का ? तें तुझें स्वर्गीय संगीत या पापी अहिल्येला तूं एकवार ऐकवणार नाहींस का ? मेरे गिरिधरलाल........

५ पद.

मधुरा वांसरीं । आपुली वजाव रे कान्हा ॥ धृ० ॥
मंजु बोल श्याम प्यारे । हे ताप निवारी सारे ।
हा हारवी धीरा बारे । जीव हा बावरे । दावी तुझीच
हो लीला ॥ १ ॥

विदुराच्या घरच्या कण्यांनीं व द्रौपदीनें दिलेल्या भाजीच्या पानानें पोट भरून सुस्ती आली काय ? पैठणला नाथांच्या घरीं पाणी भरून भरून श्रम झाल्यामुळें तुला गाढ झोंप लागली कीं, नामदेवानें पायाला मारलेली घट्ट मिठी तुला सोडवेना ? पण देवा, द्रौपदीच्या हांकेला ओ देऊन धांवत आलास, आणि या अहिल्येनें मारलेली हांक तुला ऐकूंही येऊं नये ? पांडवांच्या द्रौपदीपेक्षां होळकरांच्या अहिल्येचा धांवा तुला कमी प्रतीचा वाटला म्हणायचा ! स्त्रीवेष धारण करून सखूचा उद्धार केलास. अंत्यजाच्या वेषानें बेदरच्या शहाला, प्रत्यक्ष यवनाला दर्शन दिलेंस. छोट्या ध्रुव बाळाला उराशीं कवटाळून धरलेंस. बटुवामनाच्या रूपानें बळी दानवाचा द्वारपाळ झालास. महेश्वराच्या रूपानें महेश्वरांत अवतीर्ण झालेल्या गोपालकृष्णा, रामचंद्राचा अवतार घेऊन ज्याप्रमाणें गौतमाच्या अहिल्येचा उद्धार केलास, त्याप्रमाणें या होळकरांच्या अहिल्येचाही उद्धार तूं करणार नाहींस कां ?

६ पद.

प्यारे कृष्ण बोल सखया । राधे कृष्ण बोल कधिंही
उद्धरीसि बोल ॥ धृ० ॥ हांक श्रवणि कां ये नच
सदया । उद्धरिली गौतम मुनि जाया । लागतसे
ही दुबळी पाया । कशि सांग ये न करुणा जन्म
होइ फोल ॥ १ ॥

पण या संस्थानच्या संसाराचा पाश जोंपर्यंत सुटला नाहीं तोंपर्यंत या परमार्थाच्या गोष्टी बोलून उपयोग काय ? स्वतःच्या गोवऱ्या नर्मदेवर गेल्या आहेत, आज ना उद्यां यमराजांचें बोलावणें येण्याचा संभव; अशी

स्थिती असतांना या चंद्रचूडाची अधिकारतृष्णा अधिकाधिकच वाढत आहे. आजपर्यंत होळकरांचें अन्न खाल्लें; आणि आतां हा बेमान मुत्सद्दी संस्थान खालसा करण्यासाठीं श्रीमंत दादासाहेब पेशव्यांशीं म्हणे मसलत करणार आहे! नरक का कोणता दुसरा आहे. या बेमान लोकांचा सहवास हाच नरकवास! चंद्रचूडांच्या कारस्थानाविषयीं सकवारनें सांगितलें म्हणून त्यांत भिण्याजोगें कांहींच नाहीं. तरी पण आपण सावध असावें हें बरें. कारण विषारी सापावर पाय पडला तरच तो दंश करतो, पण हे विश्वासघातकी मानवी सर्प अपराध नसला तरीही संधि मिळतांच दंश करितात. विसाजीपंत............

**विसाजी**--( प्रवेश करून ) सरकार......

**अहिल्या**--विसाजीपंत, सकवारनें सांगितलेली बातमी लक्षांत असेलच तेव्हां............

**विसाजी**—आपण हुकूम द्या म्हणजे आतां त्याला लंबें करून साडतों.

**अहिल्या**—छे, छे, तसा अविचार आम्हांला करायचा नाहीं. शिवाय, दिवाणबहादुर चंद्रचूड संस्थानचे जुने नोकर. बेमान होण्याचें त्यांच्या मनांत आलें आहे. अझून बेमानपणा त्यांच्या हातून झाला नाहीं. पण आपण बेसावध राहून चालणार नाहीं! म्हणून दोन हुषार हेरांना बहाद्दुर चंद्रचूड यांच्या पाळतीवर ठेऊन त्यांच्या प्रत्येक हालचालीची क्षुल्लक बातमीही आम्हांला समजण्याची व्यवस्था करा. त्यांचें प्रत्येक कृत्य आम्हांला कळण्याची तजवीज करा.

**विसाजी**—हुजूरच्या आज्ञेप्रमाणें व्यवस्था करतों.

**अहिल्या**—कविवर्य मोरोपंत पराडकर गेले काय?

**विसाजी**—त्यांनां इथं राहावें म्हणून मीं फार प्रयत्न केला.......

**अहिल्या**—दरबाराकडून वार्षिक नेमणुकीची गोष्ट काढली नाहीं काय?

**विसाजी**—तीही काढली पण आपणाला बारामतीखेरीज कुठेंहि राहायचें नाहीं आणि बापूजी नाईकाखेरीज कुणाचेंही अंकित व्हायचें नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. आणि आज दुपारीं ते निघूनहि गेले.

**अहिल्या**—असे पुण्यपुरुष आम्हां राजे लोकांजवळ कुठले रहायला ! आमच्या भोंवतीं नेहमीं स्वार्थी, निंदक, कावेबाज अशाच लोकांचा गराडा पडलेला असायचा ! देवाच्या पूजेंत अडथळा आणणाऱ्या नोकरीवर तुळशीपत्र ठेऊन अडचण दूर करणारा हा महात्मा लहरी राजांचा बंदा होऊन कशाला राहील ? सरस्वती देवीचे हे लाडके पुत्र आपल्या विद्येनें आम्हांला खेंचून नेतात. आपण बंदे होण्याऐवजीं, विसाजीपंत, आम्हांला आपले गुलाम करतात.

७ पद.

धन मान वा । बुधजन कधिं जाणुनि न वरी परतंत्रता ॥ धृ० ॥
चरणीं त्यांच्या । जरि नमत श्री । त्यजित सकलहि दास करित॥१॥

**विसाजी**—संगमनेरचे प्रसिद्ध कवि कविराज अनंतफंदी......

**अहिल्या**—ते एक प्रासादिक कवि आहेत असें मीं ऐकलें आहे. पण ते ब्राह्मण असून तमाशा करतात ही गोष्ट खरी काय ?

**विसाजी**—होय. डफावर थाप पडल्याखेरीज कविराजांना स्फूर्तीच होत नाहीं, व त्यांच्या गाण्याला रंगही चढत नाहीं. जणूं काय डफावरील बोलाबरोबरच कविता देवीचे मंजुळ बोल बाहेर पडतात ! ते पुण्याकडे फारच प्रसिद्ध आहेत.

**अहिल्या**--त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल आणि अद्भुत कवित्वशक्तीबद्दल कविवर्य मोरोपंतही स्तुति करीत होते.

**विसाजी**—ते नुकतेच इथें आले आहेत; आणि महेश्वर दरबाराकडून आपली कांहींतरी संभावना व्हावी म्हणून सरकारच्या दर्शनाला येणार आहेत असें ऐकतों.

**अहिल्या**—त्यांना अवश्य इकडे घेऊन या. विसाजीपंत, ते जरी इकडे येणार नसले, तरी देखील त्यांना इकडे घेऊन या. हे अविचारी तरुण जात्या निर्मल वृत्तीचे असतात; पण संगतीनें बहकतात. कादंबरीचा प्रसिद्ध कवि बाण हाही तरुणपणीं असाच बहकलेला होता म्हणे. पण पुढें निवळला. त्याचप्रमाणें हे संगमनेरचे कविराज......

सेवक—( प्रवेश करून. ) अनंतफंदी सरकारच्या दर्शनासाठीं आले आहेत.

अहिल्या—जा विसाजीपंत, त्यांना सन्मानानें आंत घेऊन या ( विसाजी व सेवक जातात. )

अहिल्या—वेळींच औषध पोंचलेला रोगी ज्याप्रमाणें सुधारण्याची बरीच आशा असते, त्याचप्रमाणें या अविचारी तरुणांना सन्मार्गाचा कडू काढा कित्येक वेळा जबरदस्तीनें पाजला असतांहि त्याचा चांगलाच परिणाम होण्याचा संभव असतो.

( विसाजी अनंतफंदीसह प्रवेश करतो. )

अहिल्या—या. कविराज, या. असे या आसनावर बसा.

अनंतफंदी—( स्वगत ) काय हें दिव्य तेज ! काय ही गंभीर वृत्ति ! ह्या होळकरांच्या अहिल्या देवीला प्रत्यक्ष पाहिल्यावर, ही भवानी मातेचा अवतार नाहीं असें कोण म्हणणार ? या तपस्विनीला पाहिल्याबरोबर मला तर नवजीवनाचा संचार झाल्याप्रमाणें वाटूं लागलें आहे !

अहिल्या—कविराज आपलें कुशल आहे ना ? या आसनावर बसा.

अनंत०—माघळ्यांच्या होळकरांच्या अहिल्या देवीला हा अनंतफंदी वंदन करीत आहे.

अहिल्या—छे, छे, कविराज आपण भूदेव. आम्ही आपल्याला वंदन करायचें. आपण नाहीं ! बसा कोणीकडून आलांत ?

अनंत०—श्रीमंत दादासाहेब पेशव्यांचा मुक्काम हल्लीं मावळ्यांतच आहे, त्यांच्या छावणीकडून इकडे आलों.

अहिल्या—छावणीकडील कांहीं विशेष खबर !

अनंत०—खबर कांहीं विशेष नाहीं. श्रीमंत दादासाहेब आपला मावळ्यांतील तळ उठवून सैन्यासह इंदूरवरून थेट महेश्वरपर्यंत येणार असल्याची छावणींत दाट वदंता आहे.

अहिल्या—महेश्वरपर्यंत ? महेश्वरांत श्रीमंतांचें काय काम आहे ?

**अनंत०**—महेश्वराच्या अहिल्या देवीच्या खजिन्यांत कुबेराची संपत्ती भरली आहे असा लोकांचा, तसाच श्रीमंत दादासाहेबांचाही समज आहे.

**अहिल्या**—अस्सं ! अस्सं ! थोरल्या सुभेदारांच्या मागें शत्रूपुढें हात टेकावे लागले ते आतां घरच्यावर उगारण्याची इच्छा आहे वाटतें ? महेश्वरवर स्वारी करून आपलें नांव, सोमनाथावर स्वारी करणाऱ्या गझनीच्या महंमदाप्रमाणें इतिहासांत अजरामर करून ठेवण्याची श्रीमंत दादासाहेबांची इच्छा आहे काय ?

**अनंत०**—तशी कशी असेल. पण, सरकार, श्रीमंत पेशव्यांना आणि त्यांतून दादासाहेब पेशव्यांना देणें नाहीं असें कधींच झालें नाहीं. आणखी त्यांत या पानपतच्या युद्धाची भर पडलेली ! तेव्हां अशा प्रसंगीं श्रीमंतांचें लक्ष महेश्वरच्या खजिन्याकडे लागावें यांत नवल नाहीं. आणि श्रीमंताना या खजिन्यावर आपला हक्क आहे असेंही वाटतें.

**अहिल्या**—हक्क ? कविराज, स्त्रीच्या धनावर प्रत्यक्ष तिच्या पतीचाही हक्क नसतो. फक्त दानधर्मांत खर्च होणारा हा महेश्वरचा खजिना होळकरांच्या अहिल्येचा आहे; इंदूरच्या राणीचा नव्हे, इंदूर संस्थानचा नव्हे.

**अनंत०**—पण या महेश्वरच्या दानधर्माच्या कीर्तीनेंच दादासाहेबांची दृष्टी खेंचली जाऊन तिला दृष्ट होण्याची वेळ आली आहे. कर्णालाही लाजविणाऱ्या आपल्या दानधर्माचा डंका ऐकूनच श्रीमंतांची स्वारी महेश्वरला येत आहे.

**अहिल्या**—येऊं द्यात. तृप्त होऊन जातील. श्रीमंत पेशवे जातीनें ब्राह्मण, तेव्हां छत्रपतींच्या या पंतप्रधानांनीं आमच्यापुढें पदर पसरून भिक्षांदेही ह्मणून जर याचना केली तर ही होळकरांची अहिल्या आपल्या सर्वस्वाचें दान करायला तयार आहे! पण राहूं द्या त्या गोष्टी. कविराज छावणींतून इथपर्यंत आपण सुखरूप आलां नां ?

**अनंत०**—इकडे येत असतां वाटेंत भिल्लांच्या हातीं सांपडलों. लगेच मी एक कवन करून त्या भिल्लांच्या नायकाला म्हणून दाखविलें. त्यामुळें

तो इतका खूष झाला कीं, त्यानें मला सोडून देण्याविषयीं ताबडतोब हुकूम दिला. आणि मी जेव्हां त्याला सांगितलें कीं, मी महेश्वरास आपल्या दर्शनासाठीं निघालों आहे, तेव्हां त्यानें मला एक पोषाख व दोनशें रुपये बक्षीस दिले व पांचशें भिल्ल बरोबर देऊन महेश्वरच्या वेशीपर्यंत आणून पोंचविलें.

अहिल्या—कविराज आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेचा व ब्रह्मतेजाचा हा प्रभाव.

अनंत०—छे, छे, हा महेश्वराच्या या भवानी देवीच्या, होळकरांच्या अहिल्यादेवीच्या तपश्चर्येचा प्रभाव! दुसऱ्याच्या प्राणासाठीं हपापलेले भयंकर भिल्ल या दिव्य तेजानें दिपून जाऊन इंदूरच्या राणीसाटीं अहिल्यादेवीच्या अनुचरांसाठीं ही आपले प्राण खर्चायला तयार होतात.

अहिल्या—कविराज, शीघ्रकवी म्हणून आपली प्रसिद्धी आहे. या खिडकींतून समोर दिसणाऱ्या माझ्या उमामहेश्वराच्या मंदिराकडे पहा. तो समोर पसरलेला नर्मदाप्रवाह नीट अवलोकन करा. या माझ्या महेश्वराचें, पार्वतीपरमेश्वराच्या निवासस्थानाचें तुम्हांला वर्णन करतां येईल का?

अनंत०—हुजूरची आज्ञा होईल तर पाहतों प्रयत्न करून.

अहिल्या—कां कविराज स्फूर्ती होईना? या नैसर्गिक सौंदर्याकडे पाहिलें म्हणजे असेंच होतें. मनुष्य मोहून जातो. बुद्धि कुंठित होते. या मूर्तिमंत ब्रह्माचें वर्णन करायला शब्दब्रह्मही असमर्थ होतें.

विसाजी—किंवा कदाचित डफाच्या थापेबरोबर धांवत येणाऱ्या स्फूर्तिदेवीला कविराजांची ही कोरडी हांक ऐकूं जात नसेल.

अहिल्या—खरें का कविराज? असेल तसेंहि असेल. आपण भीड धरूं नका. विसाजीपंत त्यांना एक डफ आणून द्या.

अनंत०—बाहेर आमची मंडळी उभी आहेत त्यांच्याजवळ माझा डफ आहे तोच घेऊन या. ( विसाजी डफ घेऊन येतो. )

विसाजी—आतां बरोबर जमलें.

अनंत०— ८ पद.

नर्मदा निकट तट घाट । बहुत अफाट । पायऱ्या दाट । चिरे वाट । मुक्तिचीं शिवालयें । कैलास साम्यता नाना परिची रचना रचिली । रामकृष्ण मंदिरें । बहुत सुंदरें । बांधिलीं घरें । रमे रमणूक हवेल्या । नयनीं पाहिल्या । नूतन थाट । प्रताप अहिल्या । किल्यावर तळवटीं । शहर गुलजार । बहुत बाजार । हजारों दुकानें लक्षापती सावकार । भारी भारी माल खजिना रस्ता स्वस्त। सुकाळ नाहिं दुकाळ बाळ वृद्ध प्रतिपाळ करिती । गरिब गुरिब कंगाल गांजले । अडले भिडले । त्यां देखोनियां अन्नछत्र सरि सारखे । नाहिं पाहिले नयनीं पारखे महेश्वर क्षेत्र पूर ॥ १ ॥ दानधर्म करि नित्य शिवार्चन सत्वशील ऐकुनि धांवती । देशोदेशींचे राजे कर्नाटक । तैलंग द्रविड । वऱ्हाड कऱ्हाड कोल्हापूर कृष्णातीर गंगातीर। कोंकण काशी-कर। गव्हावळ माळवे विरांगडे । येति कावडेवेडे बावडे गुज-राथी अथुलि पुरी । भारती दिगांबर जटाधारी बैरागी योगी कानफाटे दर्शना येती । हरिदासांचे प्रेमळ भक्तसांप्रदाय पुष्कळ पाहिले नयनीं । सर्व महेश्वर क्षेत्रपूर ॥ २ ॥

अहिल्या—गोड फारच गोड. कविराज आपलें हें कवन आपल्याकुशाग्र बुद्धीची चांगलीच साक्ष पटवितें. आपल्या बुद्धीचें वर्णन करूं कीं या गोड कवनाची तारीफ करूं ? पण कविराज, आपणांला किंवा लोकांना मंजुळ वाटणारे हे डफावरील बोल मला मात्र कर्णकटू वाटले. आपण शीघ्रकवी. पण आपलें शीघ्रकवित्व डफावरील बोलांच्या हातांत ! आपण ब्राह्मण ! सर्व जगाला वंदनीय पण धंदा तमाशा करण्याचा. अशा वागण्यानेंच ब्राह्मणांची किंमत जाते. अशा धंद्यांनींच कविराज, ब्राह्मणांची इज्जत जाते. हल्लीं ब्राह्मणांनीं ब्राह्मवृत्तीचा त्याग करून बाकी सर्व वृत्तींचा अंगिकार केला आहे. तुम्ही आपण होऊन आपली अवनती करून घेतली आहे. मग सर्व जग तुम्हां ब्राह्मणांना हसले, तुमची छी थू केली तर तुम्हांला वाईट कां वाटावें ? तमाशा करणारा अनंतफंदी ! कानाला गोड लागतें नाहीं ?

कविराज आपण बुद्धिमान आहांत. आपल्या कुशाग्र बुद्धीचा दुरुपयोग करून तमाशांतील लावण्या रचून लोकांचें मनरंजन करण्यापेक्षां त्या लोकांच्या नाथाचें, आदिपुरुषाचें जर गुणवर्णन केलेंत तर तुमचा स्वतःचा त्याचप्रमाणें दुसऱ्याचाही उद्धार होईल. कविराज, ही इंदुरची राणी आपल्याला पदर पसरून विनंती करते कीं, हा तमाशाचा धंदा सोडून आपलें ब्राह्मण्य कायम राखा. परमेश्वराच्या गुणवर्णनानें आपलें काव्य पुनीत करा. लोकांकडून नांवें ठेऊन घेऊं नका. जगाकडून हंसें करून घेऊं नका.

**अनंत०**—सरकार ज्याप्रमाणें या अनंतफंदीला या निर्जीव डफांतून मंजूळ बोल काढतां येतात, त्याचप्रमाणें त्यावर अशी थाप मारून त्याला कायमचें मुकेंही करून टाकतां येतें. आज माझे डोळे साफ उघडले. प्रत्यक्ष भवानीमातेनेंच मला आज उपदेश दिला. सरकार, आपल्या पायाशपथ, आजपासून या अनंतफंदीनें तमाशा करायचें सोडलें. यापुढें हा अनंतफंदी लोकांपुढें उभा राहिलाच तर हरिदास याच रूपानें उभा राहिलेला दिसेल. सरकार, आजपर्यंत असा उपदेश मला कुणी केलाच नव्हता. आज आपण माझा उद्धार केलात. हा पश्चात्तापानें शुद्ध झालेला अनंत, महेश्वराच्या भवानी मातेला, होळकरांच्या अहिल्या देवीला, आपल्याला वंदन करून आपलें नष्ट झालेलें ब्राम्हण्य पुन्हा मी परत मिळवितों. ( सा. न. करतो. )

**अहिल्या**—हं. हं. कविराज हें काय ? विसाजीपंत, कविराजांची योग्य संभावना करा. आणि त्यांच्याकडून मघाचें कवन उतरून घ्या. ( अनंतफंदी व विसाजीपंत जातात. )

**अहिल्या**—किती सरळ मनाचा हा तरुण; पण केवळ कुसंगतीनें बिघडला. पण श्रीमंत दादासाहेबांना दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार करण्याची बुद्धी कां सुचूं लागली ? दुसऱ्याच्या दौलतीविषयीं अभिलाष उत्पन्न झाला कीं, स्वतःच्या दौलतीला आहोटी लागलीच म्हणून समजावें. महेश्वरच्या संपत्तीचा, होळकरांच्या इंदूरचा, आपल्या स्वतःच्याच सरदाराच्या दौलतीचा असा अभिलाष धरून श्रीमंत दादासाहेब हें दुहीचें बीं मराटेशाहींत कां पेरून ठेवीत आहेत? या दुहीनेंच केव्हांतरी या अवाढव्य

मराठेशाहीचा अंत होणार. परमेश्वरा, या अंतःकलहापासून आम्हां मराठ्यांना दूर ठेव, आणि या मराठेशाहीचें पेशवाईचें रक्षण कर. उमा महेश्वरा, या दुहीच्या पेटलेल्या आगींत होरपळून जाणाऱ्या या होळकरांच्या इंदूरचें रक्षण कर. तुझ्याशिवाय आम्हांला कोण आधार ?

९ पद.

**जीवासि आधार। करि मोह मम दूर। दे धीर हींच पदिं प्रार्थना ॥ धृ० ॥ संधान सारें जग होतसे। पंथा न हंत जरि भावना ॥ १ ॥**

**चंद्रचूड**—( प्रवेश करून ) सरकार तसदीची माफी असावी. उद्यां पहांटे इंदूरला जाणार तेव्हां आपल्याला भेटायला आलों. कांहीं हुकूम आहेत काय ?

**अहिल्या**—हुकूम कांहीं नाहींत पण चंद्रचूड, श्रीमंत दादासाहेब पेशवे महेश्वरच्या खजिन्याच्या आशेनें महेश्वरला येणार आहेत असें मी ऐकतें.

**चंद्रचूड**—नुसत्या महेश्वरच्या खजिन्याच्या आशेनें कीं इंदूर संस्थानच्या आशेनें कुणास ठाऊक ? संस्थानला औरस वारस कुणी नाहीं; आपण सदोदित परमार्थसाधनांत दंग; हें पाहून श्रीमंत दादासाहेबांचे मनांत इंदूर संस्थान खालसा करून आपल्या ताब्यांत घेण्याचें येणें अगदीं स्वाभाविक आहे. आणि महेश्वराला येण्याचा हेतूही तोच असावा.

**अहिल्या**—( स्वगत ) तो तुझा हेतू आहे कीं दादासाहेबांचा ! काय नीच आहे ! ( उघड ) मग चंद्रचूड याला उपाय ?

**चंद्रचूड**—याला उपाय ? याला उपाय हाच कीं एखादा कुलीन घराण्यांतील छोटासा मुलगा आपण दत्तक घेऊन त्याच्या नांवानें संस्थानचा कारभार चालविण्याचें कुणातरी अनुभाविक मुत्सद्यांकडे सोंपवून या काळजींतून आपण कायमचें मुक्त व्हावें.

**अहिल्या**—आणि मी दत्तक घेण्याचें नाकारलें तर ?

**चंद्रचूड**—श्रीमंत दादासाहेब पेशवे इंदूरवर चाल करून येतील. इंदूरच्या राणीला पोटगी ठरून संस्थान खालसा होईल आणि संस्थानची

व्यवस्था संस्थानच्या कारभाराची पूर्ण माहिती असलेल्या एखाद्या मुत्सद्याकडून पेशवे सरकारमार्फत होईल.

अहिल्या—पण ही संस्थानची मालकीण जिवंत असतां हें संस्थान खालसा करण्याचा श्रीमंत दादासाहेबांना काय हक्क ?

चंद्रचूड—हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें स्त्रियांना राज्यावर बसण्याचा अधिकार नाहीं.

अहिल्या—राज्यावर बसण्याचा अधिकार जरी नसला तरी राज्यकारभार चालविण्यास माझी मी मुकत्यार आहे. चंद्रचूड तुम्ही सांगतां तो उपाय मला संमत नाहीं. दत्तक घेण्याची माझी इच्छा नाहीं. आमच्या नशिबीं जर पुत्रसुख असतें तर आज चांगला कर्ता सवरता मुलगा ईश्वरानें कां नेला असतां ? सुभेदारांनीं आपलें रक्त सांडून मिळविलेली ही दौलत वाटेल त्याच्या स्वाधीन करण्यास मी तयार नाहीं. चंद्रचूड, संस्थानचें रक्षण जर तुमच्या हातून होत नसेल तर स्वस्थ बसा. रक्ताचा सडा घालून संपादन केलेली दौलत कशी सांभाळावी हें या होळकरांच्या अहिल्येला चांगलें माहीत आहे. तुम्हां मुत्सद्यांना मी चांगलेंच ओळखतें. दादासाहेबांचें कारस्थान यशस्वी होईल असें जर तुम्हांला वाटत असेल तर तो निव्वळ भ्रम आहे. या सुभेदाराच्या सुनेशीं गांठ आहे. स्त्रीपुढें खालीं मान घालण्याचा प्रसंग आला तर लज्जेला सीमाच उरणार नाहीं. चंद्रचूड, तुम्ही इंदूरला उद्यांच निघून चला. नीट सावधगिरीनें वागा. आणि हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, होळकरांवर उमामहेश्वराचें पूर्ण छत्र आहे. संस्थानवर कांहीं संकट आलें तर परमेश्वराच्या कृपेनें त्यांतून संस्थानची मुक्तता होऊन इंदूरची कीर्ति व होळकरांचें यश सर्व हिंदुस्थानभर दुमदुमत राहील.

## १० पद.

हरित दुरीत हरि करि अवन भरण । छलन होत जरी खलासि
दंडन ॥ धृ० ॥ तारक हा हरि । होळकरावरि । छत्र धरित
तरि । तया भय लव न ॥ १ ॥

## अंक १ ला समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

( दादासाहेब पेशव्यांची छावणी. दादासाहेब प्रविष्ट. )

दादा०—आनंदी ! आनंदी ! ही गेली तर कुठें ! या राघोबा पेशव्याला आनंद देणारी ही आनंदी गेली तर कुठें ? आनंदी ! कुणीच ओ देत नाहीं. कुठें गेली असावी बरें ही ? काय चमत्कार आहे ! इथें आल्याबरोबर आपल्या हास्यमुद्रेनें व गोड शब्दांनीं स्वागत करणारी आनंदी आज मला न दिसल्यामुळें माझा आनंद कसा मावळला. प्रेमी जिवाला त्याच्या प्रेमाची वस्तु क्षणभर जरी दृष्टीआड झाली तरी तें सहन होत नाहीं. स्त्रीजात निर्माण करणाऱ्या विधात्या, तुझ्या बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच. आनंदस्वरूप स्त्रीजात निर्माण करून तूं या निरस जगाला सरस बनविलेंस यांत शंका नाहीं. सर्व जग स्त्रीच्या प्रेमासाठीं हापापलेलें आहे. किंबहुना स्त्रीच्या प्रेमावरच सर्व जग चाललें आहे. या प्रेमापायींच शंकरानें मोहिनीभोंवतीं तांडव केलें. नूरजहानच्या प्रेमासाठींच जहांगिरनें आपलें सर्वस्व तिच्यावरून कुरबान करून टाकलें. आणि या पेशव्यांच्या राघोबाचें मनही प्रेमासाठींच आनंदीच्या आनंदी मुखासभोंवती घिरट्या घालीत आहे. आनंदीचा मुखचंद्र नेहमीं प्रसन्न राखण्याकरतां मी काय करणार नाहीं ? आनंदीची इच्छापूर्ती हेंच माझें ध्येय. आनंदीच्या प्रेमाकरितां, आनंदीच्या प्रेमानें भरलेल्या एकाच कटाक्षाकरितां मी काय वाटेल तें करायला तयार आहें. मग जग मला हसलें, जगानें मला बाइलबुद्ध्या, स्त्रैण म्हटलें तर मला वाईट कां वाटावें ? पण, आकाश फाटून हजारों संकटांचा वर्षाव जरी झाला तरी तिळमात्र न डगमगणारें या मर्दाचें हें खंबीर मन आनंदी एक क्षणभरच नजरेसमोर नसल्यामुळें इतकें चलबिचल होऊन जावें हें जरा आश्चर्यच नव्हे काय.

११ पद.

प्रेमांध धीमंद जन हाचि व्हावा ? । नारी नरा एक हृदया विसावा ॥ ध्रु० ॥ श्वसनें सुखा देत । नयने विदारी । करी अंध, आनंद जरि होत बन्धन ॥ १ ॥

पण हा पहा. माझा मूर्तीमंत आनंद इकडे येत आहे. पण इच्या हातांत हें पत्र कुणाचें ? आणि तें वाचण्यांत अगदीं गढून गेल्यासारखी ही दिसते. ( आनंदी प्रवेश करते )

आनंदी—( वाचते ) " आपण मल्हारराव सुभेदारांचे मानसपुत्र, आणि पेशवे म्हणून संस्थानचे धनी, तेव्हां दोन्हा नात्यांनीं संस्थानची मालकी आपणाकडेच येते. आपल्या मनांत दत्तक घ्यावयाचा नाहीं असें बाईसाहेब सध्यां दाखवीत आहेत पण आपल्या हातांतील सत्ता इतक्यांत जाऊं नये म्हणून तो कदाचित् त्यांचा कावाही असावा. पण असेंच स्त्रीराज्य चालू राहिल्यास शत्रू प्रबळ होईल. मराठेशाहीला धोका पोंचण्याचा संभव. तेव्हां आपण या वेळीं इंदुरास येऊन संस्थान ताब्यांत घेतल्यास मराठेशाहीवरील पुढील अरिष्टें टाळल्यासारखी होऊन कैलासवासी सुभेदारांच्या इच्छेला मान दिल्याप्रमाणें होईल. "

दादा०—आनंदी !

आनंदी—"होळकरांच्या अहिल्या राणीला, सुभेदारांनीं पेशव्यांची इतके दिवस सेवा केली म्हणून त्यांच्या इतमामाला साजेल अशी नेमणूक करून द्यावी !"

दादा०—आनंदी !

आनंदी—बस असेंच केलें पाहिजे. पुण्याची पेशवाई जर आमचे भाऊबंद आम्हांला लाभूं देत नाहींत तर ही माळव्याची चालत आलेली लक्ष्मी आम्ही तरी कां लाथाडावी ? पुणें नाहीं तर इंदूर. पेशवाई नाहीं तर होळकरशाही. इकडे असें अगदं सांब असायचें, हे मेले सगळे ओंकारेश्वरावर गेल्याशिवाय पेशवाईची वस्त्रें आम्हांला कुठलीं मिळायला ! तें कांहीं नाहीं. पुण्याच्या पेशव्यांच्या नाकावर टिचून माळव्याचे राजे म्हणून स्वतंत्रपणें इंदूरवर राज्य करूं. इंदूर संस्थान खालसा केलेंच पाहिजे.

होळकरांच्या अहिल्येला असें दूर ढकलून तिच्या जागीं ही पेशव्यांची आनंदी.........

दादा०—तुला मी दोन हांका मारल्या पण...

आनंदी—मला एकही ऐकूं आली नाहीं. क्षमा करायची. कितीवेळ झाला स्वारीला येऊन ?

दादा०—बराच वेळ झाला. पण आपण इतका वेळ कुठें होतां. एवढ्या कसल्या महत्वाच्या राजकारणांत गुंतला होतां हें आम्हांला सांगण्यांची कृपा होईल का ?

आनंदी—त्याच कामाची सुनावणी मी आतां हुजूरपुढें करणार आहे. श्रीमंतांची इच्छा असेल तर......

दादा०—आमच्या इच्छेचा प्रश्न आपण ठेवला आहे कुठें ? लोकांचे पेशवे आम्हीं तर आमचे पेशवे तुम्ही. आपण तोंडातून शब्द काढायचा आणि आम्ही तो मुकाट्यानें झेलायचा एवढेंच आम्हांला माहित. पण आनंदी, आज ही तूं दरबारी भाषा कुठली काढली आहेस ?

आनंदी—दरबारी काम असलें म्हणजे भाषाही दरबारीच वापरावी लागते. श्रीमंतांची इच्छा असेल तर दासीची एक विनंति आहे.

दादा०—विनंति कां म्हणतेस ? आज्ञा आहे म्हण !

आनंदी—विनंतीच म्हटलें पाहिजे. बायकांच्या इच्छा पुरुषांना नेहमी पसंत पडतातच असें कांहीं नाहीं.

दादा०—असें कां म्हणतेस ? आनंदी, आजपर्यंत मी तुझी एक तरी इच्छा मोडली आहे काय ? तुझ्याकरितां मी काय करणार नाहीं. सांग ! सांग ! तुझी काय इच्छा असेल, तुझी काय आज्ञा आहे तें तुझ्या या निस्सीम भक्ताला एकदम सांगून टाक.

**१२ पद.**

**सखि बोलना मानिच्या वचना । नय बंध का मधुभाषणा ॥ धृ० ॥ झणिं सांग या मनिषा स्वयें । तव दास हा पुरवी सलये ॥ १ ॥**



दादा०—लोकांचें पेशवे आम्ही तर आमचे पेशवे तुम्ही.

( अं. २ पृ. ३४ )

आनंदी—महाराष्ट्राचा भगवा झेंडा अटकेपार फडकवून सबंध हिंदुस्थान पेशव्यांच्या नांवानें आपणच काबीज केलें नां ? पानपतचा सूड घेण्याची कल्पना पहिल्यानें आपल्याच मनांत आली नां ? कालचे थोर पेशव्यांच्या गादीवर असतां अजून पेशवाईची इतिश्री झाली नाहीं याचें कारण आपलाच दरारा नां ? लगामाला आपण आणि तोबऱ्याला मात्र पुण्याचे पेशवे.

दादा०—आतां त्यासंबंधानें बोलून काय उपयोग ? ज्या वेळां छत्रपतींनीं पेशव्यांचीं वस्त्रें माधवाला दिलीं त्याच वेळीं या प्रश्नाचा निकाल लागला.

आनंदी—त्यांनीं दिलीं कीं छत्रपतींनां बाहुलें करून पुण्याच्या पेशव्यांनीं तीं घेतलीं ?

दादा०—कांहीं झालें तरी माधव हल्लीं पेशवा आहे. आपणच त्याला लहानाचें मोठें केलें आहे. झालें तें बरेंच झालें. शिवाय, झाल्या गेल्या गोष्टींचा खल करून डोक्याला विनाकारण शीण देण्यांत काय अर्थ आहे ? आणि या वेळीं भलत्याच गोष्टीची चर्चा करण्याचें कारण तरी काय ?

आनंदी—आपल्याला स्त्रियांच्या हृदयाची पारख नाहीं. आम्हां स्त्रियांच्या मनांत आपल्या पतीच्या कल्याणचिंतनाचा विचार सदैव जागृत असतो. त्याला वेळ नाहीं, त्याला स्थळ नाहीं. पतीच्या अस्तित्वापुढें आम्हीं आपलें अस्तित्वच विसरतों. पतीचा उत्कर्ष हाच आमचा उत्कर्ष, पतीचा आनंद हाच आमचा आनंद. हें हृदय जर उकलून पाहिलें तर त्यांत आपलीच प्रतिमा व हेंच तत्व बिंबित झालेलें आपणास दिसून येईल.

दादा०—मग तुझें म्हणणें तरी काय ?

आनंदी—आपणांस पेशवे होण्याची इच्छा नाहीं काय ?

दादा०—आज सर्व हिंदुस्थान ज्याच्या पायीं लोळण घेत आहे तो सार्वभौम पेशवा होण्याचें कोणाच्या मनांत येणार नाहीं ?

आनंदी—मग आपण पेशवे कां होत नाहीं ?

दादा०—तें शक्य नाहीं म्हणून.

आनंदी—मनांत असल्यावर अशक्य काय आहे ? दगडाचा देखील देव करतां येतो. पण शक्य असलेली गोष्ट तरी करायला इकडची तयारी आहे काय ?

दादा०—कोणती गोष्ट शक्य आहे तें तरी कळूं द्या.

आनंदी—मल्हारराव मामंजी इकडे अगदीं मुलाप्रमाणें मानीत असत आणि इकडूनही त्यांना वडिलांप्रमाणें मान देणें होई. तेव्हां त्यांच्या मागें संस्थानवर इकडचाच हक्क पोंचतो. संस्थान खालसा करून माळव्याचे राजे म्हणून स्वतंत्रपणानें राज्य करतां येईल.

दादा०—इंदूरची राणी होण्याची इच्छा आहे वाटतें.

आनंदी—मी राणी होण्याची नाहीं, पण आपण माळव्याचे स्वतंत्र राजे झालेले पहाण्याची मात्र आहे.

दादा०—आणि याच एका गुणामुळें तूं मला माझ्या प्राणापेक्षांहि प्यार आहेस.

आनंदी—मग काय या चालत आलेल्या मावळ्यांच्या लक्ष्मीचा स्वीकार करावयाचा नां ?

दादा०—पण ही मावळ्याची लक्ष्मी चालत आलेली कशी ?

आनंदी—इंदूरहून संस्थानचे दिवाण गंगोबातात्या चंद्रचूड यांचें पत्र आलें आहे.

दादा०—मघाशीं वाचीत होतीस तेंच वाटतें ? मी तुला त्यासंबंधीं विचारणार होतों पण विसरलोंच. तूं समोर असलीस म्हणजे असेंच होतें. स्वतःचा देखिल विसर पडतो. मग पत्राचा पडेल ह्यांत काय नवल ? काय आहे त्या पत्रांत ?

आनंदी—स्वतःच पहायचं.

दादा०—( वाचून ) गंगोबातात्यांचा ओढा पहिल्यापासून आमच्याकडेच आहे. तेव्हां त्यांनीं असें लिहिणें अगदीं साहजिक आहे. पण माळव्यांचें राज्य आम्हाला कसें मिळेल ?

आनंदी—इंदूर संस्थान खालसा करून.

दादा०—खालसा करण्याचें कारण?

आनंदी—संस्थान हल्लीं बेवारस आहे.

दादा०—पण इंदूरची अहिल्याराणी अझून जिवंत आहे.

आनंदी—हिंदूधर्मशास्त्राप्रमाणें स्त्रीला राज्याधिकार नाहीं.

दादा०—आणि उद्यां तिनें दत्तक घेतला तर?

आनंदी—दत्तक घेण्याची तिची इच्छा नाहीं हें या पत्रावरून स्पष्ट दिसतें; आणि उद्यां घेऊं लागलीच तर हें दत्तविधान घेणें पेशव्यांच्या राजकारणाला विघातक आहे असें म्हणून तिला प्रतिबंध करतां येईल.

दादा०—पण संस्थान खालसा केलें तरी त्यावर पुण्याच्या पेशव्यांचा अधिकार. आमचा काय हक्क?

आनंदी—मल्हारराव सुभेदार इकडे मानसपुत्राप्रमाणें लेखीत होते. तेव्हां संस्थानची मालकी पेशव्यांचे चुलते म्हणजे राज्याचे धनी आणि सुभेदारांचे पुत्र या दुहेरी नात्यानें आमच्याकडेच येणें रीतसर आहे.

दादा०—पण पेशव्यांना काय वाटेल? पुण्याच्या मुत्सद्यांना—माधवाला काय वाटेल?

आनंदी—अर्थात बरें वाटणार नाहीं. आम्हाला राज्य मिळालेलें पाहून पुण्याच्या मुत्सद्यांच्या पोटांत दुखूं लागेल. पेशव्यांच्या चुलत्याचें माळव्यांतील वैभव त्यांच्या प्रिय पुतण्याला खात्रीनें आवडणार नाहीं.

दादा०—मग?

आनंदी—त्यांना आवडणार नाहीं म्हणून राज्य मिळविण्याची चालत आलेली सुसंधी आपण दवडायची?

दादा०—पण अशा करण्यानें आपसांत लढाईचा प्रसंग ओढवायचा.

आनंदी—शक्यच नाहीं. आणि तसा जर आलाच तर शिंदे, भोसले, मुंबईकर, सखारामबापू हे मदतीला आहेतच.

दादा०—आणि सुभेदारांच्या अहिल्याराणीशींच तोंड देण्याची वेळ आली तर?

आनंदी—हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतीच्या वीराशीं एक असहाय हिंदु विधवा तोंड द्यायला तयार होईल ही कल्पनाच चुकीची आहे.

दादा०—पण होळकरांची अहिल्या तेजस्वी आहे असें मी ऐकतों.

आनंदी—होळकरांची तेजस्विता पेशव्यांच्या तेजोरविपासून आहे. सर्व हिंदुस्थान आज ज्यांच्या नांवानें थरथर कांपतें आहे ते आपण खरे पेशवे. मग काय इंदुरला जायचं नां ?

दादा०—तुझ्या इच्छेबाहेर मी नाहीं. पण माझें मन थोडें कचरतें आहे. याचा शेवट ठीक होवो म्हणजे झालें.

आनंदी—शेवट ठरलेलाच आहे. उद्यांच्या उद्यां तळ हालवून इंदूरकडे कूच करण्याचा हुकूम सैन्याला द्यायला कारभाऱ्यांना सांगूं काय ?

दादा०—थांब जरा.

आनंदी—असा माझा हिरमोड करूं नये. पेशवे नाहीं तर नाहीं पण निदान इंदूरचे राजे झालेलें तरी आपणास पाहावें एवढी या दासीची इच्छा आहे तेवढी पूर्ण कराच.

दादा०—असा केविलवाणा चेहरा करूं नकोस. तुझी मुद्रा पाहिली म्हणजे माझ्या मनाचा अगदीं गोंधळ उडून जातो. जा. लाडके तुला जें योग्य दिसेल तें कर. आम्हांला या राजकारणांत कांहीं समजत नाहीं. आम्ही आमचा सर्व राज्यकारभार जहांगीर बादशहाप्रमाणें या आमच्या नूरच्या हातीं सोंपविला आहे. आनंदी, लाडके नूर, आजपासून राजकारणाच्या कोणत्याही बाबतींत मला विचारण्याचें कांहीं कारण नाहीं.

आनंदी—मग उद्यां तळ हालविण्याचा हुकूम देऊं काय ?

दादा०—आतां पुन्हां विचारण्याचें कारण काय ? जा. तुझ्या इच्छेला येईल तो हुकूम दे. जहांगीर बादशहाचीं सूत्रें ज्याप्रमाणें नूरजहान हालवीत होती त्याप्रमाणें या पेशव्यांच्या राघोबाचीं सूत्रें ही आनंदी, माझी लाडकी नूर हालविते हें सर्व जगाला समजूं दे. जा. ( ती जाते. ) याचा शेवट काय होणार ? कोणत्याही कार्याला हात घालण्यापूर्वीं लागत असलेला आत्मविश्वास असा डळमळूं कां लागावा ! आजपर्यंत माझें मन

केव्हांही कचरलें नाहीं,मग आजच असें कां व्हावें? त्या अहिल्या देवीशीं—सुभेदाराच्या सुनेशीं गांठ आहे. काय होतें कुणाला ठाऊक! पण जाऊं दे तो विचार. आनंदीच्या शब्दाकरितां, आनंदीच्या इच्छेकरितां प्रत्यक्ष पुण्याच्या पेशव्यांशीं दोन हात करण्याचा प्रसंग आला तरी माझी तयारी आहे. कारण आनंदी शहाणी आहे. तिची सल्ला केव्हांही गैर असणार नाहीं. आनंदीला स्वतःचा विचार मनाला सुद्धां शिवत नाहीं. तिची प्रत्येक कृती, प्रत्येक विचार या राघोबाविषयीं असतो. सर्व जग पाहिजे तर आनंदीला महत्वाकांक्षी स्त्री म्हणूं दे; पुढील इतिहास आनंदीला पाहिजे तर घरांत दुही माजविणारी, कुटिल कारस्थानी स्त्री ठरवूं दे. पण हा राघोबा पेशवे, आनंदीच्या प्रेमानें वेडा झालेला हा राघोबा, पतिप्रेमानें बेहोष होऊन स्वतःला विसरणारी ही आनंदी निस्वार्थी महासती असेंच जगाला जाहीर करणार.

१३ पद.

**खास महासती। हो ती। बघुनी मुखा आनंद मनाप्रती ॥धृ०॥**
**पति सुखरता हो कीं। लोकीं विमानिता जरि। सेवी करिन द्विधामती ॥ १ ॥** ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

( बाळाजीपंत प्रवेश करतो. )

**बाळाजीपंत**—आतां या कारस्थानी नाटकाला रंग चढूं लागला. इंदूरच्या राणीनें दत्तकाची सूचना फेटाळून लावल्याबरोबर आमचे दिवाणजी डोकें धरून बसले. पण हा दिवाणांचा दिवाण कुठला गप्प बसायला? सरदार चंद्रचूडांच्या नेमस्ती उपायांना बाजूला ठेऊन दिवाण बहारांच्याकडून एक जहाल पत्र श्रीमंत दादासाहेबांना लिहविलें. गोळी कशी अचूक लागली. मी पत्र पोंचविण्याचा अवकाश श्रीमंतांची स्वारी ताबडतोब तळ हलवून या इंदूरच्या मार्गाला लागली. याला म्हणतात उपाय. याला म्हणतात जहाली तडफ. हो असें तडफदाज जहाल झाल्या-

खेरीज अशा नेमस्ती मवाळपणानें कां कुठें राज्य मिळत असतें ? एक दोन दिवसांत श्रीमंत दादासाहेब इंदूरला येऊन थडकणार, इंदूर संस्थान खालसा होणार; सरदार चंद्रचूडांची सत्ता अबाधित राहणार आणि हा बाळाजीपंत लवकरच पहिल्या प्रतीचा सरदार बनणार. या सर्व गोष्टी यक्षिणीची कांडी फिरल्याबरोबर एक दोन दिवसांच्या आंत घडून येणार. शाबास बाळाजीपंत. तुमच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच. तुमचा जय होवो. तुमचें कारस्थान यशस्वी होवो. एकदां ही इंदूरची सरदारकी हातीं आल्यावर मग पुण्याची पेशवाई मिळवायला कितीसा वेळ लागणार आहे ? पुण्याचे पेशवे होणें हें माझें ध्येय. पण आस्ते कदम हप्त्याहप्त्यानेंच राज्य मिळवीत गेलें पाहिजे. महेश्वरच्या दरबारांत प्रवेश करून आपलें कारस्थान साधण्याचा माझा विचार होता. म्हणून मी सकवारचीं आर्जवेंहि केलीं. पण तिनें कांहीं दाद लागूं दिली नाहीं. पण आतां पारडें उलटलें. सकवार आपण होऊन आतां दाद मागण्याकरितां येईल. पण जरी ती आली तरी तिला मी स्वच्छ सांगणार......

**सकवार**—( प्रवेश करून ) काय सांगणार ?

**बाळाजीपंत**—कीं ती एक गुप्त गोष्ट आहे. इंदूरच्या मुत्सद्यांनीं महेश्वरच्या राणीला पाडलेला तो एक पेंच आहे. आम्हां इंदूरच्या मुत्सद्यांचें तें एक मोठें कारस्थान आहे.

**सकवार**—पण इंदूरच्या राणीला इंदूरच्याच मुत्सद्यांनीं पेंचांत आणण्याचें असें मोठें कारस्थान काय रचलें आहे तें तरी समजूं दे.

**बाळाजीपंत**—वाः फार चांगलें. इंदूरच्या मुत्सद्यांनीं श्रीमंत दादासाहेब पेशवे यांच्याशीं संधान बांधून इंदूर संस्थान खालसा करण्याचें कारस्थान चालविलें आहे ही गोष्ट तुम्हाला सांगून. मुत्सद्यांनीं आपल्या गुप्त गोष्टी कुणालाही सांगूं नयेत हा जो राजनीतीचा मूलसिद्धांत आहे तो मी मोडूं इच्छीत नाहीं.

**सकवार**—इंदूर संस्थान खालसा करण्याचें कारस्थान ! कोण खालसा करणार ?

**बाळाजीपंत**—मी. आम्ही इंदूरचे मुत्सद्दी.

सकवार—बाळाजीपंत, तुम्हीं काय बोलत अहां याची शुद्ध तरी आहे कां तुम्हांला ? इंदूर संस्थानविषयीं अशा प्रकारचे उद्गार काढून तुम्हीं धडधडीत राजद्रोह करीत आहांत.

बाळाजीपंत—मुळींच नाहीं. इंदुरच्या अधिकाऱ्याविरुद्ध एक चकार शब्द सुद्धां मी तोंडांतून काढीत नाहीं. सकवारबाई, आम्हीं मुत्सद्दी आपल्या बोलण्यानें कायद्याच्या कचाट्यांत केव्हांही सांपडणार नाहीं. कारस्थान करण्याचा आम्हा मुत्सद्यांना पूर्ण अधिकार आहे. किंबहुना कारस्थान करणें हा मुत्सद्यांचा धंदाच आहे. तेव्हां आम्ही इंदूरच्या राणीविरुद्ध कांहीं कारस्थान केलें तर त्यांत पाप काय झालें ? अधिकाऱ्यांच्या वर्तनावर टीका न करतां इंदूर संस्थान खालसा होणार असें म्हटलें त्यांत राजद्रोह कसा होतो ?

सकवार—पंत तुम्हीं संस्थानचें अन्न खातां !

बाळाजीपंत—आणि म्हणूनच मी माझ्या वरिष्ठांची सेवा इमानेंइतबारे करतों. सरदार चंद्रचूडांची आज्ञा अक्षरशः पाळणें हेंच माझें कर्तव्य. वरिष्ठ संस्थानच्या ज्या कामगिरीवर पाठवतील ती बजावणें इमानी नोकराचें कर्तव्यच आहे. आणि तेवढ्याच करितां......

सकवार—बेमान दिवाणबहादुरांचें पत्र घेऊन श्रीमंत दादासाहेबांकडे गेला होता वाटतें !

बाळाजीपंत—हो न जावें तर वरिष्ठांचा हुकूम मोडल्यासारखा होतो. संस्थानची शिस्त बिघडते.

सकवार—पण गेल्याप्रमाणें कामगिरी तरीं बजावून आला ना !

बाळाजीपंत—माझ्या कर्तबगारीसंबंधानें शंकाच नको. पत्र पोंचतांक्षणींच श्रीमंतांची स्वारी इंदूरच्या मार्गाला देखील लागली. एक दोन दिवसांत ससैन्य दाखल होईल.

सकवार—एकूण तुम्हीं दिवाण बहाद्दुरांची कामगिरी चांगली बजावली म्हणायची.

बाळाजीपंत—माझ्या समजुतीप्रमाणें संस्थानची कामगिरी चांगलीच बजावली यांत शंका नाहीं.

**सकवार**—पंत, आपण ब्राह्मण......

**बाळाजीपंत**—आणि काशीयात्राहि केली आहे.

**सकवार**—काशिला जाऊन फक्त लाज तेवढी सोडल्यासारखी दिसते. पंत, तुमच्यासारखे निर्लज्ज तुम्हींच. आजपर्यंत ज्यांचें अन्न खाल्लें त्यांच्याच जिवावर उठलांत ! तुमच्यासारखे बेमान लोक या इंदुरांत आहेत म्हणून या अहिल्या देवीच्या इंदूरला अशी स्थिती येऊं लागली आहे. तुमच्यासारख्या दुष्ट वृत्तीच्या लोकांच्या मत्सरी दृष्टीनें या महेश्वरच्या राणीच्या रामराज्याला दृष्ट लागत चालली आहे. ज्या इंदुरांत आजपर्यंत मोतीं वेंचलें त्याच इंदुरांत तुम्हीं आतां गोंवऱ्या वेंचायला लावायला तयार झाला आहांत. पंत, तुम्हांला अशी बुद्धी कां सुचूं लागली आहे? आपल्या मालकिणीच्या जिवावर उठून तुम्हांला काय फायदा होणार?

**बाळाजीपंत**—मी पहिल्या प्रतीचा सरदार होणार !

**सकवार**—पंत, त्या सरदारींत कांहीं जीव आहे कां? घराला आग लागली असतां पराच्या गाद्यांवर सुखानें झोंप येईल काय? आपल्या स्वातंत्र्याची विक्री करून मिळविलेल्या या संपत्तीला कांहीं मान आहे काय? स्वराज्यांतील स्वातंत्र्याचा लिलांव करून कोट्याधीश होण्यांत तुम्हांला आनंद वाटतो काय? पंत, सावध व्हा. तो आनंद खरा नव्हे. खोटा आहे. तें सुख खरें नव्हे; सुखाचा आभास आहे. पंत, तुम्हांला पदर पसरून विनंति आहे. वेळ आणीबाणीची आहे. झालें तें झालें. अशा वेळीं निमकहराम बनूं नका. आपल्या मालकिणीच्या जिवावर असें उठूं नका. चला, असे माझ्याबरोबर चला. आणि काय खरी हकीकत असेल ती अहिल्या राणीला सांगून तिची क्षमा मागा. मी अश्शी पुढें जातें तोंपर्यंत तुम्हीं याच. ( जाते. )

**बाळाजीपंत**—जा. खुशाल जा. मी मात्र येणार नाहीं. स्वराज्याच्या नादीं लागून मी मात्र चालत आलेल्या सरदारीला लाथ मारणार नाहीं. स्वराज्याची कांस धरून सर्व जन्म दारिद्र्यांत काढण्यापेक्षां एखाद्याच्या सुराज्याखालीं कोट्याधीश होऊन राहणें अधिक चांगलें. ( जातो. )

---

## प्रवेश-तिसरा.

( इंदूर. अहिल्या प्रविष्ट )

अहिल्या—

१४ पद.

खेळत नंद कुमार ! कुमार हा। घाली मना भूल महा ॥ धृ० ॥ विनती करी मी ही। वनवन धाई हा । हरि भटकत राहे पहा ! हा छळितचि दानी महा । सांग या। घालि मना भूल महा ॥ १ ॥

किती गोड गाणें हें. हा नंदाचा खट्याळ कुमार इतक्या खोड्या करित होता, तरी मनाला भूलच पडत होती नाहीं ? या गाण्यानें जर मन इतकें तल्लीन होऊन जातें; तर श्रीकृष्णाच्या या लीला प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोपींची तारांबळ उडत असेल यांत नवल तें काय ? कुणी बिचाऱ्यानें गाणें तरी किती गोड रचलें आहे ! जणुं कांहीं एखादी गोपी यशोदा-माईकडे गाऱ्हाणें सांगत आहे असेंच वाटतें. विसाजीपंत, ( विसाजी येतो ) कांहीं विशेष खबर ?

**विसाजी**—श्रीमंत दादासाहेब पेशवे सैन्यासह इकडे येण्यासाठीं निघाले आहेत.........

**अहिल्या**—आणि ते एकदोन दिवसांत इथें इंदूरला येऊन पोंचतील.

**विसाजी**—सरकारला माझ्यापेक्षांहि अधिक बातमी आहे.

**अहिल्या**—नुकतीच ही बातमी सकवारकडून समजली. आणखी कांहीं विशेष ?

**विसाजी**—कालची बातमी एवढीच. आजची खबर अजून आली नाहीं. त्या कामगिरीवर पाठविलेले लोक.........

**सेवक**—( प्रवेश करून ) दर्शनाच्या हुकमाची वाट पहात बाहेर उभे आहेत.

**अहिल्या**—त्यापैकीं एकाला आंत पाठवून दे.

( सेवक जातो. हेर प्रवेश करतो. )

**अहिल्या**—काय बातमी आहे ?

**हेर**—श्रीमंत दादासाहेबांचा आजचा संध्याकाळचा मुक्काम क्षिप्रेच्या तीरावर आहे.

**अहिल्या**—आणखी कांहीं ?

**हेर**—कांहीं नाहीं.

**अहिल्या**—ठीक आहे. जा आतां. थोडी विश्रांति घे आणि मग पुन्हां कामगिरीवर जा. ( हेर जातो )

**अहिल्या**—विसाजीपंत, त्या दुसऱ्या इसमाला आंत घेऊन या ( हेर येतो ) काय खबर ?

**२ हेर**—श्रीमंत दादासाहेब पेशव्यांच्या बरोबर पांच हजार सैन्य आहे. इकडील बातम्या वरचेवर त्याना पोंचत आहेत.

**अहिल्या**—ठीक आहे. जा. ( हेर जातो ) विसाजीपंत.........

**विसाजी**—पुढें हुकूम ?

**अहिल्या**—ब्राह्मणपुरा निमकहराम झाला. असे खाल्ल्या घरचे वासे मोजणारे लोक ज्या देशांत आहेत तो देश परक्यांनीं घशाखालीं घातला, तर त्यांत नवल तें काय ? पण कांहीं हरकत नाहीं. विसाजीपंत, हीच कसोटीची वेळ आहे. हाच आणीबाणीचा प्रसंग आहे. अशा वेळीं डगमगून भागावयाचें नाहीं. तुकोजीरावांना ताबडतोब इकडे येण्याविषयीं पत्र लिहा. शिंदे, नागपूरकर, गाइकवाड यांना मदत पाठविण्याविषयीं विनंतीपत्रें पाठवा. आणि या सर्व हकीगतीचें पत्र यशवंतराव फणशांच्या जवळ देऊन त्यांना पुण्यास श्रीमंत पेशव्यांच्याकडे रवाना करा. थोरल्या सुभेदारांच्या इच्छेप्रमाणें संस्थानची मालकी तुकोजीराव होळकरांच्याकडे देण्याचा माझा मानस आहे, हेंही त्यांत नमूद करा. जा एकदम कामाला लागा.

**विसाजी**—आज्ञेप्रमाणें व्यवस्था करतों.

**अहिल्या**—आणि विसाजीपंत, सर्व गोष्टी गुप्तपणेंच होऊं द्यात.

**विसाजी**—हें मला सांगण्याचें कारणच नाहीं. महेश्वरच्या राणीच्या हाताखालीं तयार झालेल्या लोकांना राजकारण कसें करावें हें चांगलेंच समजतें.

**अहिल्या**—तुमच्या कर्तबगारीसंबंधानें मला शंका नाहीं. पण आपलें सांगितलें. जा. आतांच्या आतां सांगितल्याप्रमाणें व्यवस्था होऊं द्या. ( विसाजी जातो. ) होळकरांच्या सेवेंत या चंद्रचूडाची साठीं उलटून गेली, आणि या विसाजीपंताला पुरीं तीस वर्षेंही झाली नसतील. पण दोघांत केवढा फरक ! एक माझ्या जिवावर उठायला तयार झाला आहे, तर दुसरा माझ्यासाठीं आपल्या जिवावर उठायला कमी करणार नाहीं. एक अधिकारासाठीं इंदूर संस्थानावर—स्वराज्यावर—संकट आणावयाला मागें पुढें पहात नाहीं तर दुसरा स्वराज्यासाठीं प्राणाचीहि आहुती द्यायला तयार आहे. पण या दादासाहेबांच्या स्वारीचा शेंवट तरी काय होणार ? चंद्रचूडाचें कारस्थान यशस्वी होऊन इंदूर संस्थान खालसा होईल काय ? छे:, हा विचारच मुळीं सहन होत नाहीं. नाहीं, केव्हांहीं नाहीं. जिवांत जीव असेपर्यंत इंदूरसंस्थान केव्हांहि खालसा होऊं देणार नाहीं. माझ्या संस्थानच्या रक्षणासाठीं, आजपर्यंत इतिहासांत कधींहि न घडून आलेलें असें अश्रुत पूर्व युद्ध झालेलें सर्व जगाच्या दृष्टीस पडेल. स्वत:च्या जन्मसिद्ध हक्कासाठीं प्राणहि देणें हें मनुष्याचें आदिकर्तव्य आहे. प्रजेच्या नैसर्गिक हक्कांचें रक्षण करणें हां आम्हां राजकर्त्यांचा धर्म आहे. शिवाय, हा जनतेचा जनार्दन माझें संकट निवारण करण्यास तयार असतां मी अपेशाची शंका कां धरावी ?

१५ पद.

शंका का मनिं याची धरावी । करित महेश्वर जरी
अवना ॥ धृ० ॥ दे विजया अभया तव पदासि विन-
वीत । शमवित हृदया या ॥ १ ॥

**सेवक**—( प्रवेश करून ) दिवाण बहादूर चंद्रचूड भेटीची अपेक्षा करीत आहेत.

**अहिल्या**—जा त्यांना आंत लावून दे. ( चंद्रचूड येतो. )

**अहिल्या**—या दिवाण बहादूर, असे आसनावर बसा. कां आला होता ?

**चंद्रचूड**—संस्थानच्या एका महत्त्वाच्या आणि नाजूक कामासाठीं आलों होतों, काम तसेंच महत्वाचें असल्यामुळें सरकारला तसदी देणें भाग पडत आहे.

**अहिल्या**—काय काम आहे बोला.

**चंद्रचूड**—संस्थान मोठ्या बिकट परिस्थितींत सांपडलें आहे. हुजूरच्या पूर्वीं कानावर घातल्याप्रमाणें श्रीमंत दादासाहेबांची स्वारी ससैन्य या इंदूरकडे वळली आहे.

**अहिल्या**—महेश्वरच्या खजिन्याच्या आशेनें कीं इंदूर संस्थानच्या आशेनें ?

**चंद्रचूड**—तें कसें सांगता येणार ? कदाचित दोन्ही विचारांनीं येत असतील. आणि काय साधेल ते पदरांत पाडून घेण्याचा त्यांचा इरादा असेल.

**अहिल्या**—संस्थानच्या दिवाण बहादूरांनीं या बाबतींत काय धोरण स्वीकारलें आहे ?

**चंद्रचूड**—श्रीमंताचे हुकूम निमूटपणें पाळण्याखेरीज दुसरा इलाज नाहीं. त्यांच्या हुकमाचा इनकार आम्हांला करतां येणार नाहीं.

**अहिल्या**—कां ? कां येणार नाहीं ? दादासाहेब पेशव्यांना विरोध कां करतां येणार नाहीं ? श्रीमंतांच्या जु मी, अन्यायी हुकमाचा न्याय असलेला इनकार आम्हांला कां करिता येणार नाहीं ?

**चंद्रचूड**—श्रीमंत पेशवे हिंदुस्थानचे धनी आहेत. दादासाहेब पेशवे पुण्याच्या पेशव्यांचे सख्खे चुलते. तेव्हां दादासाहेब पेशव्यांच्या आज्ञेचा भंग करणें म्हणजे पुण्याच्या पेशव्यांच्या राजसत्तेचा मानभंग करण्यासारखेंच आहे.

**अहिल्या**—पण पुण्याच्या पेशव्यांच्या परवानगीखेरीज दादासाहेबांना तरी संस्थानच्या बाबतींत ढवळाढवळ करण्याचा काय अधिकार ?

चंद्रचूड—हा प्रश्न दादासाहेबांना करण्याचा आम्हांला अधिकार नाहीं. संस्थान खालसा केलें किंवा महेश्वरचा खजिना लुटला तरी या वर्तनाबद्दल दादासाहेब पुण्याच्या श्रीमंतांना जबाबदार. ते त्यांना त्याबद्दल जाब विचारतील.

अहिल्या—मग हा जुलूम आम्ही निमूटपणें सहन करावा असें आपलें म्हणणें ?

चंद्रचूड—नाहीं तर दुसरा इलाज काय ? संस्थानचे संबंध मध्यवर्ती सरकारशीं अशाच प्रकारचे आहेत. शिवाय श्रीमंत दादासाहेब कांहीं एकटेच आलेले नाहींत. बराबर निदान पांच हजार तरी लष्कर आहे. आणि हल्लीं इंदूरांत आमचे पांचशेंहि लोक नाहींत सर्व सैन्य सेनापती तुकोजीरावांच्या बरोबर उदेपूरास गेलेले. नवीन लष्करभरती करावी म्हटलें तर संस्थानच्या तिजोरींत एक छदामहि शिल्लक नाहीं. तेव्हां श्रीमंत दादासाहेबांचे म्हणणें मुकाट्यानें कबूल करण्याखेरीज दुसरें गत्यंतरच नाहीं. महेश्वरच्या खजिन्यावरच जर ते संतुष्ट असले तर तो त्यांच्या स्वाधीन करून संस्थानचें रक्षण केलें पाहिजे. संस्थान आपल्या ताब्यांत राहण्याकरितां इंदूरचें मुत्सद्दी जो मुलगा पसंत करतील, त्याला दत्तक घेऊन संस्थानला वारस करून ठेवला पाहिजे. म्हणजे दादासाहेबांना इतक्या सुलभ रितीनें संस्थान खालसा करतां येणार नाहीं.

अहिल्या—चंद्रचूड, महेश्वरचा खजिना या होळकरांच्या अहिल्येचा आहे, त्याचा आणि संस्थानचा कांहीं संबंध नाहीं. एकाद्याची खासगी जिनगी छिनाऊन नेण्याचा भयंकर अन्याय करावयाला दादासाहेब पेशवे तयार होतील, असें मला वाटत नाहीं. आणि दत्तक घेण्याची माझी इच्छा नाहीं, ही गोष्ट मी मागें तुम्हांला सांगितली आहे.

चंद्रचूड—परिस्थितीच अशी प्राप्त झाली आहे कीं, सरकारनीं मुत्सद्यांच्या सांगण्याप्रमाणें वागण्यांतच संस्थानचें हित आहे, सरकारचें हित आहे. मुत्सद्यांची सल्ला फार दूरवर विचार करून दिलेली असते. सरकारनीं रागावूं नये. पण प्रेमकुंवरबाईचा मुत्सद्यांनीं दिलेला निकाल जर सरकारनीं कायम केला असतां तर पैशाचा प्रश्न आज संस्थानपुढें पडला नसता. आणि लष्करची भरती कशी करावी, ही काळजीही लागली नसती.

**अहिल्या**—त्याचप्रमाणें त्या अन्यायी निकालानें होळकरांच्या तोंडाला कायमचा लागणारा कलंकही पुसला गेला नसता.

**चंद्रचूड**—राजकारणांत न्यायान्यायाचा विचार फारसा करावयाचा नसतो.

**अहिल्या**—पण त्याला अगदीं झुगारून देऊनही चालत नाहीं. चंद्रचूड तुमच्या म्हणण्याचा मला शांतपणें विचार केला पाहिजे. आज चांगला विचार करून उद्यां काय तो माझा विचार सांगेन.

**चंद्रचूड**—माझें म्हणणें असें आहे कीं, सरकारनीं आतां विचारच करूं नये. कारण अवधीं फारच थोडा आहे. पेशव्यांच्या इतमामाला साजेल अशा प्रकारचें श्रीमंत दादासाहेबांचें स्वागत संस्थानकडून करण्याच्या तयारीला लागलें पाहिजे. तसेंच इंदूरची प्रजा राजनिष्ठ आहे. हे दर्शविण्यासाठीं श्रीमंताचें स्वागत लोकांकडून स्वेच्छेनें करविलें पाहिजे.

**अहिल्या**—स्वेच्छेनें आणि करविलें पाहिजे. अगदींच विरुद्ध विधान. आणि चंद्रचूड, लोकांनीं स्वेच्छेनें स्वागत करण्याचें नाकारलें तर ?

**चंद्रचूड**—तो राजद्रोह होईल आणि अशा लोकांना आम्हांला शासन करणें भाग पडेल. आणि असा प्रसंग येऊं नये, एवढ्याचकरितां दवंडी पिटवून सर्व नागरिकांना राजवाड्यासमोर बोलावून त्यांना राजनिष्ठेचा धडा शिकवला पाहिजे. आणि त्यांच्याकडून स्वागताचा समारंभ करविला पाहिजे.

**अहिल्या**—पण ती राजनिष्ठा सक्तीची होईल.

**चंद्रचूड**—अधिकाराच्या जोरावर ती खुषीची करतां येईल.

**अहिल्या**—पण या सर्व गोष्टी करावयालाच पाहिजेत कां ?

**चंद्रचूड**—आपले बेत मुक्रर करून मगच मुत्सद्दी आपल्या तोंडांतुन उद्गार बाहेर काढीत असतात. मला वाटतें सरकारनीं मला आतां परवानगी द्यावी.

**अहिल्या**—तुमच्या इच्छेप्रमाणें दवंडी पिटवा. आणि बाकीचे बेत मी उद्यां माझा विचार तुम्हांला कळविल्यावर मग निश्चित करा.

चद्रचूड—ठीक आहे. जशी आज्ञा. मी आतां परवानगी घेतों. सरकारनीं जरा विश्रांती घ्यावी. ( जातो )

अहिल्या—पक्का बदमाष आहे. अप्रतिहत अधिकाराच्या नुसत्या कल्पनेनेंच कैफ येऊन हा कसा बेमूर्वत बनला आहे. आपलें कारस्थान यशस्वी झालें, असेंच या घमेंडखोर मुत्सद्याला वाटत आहे. पण माझ्याशीं या सुभेदाराच्या या सुनेशीं गांठ आहे, हे या शहाण्या मुत्सद्यांच्या गांवीही नाहीं. या घमेंडखोर मुत्सद्यांची फजिती होऊन अखेरीस होळकरांचें राज्य असेंच अबाधित राहणार असें माझी मनोदेवता मला स्पष्टपणें सांगत आहे. कारण भक्ताचें रक्षण करणाऱ्या त्या उमामहेश्वराचे होळकरांवर पूर्ण छत्र आहे. भक्तांच्या हांकेला धांवणाऱ्या श्रीकृष्णा, माझा भार आतां तुझ्यावरच. तूंच मला या संकटांतून तार.

१६ पद.

काल दैवा देई बोला लाज सावळ्या तुला ही ॥ धृ० ॥
घोर जिवा लागला हा । कोण मजसि हा । मज विसावा तूंची देवा धांव कालिया सख्या ॥ १ ॥

( पडदा )

---

## प्रवेश चवथा.

( क्षीप्रेवरील वाळवंट. चंद्रप्रकाश. दादासाहेब प्रविष्ठ )

दादासाहेब—किती मजेदार चांदणें पडलें आहे हें ? आम्हां मराठ्यांच्या, शिवछत्रपतीच्या निर्मल यशाप्रमाणें नितांत धवल असलेल्या या सुधाकराच्या अमृतमय किरणांनीं कुणाला आनंद होणार नाही ? क्षिप्रेच्या या अथाग पात्रांत आपला मुखचंद्र निरखून पाहणारा ही निशासुंदरी आरशांत वारंवार आपला सुंदर चेहरा पाहणाऱ्या एखाद्या नटव्या रमणीप्रमाणें भासत आहे. सृष्टि देवतेनें आपल्या शीतल, वायुरूपी हातांनीं थोपटल्यामुळें सर्व लोक अखंड निद्रासुखाचा अनुभव घेत आहेत.

समोर पसरलेलें हें विस्तीर्ण वाळवंट काळाच्या पोटांत गडप झालेल्या उज्जयनीच्या वैभवाची चांगलींच साक्ष पटवितें. याच क्षिप्रेच्या तीरावर बसून कविकुल गुरूला जगाला वेड लावून सोडणाऱ्या शाकुंतल नाटकाची स्फूर्ती झाली. याच उज्ज्यनीच्या विक्रमानें महापराक्रम करून हिंदुस्थानांत एक छत्री राज्य केलें. अंतरिक्षांतील सूर्य मंडळाला शोभा देणाऱ्या नवग्रहांच्या मालिकेप्रमाणें राजमंडळाला शोभा देणारी नव विद्वत्‌रत्नांची मालिकाही याच उज्जयनींत होती. पण सर्व काळाच्या उदरांत कुठें गडप होऊन गेले आहे, त्याचा पत्ताही नाहीं. सर्वजग परमेश्वराच्या इच्छेनेंच चाललें आहे परमेश्वराच्या इच्छेनेच मराठ्यांचें वैभव उत्कर्षाच्या शिखराला जाऊन पोचलें आहे. आणि परमेश्वराच्या इच्छेनेंच हा सुधाकरसुद्धां आपल्या अमृतमय शीतल किरणांनीं या महाकालाला पंचामृत स्नान घालीत आहे. आपल्या सुधामय किरणांनीं संजीवन देणाऱ्या निशानाथ, चालूं दे, तुझा अभिषेक असाच चालूं दे. सर्वजग ब्रह्मानंदानें भरून जाऊं दे, थांबूं नकोस कविकुल गुरुचें, अधिराज विक्रमाचें वैभवस्थान कालाच्या पोटांत नष्ट झालेले पाहून खेद मानूं नकोस. चंद्र किरणरूपी डाक्काची तलम मलमल नेसून अभिसारासाठीं चाललेली अवंतीसुंदरी पाहून बावरूं नकोस. तुझा सुधावर्षाव असाच चालूं दे. अहाहा काय आनंद आहे! मराठ्यांच्या हिंदमातेवर, स्वराज्य देवीवर अमृताचा अभिषेक करणाऱ्या इंदू देवते हा राघोबा तुला त्रिवार प्रणाम करित आहे.

१७ पद.

**पायीं तुझ्या नाथ नमित सेवी नतीला सुधाकरा ॥ धृ० ॥**
**नवबलदा करीं हिंदवि-राज्या अभिषेका । करि जगि प्रेमा भरून जाऊं दे सारा ॥ १ ॥**

पण थांब चंद्रा. थांब. हिमालयाच्या अत्युच्च धवलगिरी शिखराप्रमाणें धवलतम असलेल्या आपल्या किरणांनीं आनंद साम्राज्याच्या राज्याभिषेक मला एकट्यालाच करूं नकोस. या आनंद साम्राज्याची अनभिषीक्त सम्राज्ञी, या राघोबाची हृदयस्वामिनी आनंदी आपल्या हास्य मुद्रेनें सृष्टी

समोर पसरलेलें हें विस्तीर्ण वाळवंट काळाच्या पोटांत गडप झालेल्या उज्जयनीच्या वैभवाची चांगलींच साक्ष पटवितें. याच क्षिप्रेच्या तीरावर बसून कविकुल गुरूला जगाला वेड लावून सोडणाऱ्या शाकुंतल नाटकाची स्फूर्ती झाली. याच उज्ययनीच्या विक्रमानें महापराक्रम करून हिंदुस्थानांत एक छत्री राज्य केलें. अंतरिक्षांतील सूर्य मंडळाला शोभा देणाऱ्या नवग्रहांच्या मालिकेप्रमाणें राजमंडळाला शोभा देणारी नव विद्वत्रत्नांची मालिकाही याच उज्जयनींत होती. पण सर्व काळाच्या उदरांत कुठें गडप होऊन गेले आहे, त्याचा पत्ताही नाहीं. सर्वजग परमेश्वराच्या इच्छेनेंच चाललें आहे परमेश्वराच्या इच्छेनेच मराठ्यांचें वैभव उत्कर्षाच्या शिखराला जाऊन पोंचलें आहे. आणि परमेश्वराच्या इच्छेनेंच हा सुधाकरसुद्धां आपल्या अमृतमय शीतल किरणांनीं या महाकाळाला पंचामृत स्नान घालीत आहे. आपल्या सुधामय किरणांनीं संजीवन देणाऱ्या निशानाथ, चालूं दे, तुझा अभिषेक असाच चालूं दे. सर्वजग ब्रह्मानंदानें भरून जाऊं दे, थांबू नकोस कविकुल गुरुचें, अधिराज विक्रमाचें वैभवस्थान कालाच्या पोटांत नष्ट झालेले पाहून खेद मानू नकोस. चंद्र किरणरूपी डाक्काची तलम मलमल नेसून अभिसारासाठीं चाललेली अवंतीसुंदरी पाहून बावरूं नकोस. तुझा सुधावर्षाव असाच चालूं दे. अहाहा काय आनंद आहे ! मराठ्यांच्या हिंदमातेवर, स्वराज्य देवीवर अमृताचा अभिषेक करणाऱ्या इंदू देवते हा राघोबा तुला त्रिवार प्रणाम करित आहे.

१७ पद.

पायीं तुझ्या नाथ नमित सेवी नतीला सुधाकरा ॥ ध्रृ० ॥
नवबलदा करीं हिंदवि-राज्या अभिषेका । करि जगि प्रेमा भरून जाऊं दे सारा ॥ १ ॥

पण थांब चंद्रा. थांब. हिमालयाच्या अत्युच्च धवलगिरी शिखराप्रमाणें धवलतम असलेल्या आपल्या किरणांनीं आनंद साम्राज्याच्या राज्याभिषेक मला एकट्यालाच करूं नकोस. या आनंद साम्राज्याची अनभिषीक्त सम्राज्ञी, या राघोबाची हृदयस्वामिनी आनंदी आपल्या हास्य मुद्रेनें सृष्टी

देवतेनें केलेलें स्वागत स्वीकारीत इकडेच येत आहे. या आनंद साम्राज्याच्या सिंहासनावर आम्हां उभयतांना एकदमच अभिषेक होऊं दे. किती सावकाश पावलें टाकीत येत आहे ! आपल्या चंद्रिकेला प्रसन्न राखण्याकरितां, अंतरिक्षांत निशानाथानें, नाद ब्रह्माच्या मधुर संगीतावर तारकांच्या बरोबर चालविलेल्या रासक्रीडेला ही आपल्या मंद पावलांनीं जणुं कांहीं तालच देत आहे !

१८ पद.

हरित हृदय मानिती ये वाजत नूपुर हा । मंजु नाद सांगत रति येत मदन गेहा ॥ धृ. ॥ इंदु मोद भरीत होत ! नाचती उडु त्या नभांत । मंद मंद ताल धरीत । रास केलिला या ॥ १ ॥

आनंदी—( प्रवेश करून ) या आनंदाच्या शुभ प्रसंगीं आनंदीच्या आनंदी रमणाचा, श्रीमंतांचा, इंदूरच्या अधिपतींचा विजय असो.

दादा०—या राणीसाहेब या. या नितांत रमणीय काव्यमय प्रसंगाला आपल्यासारख्या दिव्य सुंदरीचीच फक्त उणीव होती.

आनंदी—श्रीमंतांना आज काव्यस्फूर्ती होऊं लागली आहे वाटतें !

दादा०—तुझ्या शुभ्रवर्णाप्रमाणें ही चंद्राची पांढरी शुभ्र प्रभा, विस्तृत केशकलापाप्रमाणें समोर कृष्णवर्ण पसरलेलें हें वाळवंट आणि तुझ्या माझ्या गाढ प्रेमाप्रमाणें अथांग असलेला हा क्षिप्रेचा शांत प्रवाह पाहून कुणाला काव्यस्फूर्ती होणार नाहीं ? कालिदासाच्या जन्मभूमीवर उभें राहून, तुझ्यासारखी रम्य रमणीजवळ असतां काव्योन्माद कुणाला होणार नाहीं ? तुझ्यासारख्या दिव्यसुंदरीच्या सौंदर्यानें मूक होऊन राहिलेल्या कविता-सुंदरीला वाचा तेव्हांच फुटेल.

१९ पद.

सुधासुंदरी ही मंदिरा येई । वंदि चरण संधि तिजला मिळे ही ॥ धृ० ॥ बघुनी मुखचंद्र हा । ही काव्यदेवी ! जरी मूक मधु बोल ही बोलते ही ॥ १ ॥

आनंदी—काय थंडगार वारा सुटला आहे! अंगाला कसा झोंबतो आहे.

दादा०—मग अशी दूर कां? ज्या वेळीं अग्निनारायणाला साक्ष ठेवून सौभगत्वासाठीं तुझा हात असा धरला त्याच वेळीं तुझी प्रत्येक पीडा निवारण करण्याकरितां हा हात वर उचलला आहे. ये आनंदी ये, माझ्या बाहूंचा आसरा तुला देऊन या थंडगार वाऱ्यापासून मी तुझें रक्षण करतो. या चंद्राच्या शीतल प्रकाशानें तुला ताप होण्याचा संभव आहे. म्हणून तुझा नाजूक देह माझ्या अथांग प्रेमाच्या दृष्टीनें झांकून टाकतो.

आनंदी—हें काय? लोक काय म्हणतील?

दादा०—दुसरें काय म्हणणार? शुद्ध प्रेम, सात्त्विक आनंद तो हाच असेंच सर्व जग म्हणणार. काव्यामृताच्या सात्विक आनंदाचा पेला कांठोकांठ भरून वाहूं लागला, असेच सर्व लोक म्हणणार. आणि आनंदी या चंद्राच्या प्रकाशांत, या निवांत वेळीं, या क्षिप्रासागरावर प्रेमानें, ज्यांचें हृदय उचंबळत आहे अशी पतिपत्नी जगाची पर्वा करित असतील काय? त्यांना बाह्य जगाची स्मृती तरी होत असेल काय?

आनंदी—जगाची विस्मृती करून कसे भागेल? स्वतःचें कर्तव्य चुकून कसें चालेल?

दादा०—तुझ्या सुंदर प्रतिभेच्या मानसपूजेंत मी केव्हांही अंतर दिलेलें नाहीं.

आनंदी—नाहीं. नाहीं. राजे लोकांचें कार्यक्षेत्र असें स्वतःपुरतेंच मर्यादित नसते. राजे लोकांनीं आपल्या स्वतःचा विचारच करावयाचा नसतो. लोकांच्या संतोषाकरितां न झटणारा राजाच नव्हे लोकांची इच्छा जर आम्ही पूर्ण केली नाहीं तर आम्ही पेशवेच नव्हे.

दादा०—पेशव्यांनीं लोकांची इच्छा कधीं पूर्ण केली नाहीं, असें झालेंच नाहीं.

आनंदी—आपल्या इंदूरच्या खऱ्या धन्याचा, नव्या अधिपतीचा, आमचा स्वागत समारंभ मोठ्या कडाक्यानें चालविला आहे, लोकांची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे, आणि आमच्या विलंबानें त्यांचा हिरमोड मात्र होतो, अशाप्रकारचे निरोप इंदूरहून चंद्रचूडांच्याकडून आतांच आले आहेत. तेव्हां लोकांचा असा हिरमोड करणें श्रीमंतांना इंदूरच्या अधिपतींना शोभत नाहीं.

दादा०—लोकांच्या औत्सुक्याच्या आड येण्याची आमची बिलकूल इच्छा नाही.

आनंदी—स्वतःचें कर्तव्य विसरून निशानाथाच्या रम्य प्रकाशामुळें काव्योन्मत्त होऊन सर्व रात्र जागरांत काढली, म्हणजे सकाळीं लवकर उठून पुढें कूच करावयाला जरा त्रासच पडतो.

दादा०—वा, फार छान टोमणा दिला. आमची निसर्गाच्या सौंदर्याची आवड आणि काव्याची गोडी तात्रडतोब जिरली. आतां आणखी काय म्हणणें आहे ?

आनंदी—तंबूत जाऊन विश्रांती घ्यावी.

दादा०—जो हुकूम. राघोबांच्या पेशव्यांची आज्ञा शिरसामान्य. चला, आपण आतां तिकडेच जाऊं या. निशानाथ आपल्या प्रियतमेबरोबर, चंद्रिकेबरोबर विलास करित असतां आम्ही परक्यांनीं इथें उभें राहून त्यांना संकोच वाटूं देणें बरें नव्हे. शिवाय आपल्या प्रियकरिणीच्या मुखांतून निघालेली आज्ञा मान्य करावयाला कोणता प्रियकर विलंब लावील ?

२० पद.

जगिं तव दास खास हा सेवक झाला ! सखि जिंकी
हृदयाला ॥ धृ० ॥ सुख आशा नर करित संसार चाले
बंध पावे ! परि दैवें विरमावे ॥ १ ॥

( जातात. )

## प्रवेश पांचवा.

( चंद्रचूड व बाळाजीपंत प्रवेश करतात. )

चंद्रचूड—बाळाजीपंत......

बाळाजीपंत—काय आज्ञा आहे ?

चंद्रचूड—बाळाजीपंत, आमच्या पत्राप्रमाणें श्रीमंत दादासाहेब उज्जयनीपर्यंत येऊन पोंचले आहेत.

बाळाजीपंत—पोंचायचेच. सरकारचें पत्र देतांना सर्व हकीगत अशी खुलवून सांगितली होती कीं, तें ऐकून श्रीमंत गारच पडले.

चंद्रचूड—मग आमचें कारस्थान यशस्वी होण्याचीं बरींच सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत म्हणायचीं.

बाळाजीपंत—( स्वगत ) कां दिसूं नयेत ? त्यांत मी लक्षच घातलें आहे तसें.

चंद्रचूड—बाळाजीपंत, श्रीमंतांच्या आगमनाविषयीं लोकमत काय आहे !

बाळाजीपंत—लोकमताचा विचार आपणांला करण्याचें कारण काय? शिवाय मी माझें वजन खर्च करून बऱ्याच लोकांचीं मतें आपल्याला अनुकूल अशीं करून घेतलीं आहेत. श्रीमंत इंदूरांत येण्याचा अवकाश कीं एकमतानें इंदूराधिपति म्हणून ही इंदूरची श्री श्रीमंतांच्या गळ्यांत पडणार......

चंद्रचूड—आणि या चंद्रचूडाचा अधिकार असाच अबाधित राहणार......

बाळाजीपंत—आणि मग हा बाळाजीपंत......

चंद्रचूड—तुम्ही अगदीं मूर्ख आहांत. लोकांना अनुकूल करून घेण्याच्या कामांत तुम्ही कदाचित आपल्या कारस्थानाचा सुगावाही त्यांना दिला असेल.

बाळाजीपंत—भलतेंच. तसा हा बाळाजी ढिला नाहीं. मी लोकमत समजून घेण्याच्या भानगडींतच पडलों नाहीं.

चंद्रचूड—काय म्हणालांत ?

बाळाजी०—रथ जोडून तयार आहे, ही वर्दी देण्याकरितांच आलों होतों.

चंद्रचूड—होय, श्रीमंतांचें स्वागत कसें करायचें, आपलें कर्तव्य काय, याची जाणीव लोकांना दवंडी पिटवून राजवाड्यासमोर जमण्याविषयीं फर्मावलें होतें. पंत याचा कितपत उपयोग होईल ?

बाळाजीपंत—चांगलाच होईल. लोक अगदीं मेंढरासारखे असतात-पशू असतात. तेव्हां अशा लोकांचे नेते व्हायला......

चंद्रचूड—पंत, मी पुढें जातों. तुम्ही चलाच. (जातो)

बाळाजीपंत—हुकूम. मी पाहिजेच. त्याशिवाय मुद्दे कसे सुचतील ? चला बाळाजीपंत, राज्याचा पहिला हत्ता घ्यायला चला. चंद्रचूडाची आज लोकांच्याकडून चांगलीच संभावना झाल्यावर पुढला मान तुमचाच...... (जातो.)

---

## प्रवेश सहावा.

(इंदूरच्या राजवाड्यासमोरील भव्य पटांगण. लोकांचा प्रचंड समुदाय. चंद्रचूड—बाळाजी इत्यादि प्र.)

चंद्रचूड—आजच्या या शुभ प्रसंगीं संस्थानच्या लोकांचा हा जमलेला समुदाय पाहून आम्हांला फार आनंद होत आहे. स्वागत समारंभाविषयीं तुमच्यामधील हा उत्साह संस्थानच्या प्रजेच्या राजनिष्ठेची व दूरदर्शित्वाची चांगलीच साक्ष पटवितो. संस्थानचे मध्यवर्ती सरकारशीं असलेलें संबंध ध्यानांत घेतलें असतां, श्रीमंत दादासाहेब पेशवे हेच संस्थानचे खरे धनी हे कुणाच्याहि ध्यानांत येण्यास फारसा विलंब लागणार नाहीं. थोरल्या सुभेदारांनीं जोपासना करून वाढविलेल्या या संस्थान वृक्षाचा जन्म पुण्याच्या पेशवाईच्या वटवृक्षापासूनच आहे हें कोणीहि सूज्ञ कबूल करील. मुसलमानी अमदानींत कुणाचाहि जीव सुरक्षित नव्हता; कुणाचीहि दौलत सुरक्षित नव्हती. पण ती परिस्थिति पालटून सांप्रत शांततेचें साम्राज्य सुरू

झालें आहे. हें पेशवे सरकारचें सामर्थ्य नव्हें असें म्हणण्याचें धाडस कोण करील ? सुभेदारांच्या या माळव्यांत काठीला सोनें बांधून भर मध्यरात्रीं एकट्यानें खुशाल प्रवास करण्यासारखी सुरक्षितता जी प्राप्त झाली आहे ती पेशवे सरकारच्या प्रभावानें प्राप्त झाली नाहीं असें कोण म्हणेल ? पेशवे सरकारच्या प्रतापानें माळव्यांत शांततेचें साम्राज्य सुरू झाल्यामुळें इंदूर संस्थानचा वाढता व्यापार संस्थानच्या वैभवाची चांगलीच साक्ष पटवितो. सारांश, माळव्याला हल्लीचे दिवस श्रीमंत पेशव्यांनीं दाखविलें असेंच म्हणावें लागतें. तेव्हां अशा प्रकारच्या अन्नदात्या पेशव्यांचे सख्खे चुलते म्हणजे प्रति पेशवेच, श्रीमंत दादासाहेब, इंदूरला येणार असल्याचें आम्हांला समजलें आहे. श्रीमंतांचा येण्याचा उद्देश काय असावा हें कांहीं नक्की सांगतां येणार नाहीं. पण मालेराव सरकारच्या अकास्मिक मृत्युमुळें संस्थानची विस्कटलेली घडी पुन्हां बसविण्यासाठींच ते येत असावेत अशी आमची समजूत आहे. ती कदाचित् चुकीचीहि असूं शकेल. पण कोणत्या कां कारणानें होईना श्रीमंत दादासाहेबांच्या येण्यानें संस्थानचें हितच होणार आहे. श्रीमंतांच्या येण्यांत संस्थानचें कल्याणच आहे. तेव्हां अशा प्रतिष्ठित पाहुण्यांचें नव्हे खऱ्या अन्नदात्या धन्याचें स्वागत करावयाला तयार होणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. श्रीमंत दादासाहेब श्रीमंत पेशव्यांचे सख्खे चुलते. श्रीमंत पेशव्यांचें प्रतिनिधी, थोरल्या सुभेदारांचें मानसपुत्र. तेव्हां अशा प्रतिष्ठित पाहुण्यांच्या, इंदूरच्या खऱ्या धन्याच्या स्वागत समारंभांत भाग न घेतां तटस्थ राहून तुम्ही नरकाचें वांटेकरी होणार काय ? मध्यवर्ती सरकारच्या प्रतिनिधीचें स्वागत करण्याचे नाकारून तुम्ही राजद्रोही बनणार काय ?

**सर्व**—नाहीं ! नाहीं !

**चंद्रचूड**—तर बोला श्रीमंत दादासाहेबांच्या नांवांचा एकवार मोठ्यानें जयजयकार बोला. तुमच्या आवाजानें दशदिशा दणाणून जाऊं द्यात. तुमची राजनिष्ठा जय शब्दाच्या रूपानें, क्षिप्रेच्या तीरावर तळ देऊन राहिलेल्या श्रीमंत दादासाहेबांच्या कानावर जाऊन आदळूं दे. श्रीमंतांच्या स्वागतासाठीं सिद्ध व्हा. त्यांच्या स्वागताची तयारी करा.

नागरिक—ऐका. ऐका. गडबड बंद करा.

चंद्रचूड—गुढ्यातोरणें उभारून सर्व नगर शृंगारून टाका. जागोजागीं पताका लावून व भव्य कमानी उभारून शहरांतील सर्व मार्ग सुशोभित करून टाका. मंगलवाद्यांच्या गजरानें श्रीमंतांचें स्वागत होऊं द्या, श्रीमंतांच्या सन्मानार्थ रात्रौ दीपोत्सव करा. सारांश, स्वागत समारंभ असा अप्रतिम झाला पाहिजे कीं, श्रीमंत खुष होऊन त्यांना इंदूरांतून हलूंच नये असें वाटूं लागले पाहिजे. श्रीमंतांना खुष ठेवण्यांतच तुमचा मान आहे, संस्थानचें हित आहे. श्रीमंतांनीं खुष होऊन मेहेरनजर केल्यास तुमचा सामाजिक दर्जा अधिक वाढणार आहे. तुमच्या स्वागतानें संतुष्ट होऊन तुमच्या राजनिष्ठेचें बक्षिस म्हणून श्रीमंतांनीं संस्थान आपल्या ताब्यांत घेतल्यास मराठा साम्राज्याच्या नागरिकत्वाचेहि हक्क कदाचित मिळण्याचा संभव आहे. सर्व गोष्टी तुमच्यावरच अवलंबून आहेत. करा. श्रीमंतांच्या, तुमच्या खऱ्या धन्याच्या स्वागताची तयारी करा. तुमचा खऱ्या धन्याचा एकवार जयजयकार बोला. बोला इंदूराधिपती श्रीमंत दादासाहेब पेशवे सरकार की......

अहिल्या—( प्रवेश करून ) हां थांबा. चंद्रचूड थांबा. श्रीमंत दादासाहेबांना इंदुराधिपती करून होळकरांचें नांव इतक्यांतच बुडवूं नका. नामर्दपणाचा उपदेश करून लोकांना निर्बल बनवूं नका. भलताच उपदेश लोकांना करून त्यांची दिशाभूल करूं नका.

चंद्रचूड—सरकारनीं श्रीमंतांच्या जयजयकाराला अडथळा केला ही गोष्ट फार गैर केली. त्यामुळें लोकांचा भलताच समज होईल. आणि ही गोष्ट जर श्रीमंतानां कळली तर परिणाम फार वाईट होईल.

अहिल्या—फार वाईट म्हणजे काय होईल ?

चंद्रचूड—संस्थान ताबडतोब खालसा होईल.

अहिल्या—चंद्रचूड, संस्थान खालसा करणें म्हणजे काय तोंडच्या गोष्टी आहेत ? सुभेदारांच्या संस्थान मंदिराचा पाया इतका डळमळीत आहे असें आपणाला वाटतें काय ? लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकून आपलें कारस्थान यशस्वी करूं अशी आपली कल्पना आहे काय ? चंद्रचूड, ही

सुभेदारांची सून जिवंत असेपर्यंत तुम्हां घमेंडखोर मुत्सद्यांच्या गमजा व्यर्थ आहेत. इंदूरच्या नागरिकांनो, श्रीमंत कोणत्या हेतूनें इकडे येत आहेत हें तुम्हांला माहित आहे काय ? इंदूरला येण्यांत श्रीमंतांचा हेतु शुद्ध आहे असें तुम्हांला वाटतें काय ? नाहीं. नाहीं. इकडे येण्यांत श्रीमंतांचा हेतु शुद्ध नाहीं. इंदूरच्या नागरिकांनों, ऐका श्रीमंतांचा इकडे येण्याचा उद्देश ऐका. संस्थानच्या राजनिष्ठ दिवाणबहादुरांच्या खास आमंत्रणावरून श्रीमंत दादासाहेब लष्करासह, आम्हाला, महेश्वरच्या राणीला; तुम्हाला, इंदूरच्या लोकांना बुडविण्यासाठीं येत आहेत.

नागरिक—धिःकार ! धिःकार ! !

अहिल्या—नागरिकानों, महेश्वरचा खजिना लुटण्याचा श्रीमंतांचा मानस आहे. खजिना लुटून आमच्या दानधर्माच्या पुण्यकृत्यांत अडथळा आणण्याची आसुरी इच्छा श्रीमंतांना झाली आहे. आम्हांला राज्याला नालायक म्हणून, संस्थान बेवारस ठरवून संस्थान खालसा करण्याचा श्रीमंतांचा विचार आहे. आज आमच्या घरावर नांगर फिरविणार आहेत, तर तुमच्यावरहि तीच पाळी आहे. दुसऱ्याच्या दौलतीचा अपहार करण्याची चटक लागलेल्या श्रीमंतांच्या दृष्टींतून तुमची वाढती संपत्ती वांचेल असें तुम्हांला वाटतें काय ? संस्थान खालसा करायला आलेल्या, होळकरांना नामशेष करणाऱ्यांना, तुम्हांला लुटावयास आलेल्या दादासाहेबांना तुम्हीं आपला खरा धनी समजतां काय ? निमकहराम चंद्रचूडाच्या उपदेशाप्रमाणें दादासाहेबांना इन्दुराधिपती समजून त्यांच्या स्वागताचा समारंभ साजरा करणार काय ? होळकरांना नामुष्कि आणणारें वर्तन, इंदुरच्या नागरिकांनो, तुम्हीं करणार काय ?

नागरिक—नाहीं ! नाहीं !

अहिल्या—तर उठा आतां. संस्थानच्या रक्षणाच्या तजविजीला लागा. 'दादासाहेबांना विरोध कसा करावयाचा त्याची तयारी करा. आपल्या घरादारावर तुळशीपत्र टेऊन संस्थान रक्षणाच्या पवित्र कार्यासाठीं पुढें या. स्वार्थत्यागाचा धडा आपल्या मुलाबाळांना घालून द्या. सुभेदारांचें यश कायम राखा. होळकरांचें नांव चालू ठेवा. बेमान चंद्रचूडाचा भाषणांनीं मोहून जाऊन स्वतःची दिशाभूल करूं नका. स्वराज्यद्वेषी बनूं नका.

चंद्रचूड—सरकार, स्पष्ट बोलतों याची माफी असावी. पण ज्याअर्थी आजपर्यंत आपण निमक खाल्लें आहे त्या अर्थी आपल्याला अप्रिय वाटली तरी योग्य सल्ला देणें या इमानी नोकराचें कर्तव्य आहे. सरकार राज्याचें रक्षण नुस्त्या कोरड्या शब्दांनीं केव्हांहि होत नसतें. या जगांत पैसा हीच शक्ति आहे. सध्यांच्या संस्थानच्या खजिन्याची स्थिति जर आपण लक्षांत घेतली असती तर संस्थान रक्षणाचा आपला मार्ग चूक कसा आणि आम्हां मुत्सद्यांचा मार्ग बरोबर कसा याचीं आपल्याला कल्पना आली असती.

अहिल्या—चंद्रचूड, उपाशी राहून तडफडून मरण्याचा प्रसंग आला तरी हत्तीच्या गंडस्थळावर उपजीविका करणारा सिंहाचा छावा गवतावर केव्हांहि जगणार नाहीं. संस्थानच्या खजिन्याची सध्याची हलाकीची स्थिती जरी ध्यानांत घेतली तरी लोकांना निस्तेज बनविणारा, होळकरांना काळीमा आणणारा, आपला मार्ग मात्र मला पसंत नाहीं. माळव्याची जहागीर इतक्या सहजासहजी दादासाहेबांच्या स्वाधीन करायला ही अहिल्या तयार नाहीं. चंद्रचूड, तुम्हांला चमत्कार पहायचा आहे काय ? ही अहिल्या किती संपत्तीमान आहे हें तुम्हांला पहायचें आहे काय ? पहा तर. इंदूरच्या नागरिकांनों, संस्थानचा खजिना सध्यां जिकीरीत आहे. दादासाहेबांच्या स्वारींचा खर्च खजिन्यांतून भागेल असें वाटत नाहीं. इंदूरच्या धनिक नागरिकांनों, आणीबाणीची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. होळकरांची जहागीर नष्ट होण्याचा प्रसंग आला आहे. सुभेदारांच्या नांवाला काळीमा लागणार आहे. तुमच्या स्वराज्यावर संकट आलें आहे. अशा प्रसंगीं संस्थानला मदत करायला तुम्हीं माघार घ्याल काय ? माझ्या लाडक्या पुत्रांनो, तुमची ही आई, ही अहिल्या संकटांत असतां तिला मदत करणें हें तुमचें कर्तव्य नाहीं काय ? इंदूरच्या श्रीमंत रमणींनों, तुम्हीं तरी आपल्या कर्तव्याला जागा. आलेल्या संकटांतून माळव्याचा उद्धार होईपर्यंत तुम्हीं तरी देहदंडाची दीक्षा घ्या. आपल्या अलंकाराचा न्यास करून त्या अलंकारांनीं स्वराज्यसुंदरीला भूषित करा, कोट्यावधि रुपयांच्या अलंकारांच्या मोलानें संस्थानच्या स्वातंत्र्याचा एकच अलंकार विकत घ्या. स्वराज्यावर संकट

आलें असतां अलंकारांनीं आपला देह नटविण्यांत तुम्हांला आनंद वाटतो काय? हिरे माणकांच्या कांच खड्यानीं आपलें शरीर भूषित न करतां स्वातंत्र्याच्या एकाच हिऱ्यानं आपलें सौंदर्य द्विगुणित करा. स्वातंत्र्यप्रिय नागरिकांनों, ही इंदूरची राणी, ही माळव्याची राणी तुमच्यापुढें पदर पसरून पैशाची भीक मागत आहे. संस्थानरक्षणाला मदत करून आपली संपत्ती कार्याला लावा, या राणीला ही भीक घालून संस्थानची इज्जत राखा. संपत्तीचें दान करून संस्थानची अब्रू राखा. पैशाची मदत करून संस्थानचें रक्षण करा. ( लोक आपल्या अंगावरील दागिने फेंकतात. )

**कारभारी**—नगरशेट देवीचंदाच्या प्रेमकुंवरबाईनीं आपली सर्व दौलत स्वराज्याच्या रक्षणासाठीं सरकारच्या चरणीं अर्पण केली आहे.

**अहिल्या**—स्वराज्यासाठीं आपल्या सर्वस्वावर पाणी सोडणाऱ्या प्रेमकुंवरबाईची देणगी आम्हीं मोठ्या आनंदानें स्वीकारतों, चंद्रचूड, पाहिलीत ही दागिन्यांची रास. स्वातंत्र्यासाठीं धडपडणाऱ्या या स्वातंत्र्यप्रिय लोकांच्या राज्यांत पैशाची टंचाई कुठली पडायला? श्रीमंतांच्या पुढें मान न वांकवितां जशास तसें या न्यायानें श्रीमंतांच्याबरोबर सामना द्यायला आतां तरी तुमची तयारी आहे नां?

**चंद्रचूड**—सरकार, वेळींच आपल्याला सावध करणें हें माझें कर्तव्य आहे. आपला मार्ग चुकतो आहे. हा सार्वभौम सरकारचा अपमान आहे. श्रीमंत दादासाहेब पेशवे आहेत.

**अहिल्या**—पुण्याच्या पेशव्याखेरीच मी इतराला जाणीत नाहीं. दुष्ट बुद्धीनें संस्थानांत प्रवेश करणाराचें स्वागत आमच्याकडून असेंच होईल. युद्ध करण्याचा आमचा निश्चय ठरला. उद्यांपासून तयारीला सुरुवात होईल.

**चंद्रचूड**—हुजूर, मी आपणाला फिरून बजावून सांगतों कीं हा सार्वभौम सरकारचा, पेशवे सरकारचा अपमान आहे. हा राजद्रोह आहे.

**अहिल्या**—उद्दाम मनुष्या, या माळव्याच्या राणीचा अपमान करणारा आधीं तूं राजद्रोही आहेस. बेमान मनुष्या, ही माळव्याची राणी तुला कैद करीत आहे. चंद्रचूड तुम्ही माझे बंदिवान् आहांत.

**चंद्रचूड**—मला कोणत्या आरोपावरून बंदिवान करण्यांत आलें आहे?

**अहिल्या**—राजद्रोहाच्या व संस्थानद्रोहाच्या! ( पडदा पडतो )

---



अहिल्या—ही पहा दांगिन्याची रास !

(अं. २ पृ. ६०)

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

( अहिल्या व तुकोजीराव प्रविष्ट. )

अहिल्या—तुकोजीराव, संस्थान आतां तुमचें आहे. थोरल्या सुभेदारांनीं लावलेल्या संस्थान वृक्षाचें रोंप कसें जगवायचें याची मदार आतां सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे. आमचें काय ? आम्हाला आतां कोणत्याही गोष्टीची वांच्छा नाहीं. आज आम्हीं इंदूरांत आहों तर उद्यां काशीवास पत्करूं. धडपड करायची ती होळकरांच्या नांवाकरितां, झीज सोसायची ती लोकांच्या स्वराज्याकरितां. पण या संस्थानच्या संसाराचें बंधन देखील आम्हाला नको आहे. इंदूर आतां तुमच्या स्वाधीन केलें आहे. श्रीमंत दादासाहेबांच्या पासून त्याचें रक्षण करा. होळकरांच्या नांवाला साजेशी कृती करा. लोकाच्या स्वराज्याचें रक्षण करा.

तुकोजी०—सरकारनीं अशी उदासीन वृत्ती जर धारण केली तर आमच्या हातून काय होणार? सर्व प्रताप सरकारच्या पुण्याईचा. आम्हाला आपला पाठिंबा. सरकारच्या हुकमाप्रमाणें अक्षरशः वागणें हेंच आमचें काम आणि म्हणूनच सरकारचें आज्ञापत्र पाहिल्याबरोबर लष्करला ताबडतोब इकडे कूच करण्याचा हुकूम देऊन सडाच उदेपुराहून इकडे धांवत आलों. सरकारनीं माझ्यावर संस्थानची जबाबदारी टाकली याबद्दल माझें कांहीं म्हणणें नाहीं; कारण आपली प्रत्येक आज्ञा आम्हाला शिरोधार्यच. पण आपल्या राजनीतीच्या आसऱ्याखेरीज संस्थानचा राज्यशकट हांकण्याची पात्रता निदान माझ्या अंगीं तरी खास नाहीं. संस्थानचें पोषण करण्याचा माझ्यासारख्या अवयवांनीं किती जरी प्रयत्न केला तरी संस्थानचा प्राण म्हणजे होळकरांची अहिल्या देवीच.

अहिल्या—तुकोजीराव, माझ्या बोलण्याचा आशय तुमच्या नीट ध्यानांत आला नाहीं. आतां तुम्हीं संस्थानचे मालक झाला. पुण्याच्या

पेशव्यांच्या सही शिक्क्याची आज्ञापत्रें लवकरच येतील. तेव्हां या होळकरांच्या इंदूर संस्थानचें, लोकांच्या स्वराज्याचें, तुमच्या स्वतःच्या राज्याचें रक्षण कसें करायचें हें आतां तुम्हीच ठरविलें पाहिजे. आम्हीं आहोंतच. पण तुम्ही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. संस्थानचें लष्कर इथें नाहीं, होळकरांच्या अन्नावर पुष्ट झालेल्या दरबारच्या राजनिष्ठ मुत्सद्यांनीं श्रीमंत दादासाहेब पेशव्यांना खास आमंत्रण देऊन संस्थानच्या गादीचा नजराणा पुढें केलेला, श्रीमंतांच्या बरोबर लष्कर पांच हजार, तेव्हां या सर्व परिस्थितीचा विचार करून काय करायचें तें ठरविलें पाहिजे. जिवावर उदार होऊन, होळकरांच्या कीर्तीला शोभणारें वर्तन करून श्रीमंत दादासाहेबांना तोंड द्यायचें कीं, आमच्या स्वराज्यावर पाणी सोडून परक्यांची सत्ता कबूल करायची आणि मुकाट्यानें संस्थान......

तुकोजी०—त्यांच्या स्वाधीन करायला आम्ही केव्हांही तयार होणार नाहीं. होळकर कांहीं अजून इतके नामर्द झाले नाहींत कीं लष्करचा बाऊ दाखवून संस्थान कुणीही त्यांच्या हातून हिसकाऊन घ्यावें. संस्थानचे लोक आजच कांहीं इतके निर्बल झाले नाहींत कीं स्वराज्याचें रक्षण देखील त्यांच्या हातून होणार नाहीं. संस्थानचा राज्यकारभार, स्वतःच्या राज्याचा कारभार पहायला श्रीमंत दादासाहेब पेशवे जर आज आम्हां लोकांना अपात्र ठरवितील तर विलायतेहून हिंदुस्थानांत व्यापार करण्यासाठीं आलेले टोपीवाले देखील उद्यां आम्हांला स्वराज्याला नालायख म्हणतील. तें कांहीं नाहीं. हें नामर्दपणाचें बीं लोकांत रुजूंच देतां कामा नये. वाटेल तो प्रसंग आला तरी दादासाहेबांच्या स्वारीला आम्हांला तोंड दिलेंच पाहिजे. लष्करची काळजी कशाला ? सरकारांच्या नांवाच्या नुस्त्या उच्चारानेंच हजारो तरुणांचीं अंतःकरणें स्वराज्यप्रेमानें भरून येऊन ते संस्थानचें रक्षण करायला पुढें येतील. सरकारच्या पावित्र्याच्या तेजापुढें दादासाहेबांचें लष्करी तेज फिकें पडून जाईल. संस्थानच्या अब्रूसाठीं आम्हांला लढाई करणें भाग आहे. सुभेदारांच्या नांवासाठीं, मराठ्यांच्या मर्दपणासाठीं निदान संस्थानच्या रक्षणासाठीं तरी आम्हाला आमच्या जिवावर उदार झालेंच पाहिजे.

अहिल्या—बरोबर, अगदीं बरोबर. स्वराज्यदेवतेला प्रसन्न करण्याकरतां स्वतःच्या पंचप्राणाचा जरी नैवद्य दाखवावा लागला तरी प्रत्येकानें तयार असलेंच पाहिजे. तुकोजीराव, तुमचा विचार अगदीं योग्य आहे. श्रीमंत दादासाहेबांना होळकरांच्या तरवारीचें पाणी एकदां दाखविलें पाहिजे. धन्याला त्याच्या चाकराच्या अंगचें शौर्य एकदां तरी दिसलें पाहिजे. धन्याच्या हातून जर अन्याय होत असला तर त्याची चुकी दाखवून न्यायाचा धडा घालून देणें इमानी नोकराचें कर्तव्यच आहे. जा तटाचे दरवाजे लाऊन घेण्याचा हुकूम द्या. लोकांना त्यांच्या कर्तव्याची ओळख देऊन नवीन लष्कर भरती करा. दादासाहेबांचा मुक्काम येथून नऊ मैलांवर आहे हें लक्षांत ठेवा. आणि वेळ न गमावतां क्षात्रवृत्तीचा अंगिकार केलेल्या या ब्राम्हण मर्दाचें वीरोचित स्वागत करायला होळकरांची सेना सिद्ध होऊं द्या. हिंदुस्थानांतील एका अद्वितीय वीराशीं आपणाला तोंड द्यायचें आहे. संस्थानच्या सिंहासनाचें रक्षण करतां करतां जर मरण आलें तर स्वर्गातील सिंहासनाचा मार्ग मोकळाच आहे. दादासाहेब पेशव्यांनीं इंदूरच्या राणीचा, यःकश्चित एका स्त्रीचा, आमचा पराभव केला तरी देखील तें आम्हाला भूषणच आहे. जा. एकदम तयारीला लागा. स्वराज्यावर संकट आलें असतां, स्वराज्याकरतां आत्मयज्ञ करण्यास हिंदुरमणी कशा तयार होतात तें जगाला समजूं द्या.

तुकोजी०—आज्ञेप्रमाणें व्यवस्था करतों.

अहिल्या—आणि तुकोजीराव, दोन तीन हुजार लोक बरोबर देऊन विसाजीपंतांना दादासाहेबांच्याकडे पाठवा. पेशव्यांचे चुलते तेव्हां संस्थानचे ते प्रतिष्ठित पाहुणे आहेत. त्यांच्या येण्याचा उद्देश त्यांच्याच तोंडांतून बाहेर पडूं द्या. निमकहराम चंद्रचूडाच्या कारस्थानाला बळी न पडतां दादासाहेबांचें मन जर आमच्याविषयीं साफ असेल तर ही इंदूरची राणी पाहुण्यांचा पाहुणचार करायला कोणत्याही प्रकारची कसूर करणार नाहीं. पण जर कां त्यांच्या मनांत आमच्याविषयीं अगर संस्थानविषयीं विकल्प आलेला दिसला तर त्यांना स्वच्छ असा निरोप सांगायचा कीं.........

तुकोजी०—सध्याची मर्यादा ओलांडली कीं आमचें हत्यार तुमच्यावर बिनदिक्कत चालेल.

अहिल्या—असाच निरोप पाठवा. होळकरांच्या राज्यांत प्रसंगविशेषीं बायकांनाही तरवार कशी धरतां येते हें श्रीमंतांना दिसूं द्या. जा. सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करा.

तुकोजी०—आज्ञा. आतां त्याच तजविजीला लागतों. मला आतां परवानगी व्हावी.

अहिल्या—ठीक आहे. जा तुम्हीं आतां. ( तुकोजी जातो. ) होतां होतां परिक्षेची वेळ जवळ येऊन ठेपली. चंद्रचूडांना नजरकैद केल्यापासून मला एक मोठा आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. पण हिंदुस्थानांतील अजिक्य वीराशीं प्रत्यक्ष सामना करण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली आहे तसतसें माझें मन कसें अधीर होऊं लागलें आहे. पण कांहीं झालें तरी हें ग्रहण लवकरच सुटून होळकरांचा स्वराज्यरवी संस्थानवर तळपूं लागेल असें अजून वाटतें आहे. संस्थानच्या स्वराज्यमंदिराचें आम्हांला नाइलाजानें लावावें लागत असलेलें दार श्रीमंत दादासाहेब स्वतः आपल्या हातानें खुलें करून मोठ्या समारंभानें आमचा आंत प्रवेश करवतील असें माझी मनोदेवता मला स्पष्टपणें सांगत आहे. पण अदृष्टांत काय आहे कुणाला ठाऊक ? कदाचित.........पण नकोच तें. आपण नेहमीं चांगलेंच घेऊन चालावें. आणि अपयशाची शंका तरी मी कां धरावी ? आज सर्व संस्थानची प्रजा संस्थानचें संरक्षण करण्यासाठीं आपआपल्या परीनें शक्य तितकी मदत करीत आहे. शिंदे, गायकवाड, नागपूरकर यांची कुमक येणार यांत शंकाच नाहीं. पुण्याच्या श्रीमंतांकडून आम्हाला योग्य तेंच उत्तर येईल, असा दृढ भरंवसा वाटतो. अशी सर्व स्थिती असतां मी शंका कां बाळगावी ? सकवारचें स्त्रियांचें पथक पाहून तर दादासाहेब ओशाळेच होतील. पण स्वराज्यासाठीं चाललेल्या या लढ्यांत स्त्रियांनीं घेतलेला हा भाग पाहून पुण्याच्या श्रीमंतांना, किंबहुना हिंदुस्थानांतील सर्व लोकांना कौतुक वाटेल यांत शंकाच नाहीं. पण यांत कौतुक करण्याजोगें निदान मला तरी कांहींच दिसत नाहीं. कारण



तुकोजी०—मला आतां परवानगी असावी. ( अं. २ पृ. ६४ )

स्त्रियांच्या सहायाखेरीज स्वराज्यस्थापनेसारख्या अगर रक्षणासारख्या पवित्र कार्यांत यश येणें शक्यच नाहीं. गुलामगिरींत खिचपत पडून त्या स्थितींत आनंद मानणाऱ्या पुरुषांना स्वातंत्र्याचें गोड औषध देऊन शुद्धीवर आणणाऱ्या धन्वंतरी हिंदु स्त्रियाच होत. आपल्या बापाच्या, भावाच्या, पतीच्या कंठाला घट्ट मिठी मारून त्यांना राष्ट्रकार्याभिमुख करणें हेंच स्त्रियांचें कर्तव्य. उज्वल देशाभिमानानें तेजस्वी होऊन स्वराज्य-प्रेमाच्या ओलाव्यानें हृदयाला पाझर फुटून, हिंदुरमणीनें मारलेली घट्ट मिठी कठोर अंतःकरणाच्या पुरुषाला देखील सोडवितां येणें शक्य नाहीं. सारांश, केवळ पुरुषांच्याच नव्हे तर सर्व देशाच्या भवितव्यतेवर सत्ता चालविण्याची दिव्यशक्ती स्त्रियांच्या अंगीं आहे. अशा हिंदु स्त्रियांनीं संस्थानरक्षणाच्या पवित्र कार्यांत भाग घेतला असतां अपयशाची शंका कुठून असणार ! शिवाय भगवंताचें अधिष्ठान हाच यशप्राप्तीचा सुलभोपाय. इंदुरांत स्त्रीपुरुषांच्या संघशक्तीनें वावरणाऱ्या आदिशक्ते, पार्वती माते...........

## २१ पद.

मजवरि प्रसाद व्हावा । मजला सुधीर द्यावा ॥ ध्रु० ॥ खेद मनींचा न जाइ साचा । लोकसंघ बनवावा ॥ १ ॥ बोल जीवाचा श्रवणिं घ्यावा । धीर मुळीं न खचावा ॥ २ ॥

(पडदा पडतो)

---

## प्रवेश दुसरा.

(इंदूरांतील राजरस्ता. सकवार प्रवेश करते.)

**सकवार**—वेळ कोण आणीबाणीची आणि हे लोक स्वस्थ कसे बसले आहेत. इंदूरच्या नागरिकांनो, निमकहराम चंद्रचूडांनीं तुमच्या स्वराज्य-मंदिराला लावलेला अग्नि तुम्हांला दिसत नाहीं काय ? तुमच्या स्वराज्य-

मंदिराला अग्नी लागला असतां तुम्हांला झोंप तरी कशी येते ? निद्रिस्त लोकांनों, ही झोंप घेण्याची वेळ नव्हे, ही स्वस्थ बसण्याची वेळ नव्हे. बाबांनों जागे व्हा जागे व्हा.

लागली घराला आग । झोंपतां कसे हो सारे !
तेजस्वी आर्य तुम्ही ना ! दुष्टासि दंड करणारे ।
झाडुनी अंग व्हा जागे । पातले तुम्हाला लुटणारे ।
संस्थान गिळंकृत करिती ।
राज्यासि आम्हां मुकविती ।
नालायक राज्या म्हणती ।
पेशवा लुटाया येई ! जागे व्हा जागे बाई ॥ १ ॥

शत्रूला थरथर कांपायला लावणाऱ्या तुमच्या तरवारी इतक्या बोंथट कशा झाल्या ? परक्याला तुमचें घरदार सुखानें लुटूं देण्याइतके निर्बल षंढ कसे बनला ? राज्याला नालायख म्हणून घेणारे तुम्ही हिंदूच काय ? बाबानों उठा जागे व्हा. ही विश्रांती नव्हे तर निस्तेजता आहे. ही सुखाची झोंप नव्हे तर काळझोंप आहे. इंदूरच्या नागरिकांनों, पाया पडतों, जागे व्हा. बाबानों जागे व्हा.

तें तेज मंद कां झालें ! पुरुषत्व कुठें हो गेलें ।
देशाची हो धुळधाण ! सुचते ही कैशी चैन ।
होऊनि सबल देशार्थ । सोडा हो सोडा स्वार्थ
घेऊनी करिं तरवार ।
अरिवरी करा झणिं वार ।
हाटवा शत्रु अनिवार ।
समजुंदे वीर हो सकला । हिंद वीर मृत नच झाला ॥ २ ॥

इंदूरच्या तरुणांनों, संकटाच्या वेळीं सुभेदारांचें पाऊल केव्हांही मागें पडत नसे. ही गोष्ट इतक्यांत तुम्ही विसरला काय ? होळकरांची अहिल्या देवी; इंदूरची राणी, तुमची आई संकटांत पडलेली तुम्हांस दिसत नाहीं काय ? चंद्रचूडांनीं लावलेल्या आगींत संस्थानमंदिरासकट तुमच्या

आईला जळून मरण्याचा प्रसंग आला आहे, त्यांतून तुमच्या आईची मुक्तता कराच. बाबानों, घाला एवढी भिक्षा या भिकारणीला घालाच.

मंदिरा लाविली आग । घेऊनी चुडाती हातीं ।
सांपडे माय काढा ती । अग्रूची होईल माती ।
लाज कां तुम्हां नच उरली । बांगड्या भरा त्या हातीं ।
ब्रह्मांड फाटलें, बुडला ।
हा देश संकटीं पडला ।
झणि लागो हो कार्याला ।
ही भीक मागते बाला । घाला हो भिक्षा घाला ॥ ३ ॥

हिंदु स्त्रियांनों, तुम्ही तरी या निर्लज्ज तरुणांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून ताळयावर आणा. तुम्ही तरी आपल्या घरांतील पुरुषांच्या कंठाला घट्ट मिठी मारून त्यांच्याजवळ स्वराज्यरक्षणाची भिक्षा मागा. स्वराज्य-द्रोह केल्याचें पातक निदान तुम्हीं तरी आपल्याला लावून घेऊं नका.

गोड गोड बोलुनी वचनें । उद्युक्त करा पुरुषांना ।
प्रेमानें वा रुसव्यानें शुद्धीवर आणा त्यांना ।
झिजवणें देह देशार्थ । हाचि धर्म शिकवा त्यांना ।
आधार तुम्ही देशाला ।
बुडवूं नका या राज्याला ।
दवडूं नका स्वातंत्र्याला ।
आरंभ करा कार्याला । फल न दूर कांहीं त्याला ॥ ४ ॥

पहा. पहा, इंदूरच्या तरुणांनों, हिंदु वीरांनों पहा हीं स्त्रियांचीं पथकें पहा. उज्वल देशाभिमानाच्या रमणीय कांतीनें तेजस्वी झालेल्या या निस्वार्थी रमणींचे हे सुंदर चेहरे अवलोकन करा. काय अझूनही तुम्हांला लाज वाटत नाहीं ? स्वराज्यासाठीं जिवावर उदार झालेल्या या धाडसी सुंदरींना पाहून अझूनही तुमच्या मनांत शरम उत्पन्न होत नाहीं ? नाहीं, नाहीं. नाहीं, तुम्ही इतके निर्लज्ज बेशरम खास नाहीं. हें पहा तुमच्या संस्थान विषयीं, तुमच्या स्वराज्याविषयीं तुमच्यांत असलेलें प्रेम मला स्पष्टपणें

तुमच्या चेहऱ्यावर दिसत आहे. अहिल्या राणीच्या लाडक्या पुत्रानों, करा आपल्या तरवारी कोषमुक्त करा आणि इंदूर संस्थानचे, तुमच्या स्वराज्याचें रक्षण करायला अहिल्या राणीच्या लष्करांत एकदम दाखल व्हा. चला मी तुम्हांला इंदूरच्या राणीकडे घेऊन जातें. बोला तुमच्या आवडत्या संस्थानचा इंदूरचा एकवार जयजयकार बोला. तुमच्या अहिल्या राणीचा तुमच्या प्रेमळ आईच्या नांवाचा एकवार मोठ्यानें जयजयकार बोला.

( जाते. )

( पडद्यांत—इंदूर संस्थानचा विजय असो, होळकरांच्या अहिल्या राणीचा जयजयकार असो )

---

## प्रवेश तिसरा.

( दादासाहेब व आनंदी )

**आनंदी**—बाहेर अहिल्येचे लोक भेटीसाठीं आले आहेत.

**दादा०**—चंद्रचूड आले आहेत काय ?

**आनंदी**—नाहीं. कुणी दुसरेच लोक आहेत. बहुधा कारकून असावेत.

**दादा०**—पेशव्यांचें स्वागत सामान्य लोकांकडून करण्याइतकी होळकरांची अहिल्या खास अदूरदर्शी नाहीं. पेशव्यांच्या भेटीसाठीं सामान्य नोकराला पाठविणें म्हणजे पेशव्यांचा नव्हे मराठेशाहीचा अपमान आहे.

**आनंदी**—पण अहिल्या इकडे पेशवे समजते कुठें ? तिचे पेशवे पुण्यास आहेत. आपण त्या पेशव्यांचे चुलते म्हणून कारकून तरी भेटायला आले. कांहीं संबंध नसता तर या माजुरी—जहागीरदारांनीं आमची संभावना आपल्या खिसमतगारांकडून केली असती.

**दादा०**—पण चंद्रचूडाची काय हकीगत ?

**आनंदी**—आपला मुक्काम इथें पडल्यापासून त्यांच्याकडून कांहींच बातमी नाहीं. आम्ही तर त्यांच्याच बोलावण्यावरून आलों. होळकरांच्या

अहिल्येशीं जशी दगाबाजी करावयाला हा ब्राम्हण तयार झाला, तशी आमच्याशीं केली नसेलना.

दादा०—छे. छे. चंद्रचूडासंबंधीं अशी शंका घेण्याचें कारणच नाहीं. त्यांचा आमच्याकडे पूर्ण ओढा आहे. ते आमच्याशीं केव्हांही निमकहराम होणार नाहींत.

आनंदी—दगलबाज इसमाला आपलेपणा फारसा वाटत नसतो.

दादा०—तरी ते देखील आमच्याशीं बेमान होतील, असें वाटत नाहीं.

आनंदी—मोठ्या इमानी नोकराविषयींच इकडून खात्री देणें होत आहे. मग त्यांच्याकडून कांहीं खबर कां नाहीं ?

दादा०—ते आमच्याच कारस्थानांत गुंतले असतील आणि त्यांनीं आपल्या दर्जाच्या कोणा तरी अधिकाऱ्याला इकडे पाठविलें असेल.

आनंदी—बरें तसें कां होईना. मी त्यांना आंत पाठवून देतें. पण त्यांच्याशीं जरा बेतानेंच बोलायचें. पण त्यांनीं इकडे येण्याचा हेतु काय असें विचारलें तर काय सांगणार ?

दादा०—होय. तो एक मोठा प्रश्नच आहे. आमचें येणें तसेंच अनपेक्षित झालें आहे.

आनंदी—यांत प्रश्न कसला आहे. ? अहिल्येचा मालेराव नुकताच वारला ना ? आम्हीं माळव्यांतच असल्यामुळें अहिल्येच्या समाचाराला आलों असें सांगावें. तिला सावध होण्याला सवडच मिळूं देऊं नये आणि इंदूरांत प्रवेश करून एकदम शहरचा ताबा घ्यावा.

दादा०—तें मग चंद्रचूडाचा निरोप जसा येईल तसें करूं. त्या लोकांना आंत पाठवून देण्यास सांग जा. ( आनंदी जाते. ) चंद्रचूडाचें पत्र आल्याबरोबर फारसा विचार न करतां आम्ही एकदम इंदूरकडे मोर्चा वळविला इतकेंच नव्हे तर एवढ्या नजीक येऊनही तळ दिला, आणि आतां चंद्रचूडाचा पत्ताही नाहीं. योजलेलें कारस्थान यशस्वी झालें तर ठीक. नाहींतर फटफजीतीस पार नाहीं. लढाई करण्याची सोय नाहीं. अहिल्या राणी बायको पडली. लढाईकरून अहिल्यादेवीचा पराजय करून

इंदूरसंस्थान जिंकलें तर जग कांहीं फारखे धन्यवाद देणार नाहीं. पण दुर्दैवानें अहिल्याराणीनें जर कां आमचा पराभव केला, तर मात्र हिंदुस्थानांत राहण्यास अम्हाला तोंडच नाहीं. काय चमत्कारिक स्थिती आली आहे. आतां परत जाण्याचीही सोय नाहीं. आलों कां आणि गेलों कां ? बरोबर हें लष्कर. जाऊं दे. आतां काय होईल तें होईल. एवढें मात्र खरें कीं दगलबाज इसमाच्या नादीं लागून अशी आपली विचित्र परिस्थिती कोणीहि करून घेऊं नये. त्यांत सुख नाहीं, त्यांत मनाची शांतता नाहीं.

२२ पद.

झाले निराश मन । विटलो जगाला ॥ धृ० ॥ जगिं बुडवितां दुजा । जिवास हो त्रास । सौख्य न कदा मिळत । नच शांतता वा ॥ १ ॥

पण हे पहा राणीचे लोक आले.

( चार पांच दरबारी लोकांबरोबर विसाजीपंत प्रवेश करतो )

**दादा०**—या बसा. कुठून ? इंदूरच्या राणीकडून आलांत ?

**विसाजी**—श्रीमंतांची स्वारी अगदीं नजीक आली असल्याचे समजल्यावरून इंदूरच्या राणी सरकारनीं आम्हाला श्रीमंतांच्या समाचाराला पाठविलें आहे.

**दादा०**—ठीक आहे. बसा अहिल्याराणी खुशाल आहेत ? संस्थानची प्रजा सुखी आहे ना ?

**विसाजी**—श्रीमंतांच्या पुण्याईनें व महेश्वरच्या कृपेनें सर्व आनंदी आनंद आहे.

**दादा०**—इंदूरांत आपण कोण ?

**विसाजी**—मी राणीचा खाजगी कारभारी आहे.

**दादा०**—आणि हें ?

**विसाजी**—हे सर्व इंदूरांतील पहिल्या प्रतीचे सरदार आहेत.

**दादा०**—असें कां ? ठीक.

**विसाजी**—श्रीमंतांची स्वारी अगाऊं कांहीं एक सूचना न देतां एका-एकीं इंदूरकडे वरी वळली ?

**दादा०**—सुभेदारांचा आमचा विशेष घरोबा—त्यांच्या सुनेच्या, म्हणजे तुमच्या अहिल्या राणीचा एकुलता एक मुलगा मालेराव बाबा वारला असें ऐकलें. तेव्हां म्हटलें अहिल्याराणीला भेटून जावें. अनायासें माळव्यांतच होतों, तेव्हां म्हटलें समाचार घेऊन जावें. संस्थानचा कारभारही ठीक आहे कीं नाहीं तो पहावा म्हणून आलों. बिचारीवर फार वाईट प्रसंग आला. पण दुःख करून काय उपयोग ! पण राणी मोठी सच्छील स्त्री यांत शंका नाहीं.

**१ सरदार**—राणीसरकार म्हणजे भवानी मातेचा अवतारच होत.

**दादा०**—आणि असल्या साध्वीवरहि संकटें यावींत ना ? पण तुमच्या राणीला आमचा निरोप सांगा कीं तुम्ही कोणत्याही प्रकारची संस्थानची काळजी करूं नये. पेशवे आहेत, आम्हीं आहोंत सर्व व्यवस्था करूं. आम्हीं स्वतः संस्थानचा कारभार पाहूं.

**२ सरदार**—श्रीमंतानां इकडे येऊन बरेच दिवस झाले वाटतें ?

**दादा०**—हो - आठ दहा महिने सहज होत आले.

**३ सरदार**—लष्कर बरोबरच आहे.

**दादा०**—लष्कर तर बरोबर पाहिजे. त्याशिवाय काय ?

**विसाजी**—बरें आतां आम्हाला परवानगी व्हावी. स्वारी इकडे आली असें इंदूरांत आम्हाला समजलें होतें. तेव्हां खरा प्रकार काय आहे हें समजून घेण्याकरितां राणीसरकारनीं मला इकडे पाठविलें होतें. उद्यां स्वतः त्या आणि सेनापतीसाहेब श्रीमंतांच्या दर्शनाला येणार आहेत.

**दादा०**—छे, छे, इकडे येण्याचें कांहीं कारण नाहीं, आम्ही स्वतःच उद्यां त्यांच्या समाचाराला येऊं असें त्यांना कळवा.

**विसाजी**—आज्ञा. येतों तर आम्ही आतां.

**दादा०**—या. ( जाऊं लागतात ) तुमचें नांव काय ?

**विसाजी**—विसाजी.

दादा०—विसाजीपंत, सरदार चंद्रचूड सध्या इंदूरांत आहेत कां ?

विसाजी—आहेत. संस्थानच्या कामगिरीवर आहेत.

दादा०—या. ( सर्व जातात ) अपराधी मनाला उघड रितीनें बोलतां सुद्धां येत नाहीं. चंद्रचूडासंबंधीचा प्रश्न विचारतांना मन साशंक झालें.

आनंदी—( प्रवेश करून ) काय झालें ?

दादा०—कांहीं विषेश नाहीं, तो आलेला राणीचा कारभारी.

आनंदी—आमच्या आकस्मिक येण्याची त्यांना शंका आली काय ?

दादा०—मालेराव बाबांच्या आकस्मिक मृत्यूमुळें पुत्रशोकांत असलेल्या राणीच्या समाचाराला आलों असें सांगितलें.

आनंदी—चांगलाच समाचार घेऊं, राणीचा त्याचबरोबर संस्थानचा.

दादा०—मी उद्यां भेटीस येतों म्हणून सांगितलें आहे.

आनंदी—खुशाल जावें. इकडे राणीच्या भेटीला गेल्याबरोबर मी लष्करला हुकूम देऊन शहरचा ताबा घ्यायला लावते.

दादा०—तो विश्वासघात होईल.

आनंदी—सर्व कारस्थानच विश्वासघाताच्या पायावर उभारलें आहे.

दादा०—विश्वासघाताच्या पायावर उभारलेली इमारत यशस्वी होणार नाहीं.

आनंदी—आतां काय होईल तें होईल. आतां तो विचारच नको. आपण खुशाल अहिल्येकडे जावें, चंद्रचूड आहेतच. मी लष्करला शहर ताब्यांत घ्यायला सांगतें. साधलें तर इंदूरचे राजे, नाहींतर पुन्हा सध्यासारखे त्रिशंकु.

दादा०—काय वाटेल तें होवो, आतां माघार घ्यायची नाहीं. शिवाय आनंदी, यांत तुला समाधान आहे ना ? झालें तर मला जगाची मुळींच परवा नाहीं. तुझ्या समाधानापुढें यशापयशाची किंमत मला मुळींच वाटत नाहीं. कारस्थान फसलें, जगांत फजिती झाली, तरी मी विजयीच आहे. कारण अपयशाच्या मोलानें मी तुझें समाधान, तुझा आनंद जिंकणार.

२३ पद.

सांडि मान मांडी डाव यश वा यश येवो ॥ ध्रु० ॥ जरि प्रसन्न मुखविधु हा । नयनचंद्र तारा । विकचपूर्ण विजयतूर्ण ॥ १ ॥ (जातात.)

---

## प्रवेश ४ था.

( रस्ता. बाळाजीपंत प्रवेश करतो. )

बाळाजीपंत—सारेच खुळे. एकाला देखील अक्कल नाहीं. आमचे माजी दिवाण बहादूर चंद्रचूड पत्र लिहितात काय, दादासाहेब येतात काय आणि स्वराज्य, स्वराज्य, संस्थान, संस्थान म्हणून हे लोक नाचतात काय ! जणुं काय यांच्या बापाचेंच राज्य जातंय. सकवारचें तें स्त्रियांचें पथक ! बायका लढणार ! बायका राज्याचें रक्षग करणार ! छान रक्षण होईल ! लढाईत शत्रूच्या हातीं सांपडलेले कैदी परत मिळण्याची संस्थानानें आशाच करायला नको. अशी बायकांच्या हातून राज्यें राखलीं गेलीं असतीं तर आम्हीं पुरुषांनीं आमच्यावर राज्य करायला या, आम्हीं राज्य चालवायला अपात्र आहोंत असें म्हणून परक्याला कशाला बोलावलें असतें ! पण मौत्सद्य असेल तर ना ? दादासाहेबांनीं आयता कारभार पाहिला असतां, चांगली नेमणूक मिळाली असती, ती सोडली आणि हा धांगडधिंगा घालायला या अहिल्येला कुणी सांगितलें होतें ? अक्कलच कमी. बाकी अक्कल असती तर राज्याची मालकीण कशाला झाली असती म्हणा ! यांच्या या स्वराज्याच्या वेडामुळें उपव्यापी लोकांना मात्र चांगलें फावलें आहे. लोकांना परिस्थिती समजावून देऊन उपदेश करण्याच्या नांवाखालीं हे पुंड स्वतःचें मात्र स्तोम माजवीत आहेत. पण हा बाळाजी फसला जाणार नाहीं. हा शेवटपर्यंत असाच पक्षहीन राहणार आणि ज्याचा जय होईल........

( नागरीक प्रवेश करतात. )

१ नागरीक—ए. तुझें नांव काय ?
२ " तूं राहतोस कुठें ?
३ " कुठें निघाला आहेस ?
४ " तुझें लग्न झालें आहे कीं नाहीं. ?
५ " सर्व प्रश्नांचीं एकदम उत्तरें दे.
१ " आणि थोडक्यांत दे.
२ " आणि राजीखुषीनें आणि अक्कलहुषारीनें दे.
३ " आणि खरें तेंच सांग ?

बाळाजीपंत—नांव काय ? कुठें राहतों ? कुणीकडे निघालों ? लग्न झालें आहे कीं नाहीं ? एकदम आणि थोडक्यांत सांगावयाचें ! अगदीं खरें आणि शहाण्यासारखें सांगावयाचें म्हणजे लग्न करूनहि माझें डोकें शाबूत आहे.

१ नागरीक—म्हणजे ? लग्न झालेले लोक डोकें गमावतात असें कां तुझें म्हणणें ?

बाळाजीपंत—लग्न करून लोक अक्कल गमावतात एवढें मात्र खरें. आतां मी राहतों कुठें ? मी राहतों माझ्या घरांत. निघालों घरीं.

२ नागरीक—तुझें घर कुठें आहे ?

बाळाजीपंत—दिवाण चंद्रचूडांचा वाडा तेंच माझें घर.

३ नागरीक—अरे हरामखोरा !

बाळाजीपंत—हं तोंड सांभाळून बोला. मी कोण आहे हें माहीत आहे कां तुम्हाला ? माझें नांव बाळाजीपंत, हा पठ्ठा चंद्रचूडांचा नोकर—

४ नागरीक—अरे चोरा !

बाळाजीपंत—नाहीं. मी चंद्रचूडांचा नोकर नाहीं. पण चंद्रचूड माझे नोकर आहेत, असें म्हणा पाहिजे तर. कारण चंद्रचूड नेहमीं माझ्यांच सल्ल्याप्रमाणें वागत असतात.

५ नागरीक—करा लेकाला लंबे. अशा घरबुडव्या लोकांना हीच शिक्षा दिली पाहिजे. ( त्याला मारतात. )



सकवार—काय ही बेशिस्त ! चला चालते व्हा. (अ. २ पृ. ७५)

बाळाजीपंत—खून ! खून ! भर रस्त्यांत दिवसा ढवळ्या खून !

सकवार—( प्रवेश करून ) काय ही बेशिस्त ? दिवसा रस्त्यावर असा धिंगाणा घालायला शरम नाहीं वाटत ? चला एकदम चालते व्हा.

[ नागरीक जातात ]

बाळाजीपंत—शाबास सकवार बाई, आज तुम्हीं माझा जीव वांचविलांत. हे तुमचे उपकार कधीं फिटतील ते फिटोत.

सकवार—बाळाजीपंत, तुम्ही यांच्या तावडींत कसें सांपडलांत ?

बाळाजीपंत—हा सगळा तुमच्या उपदेशाचा परिणाम ! स्वराज्याच्या नसत्या वेडानें हे लोक माथेफिरू बनले आहेत. एकूण स्वराज्याचें वेड देशाला विघातकच. शांतता नष्ट होते. पण सकवारबाई, मला कृपा करून घरीं सुरक्षित पोंचवा. नाहींतर मी कांहीं सुरक्षित जाणार नाहीं. यांच्या तडाख्यांत मी कसा सांपडलों हें मी तुम्हांला जातां जातां सांगतों.

सकवार—बाळाजीपंत तुम्हीं असे पुरुषासारखे पुरुष असून, घाबरतां कां ?

बाळाजीपंत—नाहीं, मी कांहीं घाबरलों नाहीं. मी आपला तुमचा मान राखला.

सकवार—कां बाळाजीपंत, पारडें उलटलें ना ? आतां तरी शहाणे व्हा, आणि संस्थानच्या नाशाची इच्छा न करतां अहिल्या देवीला शरण जा.

बाळाजीपंत—( स्वगत ) रंग तर तसाच दिसूं लागला. पण आपण आपली एकदम दाद लागूं देतां कामा नये. ( उघड ) सकवारबाई, पारडें उलटलें म्हणून काय झालें ! माझ्या मुत्सद्दीपणानें........पण तें तुम्हां बायकांना समजायचें नाहीं. चला, दरबारकडे चला ! तिथें समजेल माझा मुत्सद्दी पेंच कसा आहे तो. व्हा पुढें. ( स्वगत ) आतां मुत्सद्दीपणा दाखविण्याची वेळ आली बरें कां ! ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

( दादासाहेब पेशवे यांच्या भेटीसाठीं मुद्दाम उभारलेला तंबू. सेवक जात येत आहेत. सरदार मानकरी दरबारी पोशाखांत. तुकोजी लष्करी पोशाखांत. )

**तुकोजी०**—विसाजीपंत. सर्व व्यवस्था झाली काय ? स्वाऱ्या आतां येऊन दाखल होतील.

**विसाजी**—व्यवस्था बहुतेक झालीच. श्रीमंतांना यायला अजून थोडा अवकाश आहे.

**तुकोजी०**—श्रीमंतांना अवकाश आहे; पण राणीसरकार आतां इतक्यांत.........( पाहून ) आल्याच वाटतें.

**अहिल्या**—( प्रवेश करून ) तुकोजीराव, सर्व व्यवस्था झाली काय ?

**तुकोजी०**—सर्व झालीच. सरकारनां शंभर वर्षांचें आयुष्य आहे. आतांच आपल्या विषयीं मी विसाजीपंतांना बोलत होतो.

**अहिल्या**—आम्हांला शंभर वर्षांचें आयुष्य काय करावयाचें ? शंभर वर्षं जगून जन्म दुःखांतच काढायचा कीं नाहीं ? ईश्वरानें तुम्हांला मात्र मार्कंडेयाचे आयुष्य द्यावें. आणि सध्याची संस्थानला प्राप्त झालेली लाजिरवाणी स्थिति तुम्ही पार बदलून टाकावी एवढीच माझी इच्छा आहे.

**तुकोजी०**—संस्थानला लाजिरवाणी स्थिति यायला काय झालें ? सुभेदारांच्या मागें सरकारच्या रामराज्यानें संस्थानचें वाढत असलेलें वैभव कुणीहि मनुष्याच्या मनांत संस्थानविषयीं हेवाच उत्पन्न करील.

**अहिल्या**—तो वैभवाचा हेवाच आम्हांला नडतो. शांततेच्या राज्य कारभारामुळें कुठल्याहि संस्थानचें वाढतें वैभव पाहून बलिष्ठ राजांच्या पोटांत दुखूं लागतें. जणुं काय त्यांच्या विषारी दृष्टीची संस्थानच्या वैभवाला दृष्टच लागते, आणि त्याचा परिणाम शेवटीं अधःपातांत होतो. इंदूर संस्थानचा अभिलाष धरण्यांत लोकांना काय वाटेल, पुढील पिढी आपणाला काय म्हणेल, इतिहासांत आपले चित्र कसें

रंगविलें जाईल याचा विचार दादासाहेबांनीं कधीं केला आहे काय ? नाहीं. वैभवाच्या लालसेनें विचारमूढ झालेल्या बुद्धीला असा विचार सुचणें मुळीं शक्यच नाहीं. पण जाऊं दे तें. तुकोजीराव, बाकीचा बंदोबस्त काय केला आहे ?

तुकोजी०—शहराच्या तटाचे दरवाजे लावून घेतले आहेत. इंदूरांतील स्वयंसेवक नागरीकांचीं निरनिराळीं पथकें करून वेगवेगळ्या द्वारांचें रक्षण करण्यास तीं ठेविलीं आहेत. आम्हीं स्वतः आणि आजपर्यंत होळकरांचें निमक खाल्लेली ही सरदार मंडळी खाशा स्वारींचें रक्षण करायला तयार आहेत.

अहिल्या—आमच्या रक्षणाची कांहीं काळजी नको. प्राणांचीही पर्वा न करतां संस्थानचें रक्षण करा. प्रसंग आलाच तरी देखील आमची काळजी न करतां शहराच्या रक्षणासाठीं धांव घ्या. आमच्या शरीराचें संरक्षण करायला आमचें शरीर संरक्षक सकवारचें स्त्रीपथक पूर्ण समर्थ आहे. तेव्हां तुकोजीराव माझ्यासाठीं एखाद्या व्यक्तीसाठीं आपले प्राण धोक्यांत न घालतां आपल्या प्राणांच्याहि मोलानें होत असेल तर स्वराज्याचें रक्षण करा.

तुकोजी०—संस्थानविषयीं सरकारनें अगदीं निर्धास्त राहावें. दुर्दैवानें सुभेदारांची आणि इंदूरच्या लोकांची पुण्याई जर संपली असेल तर श्रीमंत दादासाहेबांना संस्थानरूपी निर्मनुष्य स्मशानावरच राज्य करावें लागेल हें मात्र मी आपणांस खात्रीनें सांगतों.

अहिल्या—तुमच्या स्वराज्यनिष्ठेबद्दल शंकाच नाहीं. बरें, तुकोजीराव आतां तुम्हीं तयारींत असा. श्रीमंतांची स्वारी आतां येऊन दाखल होईल. श्रीमंतानां तुम्ही स्वतः सामोरें जाऊन मोठ्या सन्मानानें त्यानां आंत घेऊन या. होळकरांच्या नांवाला साजेल असें या संस्थानच्या प्रतिष्ठित पाहुण्यांचें स्वागत होऊं द्या. कोणतीहि कसूर करूं नका. सुरुवात त्यांच्या कडूनच होऊं दे. तुम्हीं जागाच ठेऊं नका.

तुकोजी०—आज्ञा. ( जातो. )

अहिल्या—अफझूल खानाच्या भेटीच्या प्रसंगीं छत्रपतींना काय झालें असेल याची कल्पना आजपर्यंत जरी कुणालाही झाली नसली तरी या वेळीं मला मात्र ती बरोबर होत आहे. स्वराज्याच्या शंकेनें धडधडणारें शिवछत्रपतींचें हृदय आई जिजाईचा प्रेमळ हात मस्तकावर पडल्यावर शांत झालें असेल. भवानी मातेनें प्रत्यक्ष दर्शन देऊन शंका दूर केल्यामुळें शिवरायाची भीति पार नष्ट झाली असेल. पण माते भवानी, माझी शंका दूर कोण करणार ? आई, माझ्या मस्तकावर हात ठेऊन ही हृदयाची धडपड शांत कोण करणार ? आई आई, या अहिल्येवर तुझ्या या अनाथ मुलीवर तुझ्या प्रेमळ दृष्टीची पाखर घालून तूंच रक्षण कर.

२४ पद.

**विनंति भय हरि सादर वाही। तन मन धन तव चरणा ॥ धृ० ॥ माता माझी तुजसी माया। धीरा देई पडते पाया। लाज तुजसि मम करि धरि या ॥ १ ॥**

विसाजी—श्रीमंतांची स्वारी आलीच !

( तोफांची सलामी. दादासाहेब दरबारी पोशाखांत, भालदार पुढें ललकारत येतात. तुकोजीराव सरदार वगैरे येतात. )

अहिल्या—प्रौढप्रतापनिधि श्रीमंत दादासाहेब पेशवे यांचें ही सुभेदारांची सून स्वागत करते आहे.

दादा०—अहिल्या राणी, आमच्या स्वागताविषयीं तुम्हाला वाटत असलेला अपूर्व उत्साह पाहून आम्हाला फार आनंद होत आहे. पण इतका खटाटोप करण्याचें कांहीं कारण नव्हतें. आम्हीं कां कुणी परके आहोंत ? आमच्या मनांत काकांच्या विषयीं दुजाभाव केंव्हांही वसत नव्हता. सुभेदारांचें इंदूर संस्थान म्हणजे आमचें स्वतःचेंच संस्थान अशी अजून ही आमची समजूत आहे.

अहिल्या—श्रीमंत धनी आहेत. होळकर श्रीमंतांचे नोकर आहेत. संस्थानवरही श्रीमंतांचाच हक्क आहे.

दादा०—बरोबर. अगदीं बरोबर. सुभेदारकाका आम्हाला वडिलासमान होते. तें आम्हाला मानसपुत्राप्रमाणें लेखीत होते; तेव्हां संस्थानचर आमचा हक्क आहे, असें जें आपण म्हणालांत तें बरोबर आहे. राणी तुमचें हें स्वामिभक्तिपूर्ण आणि शहाणपणाचें भाषण ऐकून आम्हाला फार संतोष होत आहे.

अहिल्या—श्रीमंतांचें इकडे येणें कोणत्या उद्देशानें झालें ?

दादा०—मालेरावबाबा वारले याकरितां आपल्या मातंगपोशीस आलों. राणी, फार वाईट गोष्ट झाली. पण त्याला काय इलाज ? सुभेदारकाकांच्या मागें संस्थानचें नांव चालू राहील असें आम्हांला वाटलें होतें, पण परमेश्वराचा हेतू कांहीं निराळाच होता, त्याला आपण काय करणार ? या जगांत आपल्या इच्छा फारच थोड्या सफल होतात.

तुकोजी०—श्रीमंतांनीं बरोबर लष्करही आणलें आहे.

दादा०—होय. राणीच्या समाचारासाठीं लष्करासह इकडेच आलों. अहिल्याराणी, इकडे येण्यांत आमचे आणखीही कांहीं उद्देश आहेत. सध्या खर्चाची फार ओढाताण झाली आहे. महेश्वरच्या खजिन्यांत अपार संपत्ती आहे असें समजतें. मध्यवर्ति सरकारच्या लष्करी खर्चाला मदत करणें अंकित संस्थानचें कर्तव्य आहे. तेव्हां सैन्याच्या नडीसाठीं स्वामिभक्त अहिल्याराणीच्या महेश्वरच्या खजिन्याचा निदान निम्मा भाग तरी आम्हाला मिळालाच पाहिजे आणि तो तुम्ही मोठ्या संतोषानें द्याल असा आम्हाला दृढ भरंवसा आहे.

तुकोजी०—पण.........

अहिल्या—तुकोजीराव...............

दादा०—शिवाय मल्हाररावकाका आम्हाला वडिलासमान. तेव्हां त्यांच्या संस्थानची व्यवस्था जर आम्ही पाहिली नाहीं तर आम्ही पुत्रधर्माला जागल्यासारखें होणार नाहीं. राणी, हिंदुस्थानांत अशी अस्वस्थता माजून राहिलेली; संस्थान बेवारस; तुम्ही स्त्री अशा स्थितींत संस्थान राहूं देण्यांत होळकरांच्या राज्याला धोका होण्याचा संभव आहे. आणि

तसें झालें असतां पेशवे सरकारच्या, आमच्या इभ्रतीला कमीपणा येणार आहे. म्हणून होळकरांच्या नांवाला शोभेल, वरिष्ठ पेशवेसरकारच्या इभ्रतीला साजेल; तुमच्या योग्यतेला शोभेल अशाप्रकारची नक्त नेमणूक तुम्हाला करून देऊन संस्थान आमच्या ताब्यांत घेण्याचा आमचा मानस आहे.

अहिल्या—वाः फार चांगली गोष्ट आहे ! वडिलांच्या कीर्तिला, पेशव्यांच्या नावांला शोभणारेंच कृत्य आहे ! बाजीराव साहेबांनीं-वडिलांनीं माळव्याची सुभेदारी होळकरांना दिली ती चिरंजीवानां काढून घेण्याची इच्छा झाली आहे ? फारच चांगलें ! श्रीमंत, आपल्या बुद्धीला भ्रम झाला आहे असें मला वाटतें. नाहीं तर बोलण्यापूर्वी आपण चांगला विचार केला असता. बाजीरावसाहेबांनीं माळव्याची जहांगीर जी सुभेदारानां दिली ती सुभेदार म्हणजे याचना करणारे भिक्षुक म्हणून त्यानां दान केली असें आपणाला वाटतें काय ? रक्ताचें पाणी शिंपून आणि हाडामासांचें खत घालून संपादन केलेल्या राज्याची मनमानेल तशी विल्हेवाट कुणालाही सहजासहजीं करतां येणें शक्य नाहीं. श्रीमंत, आपण आमचे पाहुणे आहांत नाहीं तर अशाप्रकारचे अपमानकारक उद्गार बाहेर काढणाऱ्यांना होळकरांच्या तरवारीचें पाणी आम्हीं केव्हांच दाखविलें असतें.

दादा०—युद्ध करणें हें पुरुषांचें काम आहे. तेव्हां तुम्हां स्त्रियांच्या तरवारीचें पाणी फार तीक्ष्ण असेल असें निदान या राघोबाला तरी वाटत नाहीं. राणी, तुम्हाला नक्त नेमणूक करून देऊन संस्थान खालसा करण्यांची आमची इच्छा आहे; ती पूर्ण झालीच पाहिजे. शांततेनें जर संस्थान आमच्या ताब्यांत आलें नाहीं तर आम्हाला शक्तीचा उपयोग करावा लागेल.

अहिल्या—श्रीमंत, शक्तीची धमकावणी कुणाला वाढतां ? होळकरांचा अजून कांहीं नष्टांश झालेला नाहीं. होळकर कांहीं अझून इतके निर्बल झालेले नाहींत. इंदूरच्या लोकांनीं कांहीं हातांत बांगड्या भरलेल्या नाहींत. संस्थान खालसा करण्यापूर्वी स्वामिनिष्ठ होळकरांची आपल्याला अगोदर कत्तल

करावी लागेल. संस्थान ताब्यांत घेण्यापूर्वी इंदूरच्या खवळलेल्या लोकसमुदायाच्या सशस्त्र प्रतिकाराला आधीं आपल्याला तोंड द्यावें लागेल. या अहिल्येचें मृत शरीर ओलांडूनच आपल्याला इंदूरांत प्रवेश करावा लागेल. श्रीमंत, आपण कोणत्या भ्रमांत आहांत! जुलमानें मिळविलेलें संस्थान आपल्याला केव्हांही चिरस्थायी होणार नाहीं. तरवारींच्या जोरावर वाटेल तितकीं राज्यें मिळवितां येतील. पण तीं चिरकाल टिकायला लोकांच्या संमतीची आणि खुषीची आवश्यकता लागते.

दादा०—लोकांच्या संमतीची किंवा खुषीची या वेळीं आम्हांला बिलकुल पर्वा नाहीं. संस्थान ताब्यांत घेणें एवढाच आमचा उद्देश आहे तो साध्य झालाच पाहिजे.

अहिल्या—संस्थानच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याची श्रीमंतांना काय जरूर!

दादा०—संस्थान बेवारस आहे.

अहिल्या—थोरल्या सुभेदारांच्या इच्छेप्रमाणें शूर सेनापती तुकोजीराव होळकरांना संस्थानच्या अधिकाराचें दान मी केव्हांच केलें आहे. संस्थान आतां बेवारस नाहीं.

दादा०—पण या अधिकारदानाला पेशवेसरकारची संमती आहे काय? पेशवेसरकारच्या संमतीखेरीज संस्थानच्या अधिकाराचें दान करायला, राणी तुम्हीं मुखत्यार नाहींत. अहिल्या राणी, संस्थान मुकाट्यानें आमच्या स्वाधीन करा. महेश्वरचा खजिना पेशवे सरकारच्या सैन्याच्या कारणीं लागूं द्या. सलोख्यानें तंटा मिटला तर तुम्हांला नक्त नेमणूक ठरविण्याचे वेळीं तुमच्या वर्तनाचा विचार करूं.

अहिल्या—श्रीमंत, हा आमचा, संस्थानच्या राणीचा अपमान आहे.

दादा०—राणी, तुम्हीं पेशवे सरकारचे, आमचे नोकर आहेत.

अहिल्या—नोकर असलों तरी स्वाभिमानाला आम्हीं रजा दिलेली नाहीं. श्रीमंत, मी आपणाला स्पष्ट आणि शेवटचें सांगतें महेश्वरचा

खजिना या अहिल्येचा आहे. महेश्वरच्या खजिन्यांतील संपत्ती दानधर्मांतच खर्च होणार. त्यांतील एक दमडी देखील आपल्या दृष्टीला पडणार नाहीं. आणि संस्थानविषयीं म्हणाल तर संस्थान आपल्या स्वाधीन करायला मी तयार नाहीं. आम्ही पुण्यांच्या पेशव्याच्या जवळ दाद मागूं, आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणें वर्तन करूं.

दादा०—राणी, हा नकार म्हणजे लढाईचा पुकाराच आहे.

अहिल्या—श्रीमंतांची लढण्याची इच्छाच असेल तर ती पुरी करायला इमानी नोकर केव्हांहि कसूर करणार नाहीं. आमच्या नुसत्या दृष्टीपातानेंच इथें जमलेल्या सर्व शूर पुरुषांच्या तरवारी म्यानाबाहेर पडतील. आम्ही नुसती खूण केल्याबरोबर स्त्रीपथकांतील स्त्रियांच्या तरवारी कोपमुक्त होऊन आपल्याला सलामी देण्यासाठीं बाहेर पडतील. श्रीमंत ही इदूरची राणी, एक स्त्री, आपल्याला—हिंदुस्थानांतील अद्वितीय वीराला युद्धाचें आव्हान देत आहे. आमच्या स्त्रीचा पराजय केलात तर आपणाला भूषण नाहीं. पण जर कां आपला पराजय झाला तर मात्र जगांत तोंड वर करायला आपल्याला जागा नाहीं. नीट विचार करून सैन्य परत पाठवा... वर आपलेंच आहे. पाहुणे म्हणून आपला मान ठेवायला आमच्याकडून केव्हांहि कसूर होणार नाहीं. पण जर कां सैन्यानें सभ्यांची मर्यादा ओलांडली............

दादा०—तर काय होईल ?

तुकोजी०—आमची तरवार तुमच्यावर चालेल.

दादा०—तुकोजीराव, तरवारीची भीति कुणाला ? तरवारीची भिती या राघो भरारीच्या अंतकःरणाला कधींहि शिवली नाहीं. राणी, युद्धाच्या वल्गना राहूं द्यात. मी फिरून तुम्हांला बजावून सांगतों कीं संस्थान आमच्या स्वाधीन झालेंच पाहिजे. महेश्वरचा खजिना आम्हांला मिळालाच पाहिजे.

अहिल्या—संस्थान स्वाधीन होणार नाहीं, महेश्वरचा खजिना मिळणार नाहीं.



अहिल्या—आपल्याला–हिंदुस्थानांतील एका अद्वितीय वीराला युद्धाचें आव्हान देत आहे. (अं. ३ पृ. ८२)

दादा०—राणी, संस्थान स्वाधीन झालेंच पाहिजे. महेश्वरचा खजिना मिळालाच पाहिजे.

अहिल्या—श्रीमंत, आपण ब्राह्मण आहांत. तेव्हां झोळी पसरून भिक्षां देही म्हणून आमच्यापुढें जर आपण याचना केली तर खजिनाच काय पण संस्थानहि दान करायला ही अहिल्या तयार आहे.

दादा०—राणी, तुम्ही कोणत्या घमेंडींत आहांत ? कारस्थानी चंद्रचूडाच्या सहायानें तुमचें इंदूर आमच्या लोकांच्या हातांत केव्हांच पडलें असेल.

अहिल्या—कारस्थानी चंद्रचूड संत्र्याच्या पहाऱ्यांत लालबागेंतील हवा खात पडले आहेत. निमकहराम चंद्रचूडाच्या रूपानें वावरणारें कारस्थानी भूत या अहिल्येनें केव्हांच गाडून टाकलें आहे. चंद्रचूडानें कारस्थान, श्रीमंतांची मसलत फसली ही गोष्ट निराळी सांगितली पाहिजे काय ?

दादा०—कारस्थान फसलें तरी आमच्या लष्करी सामर्थ्यानें आम्हांला इंदूरचा पुरा धुव्वा उडवून देतां येईल. बायका राज्यांचें रक्षण करणार ! इंदूरचे मूठभर लोक संस्थानचें रक्षण करणार ! राणी, तुमचें सैन्य.....

सेवक—( प्रवेश करून ) उदेपुराहून येऊन दाखल झालें आहे.

अहिल्या—श्रीमंत, आमचें सैन्य उदेपुराहून येऊन दाखल झालें !

दादा०—दाखल झालें असलें तरी सार्वभौम पेशवे सरकारच्या सैन्यापुढें त्याचा टिकाव लागेल काय ? जरूर पडल्यास आम्हांला वाटेल तिकडून कुमक मागवितां येईल. आमची सरदार मंडळी........

विसाजी—( प्रवेश करून ) शिंदे, नागपूरकर, गायकवाड यांच्याकडून वकील आले आहेत. ते सांगतात कीं सुभेदारांचा ज्यांच्यावर उपकार नाहीं असा हिंदुस्थानांत तरी कुणी सांपडणार नाहीं. आम्ही आपल्या मदतीला ससैन्य आलों आहों. छावणी दोन दिवसांच्या वाटेवर आहे. लढाई सुरू झाली कीं आम्हीं मदतीला आलोंच.

दादा०—चंद्रचूडाचा डाव पुरा फसला तरी आम्ही या प्रकरणाचा पूर्ण निकाल केल्याखेरीज येथून जाणार नाहीं. राणी, पुण्याच्या पेशव्यांचे चुलते म्हणून प्रतिपेशवे या नात्यानें तुम्हाला संस्थान स्वाधीन करण्याचा मी हुकूम देत आहें. तुकोजीराव वारस आम्हाला संमत नाहीं. तेव्हां आमचा, पेशवे सरकारचा हुकूम........

यशवंतराव—( प्रवेश करून ) हा सरकारना आणि हा श्रीमंतानां. सरकारच्या आज्ञेप्रमाणें पत्र घेऊन पुण्याला श्रीमंतांना नेऊन दिलें. श्रीमंतांनीं वाचून पाहून मला हकिगत विचारली. मीही सर्व परिस्थिती समजाऊन सांगितली. तेव्हां पेशवे सरकारनीं जातीनें हे दोन हुकूम लिहून एक सरकारनां व दुसरा श्रीमंतानां देण्यासाठीं माझ्याजवळ दिले. हा आत्तांच पुण्याहून आलों.

अहिल्या—फणशे, तुम्ही संस्थानची कामगिरी फारच उत्कृष्ट बजावलीत. श्रीमंत, हा पेशवे सरकारच्या स्वदस्तुरचा हुकूम. विसाजीपंत......

( पत्र देते. )

विसाजी—( वाचतो. ) " तुमच्या दौलतीविषयीं जो पापबुद्धी ठेवील त्याचें पारिपत्य बेलाशक करावें. तुकोजीरावानां सुभेदारीचा अधिकार आपण दिला त्याला आमची पूर्ण संमति आहे. संस्थानचा राज्यकारभार आपण पूर्ण मुखत्यारीनें चालवावा. तुम्हाकडील मुखत्यार दोघे हुजूर पाठवावे म्हणजे आम्ही वस्त्रें व सही शिक्क्याच्या सनदा पाठवूं. आमचे चुलते श्रीमंत दादासाहेब पेशवे यानां आपल्याला त्रास न देतां माळव्यांतून एकदम इकडे पुण्याकडे निघून येण्यासंबंधीं अलाहिदा हुकूम गेले आहेत. "

दादा०—( स्वगत ) तरूण वय आणि नवीन अधिकार यामुळें माधवाला आपली माणसें देखील ओळखतां येईनाशीं झालीं. ( उघड ) राणी, पेशवे सरकारचा हुकूम मान्य केलाच पाहिजे, पण हुकूम फार उशिरा आला. या वेळीं आमच्या लोकांनीं इंदूरचा ताबा घेतला असेल. पेशवे सरकारच्या हुकूमाची बेअदबी झाली याबद्दल मला फार वाईट वाटतें.

**महादजी**—( प्रवेश करून ) श्रीमंतानां वाईट वाटण्याचें कारण नाहीं. लढाई करण्याचा आणि शहर ताब्यांत घेण्याचा प्रसंगच आला नाहीं. कारण श्रीमंतांच्या सैन्यांतील लोकांनीं शस्त्रत्याग केला !

**दादा०**—आमच्या लष्करांतील लोकांनीं शस्त्रत्याग केला? याचा अर्थ? आणि पाटीलबावा तुम्ही इकडे कुणीकडे ?

**अहिल्या**—अलिजाबहादुर पाटिलबावांचें ही सुभेदारांची सून स्वागत करीत आहे.

**महादजी**—माळव्याच्या भवानीमातेला, अहिल्या देवीला माझा प्रणाम असो. श्रीमंत, सुभेदारांचा उपकारबद्ध असल्यामुळें अहिल्या राणीच्या पत्राबरोबर सैन्याची कुमक पाठवून दिली. पण, यादवी करून कुणाचेंही कल्याण झालें नाहीं. होळकर पेशव्यांचें युद्ध, आणि त्यांतून अहिल्यादेवीशीं युद्ध म्हणजे मराठीशाहीच्या इतिहासाला कालिमाच. म्हणून तो अनिष्ट प्रसंग टाळण्याकरितां जातीनें इकडे आलों. पण तो प्रसंग या महासतीच्या तेजानें केव्हांच टळला होता. कारण श्रीमंत, इंदूरवर स्वारी करायची आणि देवी अहिल्येविरुद्ध शस्त्र उगारायचें म्हणतानां एकही शिपाई आपली तरवार बाहेर काढीना. प्रत्येकानें आपआपल्या शस्त्राचा त्याग केला !

**दादा०**—उदेपुराहून होळकरांचें सैन्य दाखल झालेलें, सर्वांची कुमक आलेली, इंदूरचे नागरीक खवळलेलें, हें सर्व पाहून आपला निभाव लागणें कठीण म्हणून लोकांनीं भितीनें शस्त्रत्याग केला काय ?

**महादजी**—छे, छे, हा सर्व होळकरांच्या या अहिल्या देवीच्या दिव्य तेजाचा हा प्रभाव. श्रीमंत, ही माळव्याची राणी, भवानी मातेचा अवतार आहे. परमेश्वराच्या या शुद्ध स्वरूपावर, होळकरांच्या या कुळस्वामिनीवर या मूर्तिमंत औदार्यावर शस्त्र उचलण्याचें कुणाचें सामर्थ्य आहे ?

**बाळाजीपंत**—माळव्याच्या भवानी मातेचा, होळकरांच्या अहिल्यादेवीचा जयजयकार असो.

**दादा०**—अहिल्या राणी, दैवी सामर्थ्यापुढें लष्करी सामर्थ्य लंगडें पडतें याचा अनुभव मला आज चांगलाच आला. दगलबाज इसमाच्या

नादीं लागून मनुष्य आपली स्थिती किती हास्यास्पद करून घेतो याचा धडा मला आज छान मिळाला. अशी दैवी विभूती ज्या संस्थानची राणी आहे त्या संस्थानच्या लोकांना स्वराज्याला नालायक कोण म्हणेल? उलट हें स्वराज्य साम्राज्याला भूषणावहच होणार आहे. राणी, तुम्ही आज आपल्या चारित्र्यानें हिंदु रमणींना राज्यकारभारांत कोणता भाग घेतां येईल हें जगाला जाहीर केलेंत. क्षमा करा. राणी, हिंदुस्थानच्या इतिहासाला ललामभूत होऊन राहिलेल्या या शूर राणीचा--आपला अपमान माझ्याकडून झाला असल्यास हा राघोबा पेशवे आपली क्षमा मागत आहे.

अहिल्या—श्रीमंत, होळकर आपले नोकर. क्षमा मागण्याचा अधिकार आमचा आणि करण्याचा आपला. श्रीमंत, रागाच्या भरांत अविचारानें कांहीं कमी ज्यास्त शब्द तोंडांतून गेले असल्यास आपण क्षमा करावी.

तुकोजी०—आमचा दर्जा हलका, पण श्रीमंतांना चुकून कांहीं अधिक उणें बोललों असल्यास उदारधी होऊन श्रीमंतांनीं क्षमा करावी.

दादा०—सुभेदार तुकोजीराव, तुम्हां सर्वांचा बाणेदारपणा पाहून मला अत्यंत आनंद झाला आहे. तुम्ही आमचे आतां सरदार झाला आहांत. तेव्हां स्वराज्याचें उत्तम प्रकारें रक्षण करून साम्राज्याचें यश वृद्धिंगत करा.

अहिल्या—श्रीमंतांनीं आतां एकवार इंदूरांत प्रवेश करून मग परत जावें. चंद्रचूडांनाही बोलावणें पाठवितें.

दादा०—त्या निमकहराम मनुष्याचें मला तोंडही पहावयाचें नाहीं. राणी, अशा दगलबाज इसमाला कामावर ठेऊं नका. त्यांना तावडतोब हांकून द्या.

बाळाजीपंत—अलबत. हा असा फेरफार केलाच पाहिजे.

तुकोजी०—श्रीमंतांच्या भितीनें शहराचे दरवाजे लाऊन घेतले होते. ते आतां खुले करायला हुकूम देतों.

दादा०—थांबा, सुभेदार, या सर्व गोष्टी माझ्यामुळें घडून आल्या. तेव्हां या नाटकाचा नायक मी आहें असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. तेव्हां या नाटकाचा शेवटही माझ्याच हातून होऊं द्या. राणी, सुभेदार, माझ्या मागून या. माझ्या भितीमुळें लावावे लागलेले तुमच्या शहराचे दरवाजे, तुमच्या स्वराज्यमंदिराचे दरवाजे मी स्वतः उघडून तुमचा आंत प्रवेश करवितों. (पडदा पडतो.)

---

भरत वाक्य.

जयति जय भगवन्महेश्वर । शिरी गंगा चंद्रमा वर । अंकि गिरिजा तेविं गणवर । वंदना करितों उमावरा ॥ धृ ॥ नाट्यमंडन नटवरां हर । हो यशस्कर शंभु शंकर । मान्य नरवर तेवि नृपवर । वानु त्यां जगिं हे शुभंकर ॥ १ ॥ नाट्य कृति ही हे नटेश्वर । अर्पितों त्वच्चरणिं सादर । मान्य करुनि दइ या वर । तुष्ट होउत होळकरवर ॥ २ ॥

समाप्त.

नों. दि. ......
५६०....
१२८ ......

### वैद्य मोरेश्वर मुकुंद मोगरेकृत

# धातुपौष्टिक गोळ्या.

## प्रवाळ, मौक्तिक, शिलाजीत, गुळवेलीचें सत्व वगैरे मिश्रित

## ३२ गोळ्यांच्या डबीस १ रुपया.

जिकडे पहावें तिकडे स्त्रीपुरुषवर्ग उदासीन दिसतो. ह्याचें कारण पाहूं गेल्यास असें आढळून येतें कीं, संसारांतील त्रासानें व अयोग्य ऐषआरामानें घातुक संवयी लागून तो कमकुवत बनत चालला आहे. आणि हल्लींच्या परिस्थितीमुळें जें खाणें मिळतें तेंहि चांगलें ताजें व स्वच्छ नसून त्यापासून फायदा तर नाहींच परंतु अपचन होऊन बद्धकोष्ठ मात्र होतें. ह्यामुळें नेहमीं आम्लपित्त, जीर्णज्वर, पोटदुखी, स्वप्नावस्था वगैरे होऊन ज्ञानशक्ति नाहींशी होते व शुक्रदोषादि विकार जडून पुरें नपुंसकत्व येतें. असें झालें म्हणजे मन चिंतातुर राहून संसार असार भासतो, व जिणें कष्टमय वाटतें. म्हणून आह्मी ह्या गोळ्या शास्त्रीय पद्धतीनें प्रवाळ, मौक्तिक शिलाजित वगैरे मिश्र करून तयार केल्या आहेत. ह्यांच्या सेवनानें अन्न पचन होऊन चांगली भूक लागते व शरीरांत नवीन रक्ताचा सांठा होऊन वीर्यवृद्धी होते. वात पित्त व कफ ह्यांपासून होणाऱ्या व्याधींचें शमन होऊन स्वप्नावस्थाहि नाहींशी होते. गर्मी पर्मा ह्यांपासून अंगांत मुरलेली कडकी नाहींशी होऊन त्याच किंवा इतर कारणानें प्राप्त झालेलें नपुंसकत्वहि दूर होतें. तरुण स्त्रीपुरुषांनीं एक वेळ अनुभव घ्यावा. वृद्धहि तरुणाप्रमाणें सामर्थ्यवान् होतो; आणि त्यास संसारसुख आनंदानें घ्यावयास मिळतें. एक आण्याचें तिकीट पाठवून क्याटलाग मागवा.

मुंबईचा पत्ता:—वैद्य मोगरे, गिरगांव बॅकरोड मुंबई नं. ४

**वैद्य मोरेश्वर मुकुंद मोगरे मु. शिरगांव, ता. माहिम जि. ठाणें.**

# राणी पेन.




हीं पेनें आज पुष्कळ वर्षें शास्त्रोक्त पद्धतीनें तयार होत असून, गुणांत विलायतीच्या तोडीचीं पण, किंमतींत फारच स्वस्त असल्यामुळें त्यांचा अतिशय खप होत आहे. मुंबई, मद्रास कलकत्ता वगैरे सरकारांतून पुष्कळ मोठे संस्थानिक व रेलवे कंपन्यांतून ह्यांचा फार मोठा खप होत आहे. तसेंच परदेशांतही सायप्रस, झांशीबार, बेहरीन वगैरे ठिकाणाहून या मालाला बरीच मागणी येत असते. वाढता खप हाच चांगुलपणाचा दाखला होय. एक वेळ मागवून जरूर खात्री करून घ्यावी प्रत्येक ठिकाणीं घाऊक व किरकोळ व्यापाऱ्याकडे मिळेल.

## राणी पेन डेपो.

नं. १० पन्नालाल चाळ मुंबई नं. ७.

तारेचा पत्ता—" वरप्रभा " मुंबई.

हिंदुस्थानचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. पी. सी. रॉय, यांच्या खास देखरेखीखालीं कलकत्ता सोप वर्क्स लिमिटेड यांनीं तयार केलेले

## अंगाचे व कपड्याचे साबण

चंदन, लव्हेंडर, व्हाईट रोझ, बकुल, टर्किश बाथ, 'कॅस्रो' शेव्हिंग स्टिक्, निर्मोलिन वगैरे वगैरे, तसेंच मालवण येथील चाकू व पेनें. सुबक व टिकाऊ राइटिंग कॅबिनेटस्, पिन-कुशन्स, ब्लॉटर्स, इंकस्टंड्स, पेपर ट्रे वगैरे सावंतवाडीची लांकडी स्टेशनरी, खडावा व रंगीत सामान घाऊक व कि.

व्यापाऱ्यांस विशेष सवलत.

व्ही. प्रभा आणि कंपनी.

लक्ष्मी बाग, भटवाडी, गिरगांव–मुंबई

वि. सू.—७ प्रकारचे साबणाचे नमुने २८४ ट. ख. निराळा.

---

**इमिटो पर्ल्स्** हीं मोत्यें हुबेहुब खऱ्या प्रमाणें पाणीदार टिकाऊ व जड असून यांचा उपयोग खऱ्या मोत्यांऐवजीं बिनहरकत करतां येतो. कुड्यांचीं २४ मोत्यें रु. ३, नथीचा सेट १७ मोत्यें रु. ४, बाळीचे तीन दाणे रु. १, याच मोत्यांचे खऱ्या सोन्यांत बांधलेले तयार दागिने नथ रु. १२, कुडीजोड रु. ८, बाळी रु. ५, चौकुड्या रु. ४, सुटीं मोत्यें १०० रु. २० व इतर दागिने मागणीप्रमाणें करून देऊं. व माल नापसंत पडल्यास परत घेऊं.

बॉंबे युनिव्हर्सल एजन्सी,

कांदेवाडीसमोर ५५०, गिरगांव रोड, मुंबई.

श्रीकृष्ण वामन

# आपटे आणि कंपनी

## कापडाचे व्यापारी.

सर्व पेठांची लुगडीं खण, जरीचीं रेशमी व सुती पातळें, पोलक्याचीं फॅनसी कापडें, धोतरजोडे, उपरणे जोडी, कोटिंग, शर्टींग, वुलन, रग्स, कुकीट्स धाबळ्या कद, पितांबर, कोशे, जरीचे फेटे रुमाल वगैरे सर्वप्रकारचें कापड फार किफायतशीर भावानें मिळेल. स्त्रियांना माल पसंत करण्यास स्पेशल सोय.

मुंबई—गिरगांव चर्नीरोड—प्रार्थनासमाजाजवळ.

---

सामाजिक ] [ सामाजिक

सदाशिव अनंत शुक्लकृत

संगीत

# दहावा ग्रह.

महाराष्ट्राच्या रंगभूमि—क्षितिजावर

लौकरच चमकेल—

IRBK-0100560

IRBK-0100560

IRBK-0100560

दिनकर चिमणाजी देशपांडे ( काशीकर ) बी. ए.

यांची लवकरच रंगभूमीवर येणारीं

नवीन नाटकें

## संगीत

## अंक ] चक्रवर्ती [ १-३

वेदकालीन राजसत्ता व लोकसत्ता यांतील झगडा

या नाटकांत दाखविला आहे.

## संगीत

## अंक ] लीलेची लीला [ १-३

हास्यरसानें भरलेली तीन दिवसाच्या कथानकाची

तीन तासाची हा एक लाइट कॉमेडी आहे.

---

प्रकाशक—रा. रा. कृष्णाजी परशराम पंडित, अनंताश्रम,
गिरगांव मुंबई. नं. ४

मुद्रकः—रा. रा. रामचंद्र नारायण मंडलीक, बी. ए.
लोकमान्य प्रेस, रास्ती बिल्डिंग, गिरगांव मुंबई.